# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, ■ गुरुवार २८ मे २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठे १०







## एमएनजीएलच्या सीएनजी गॅसच्या दरात वाढ

**पुणे /प्रतिनिधी** : पुणे शहर (पिंपरी-चिंचवडसह) तसेच चाकण, तळेगाव आणि हिंजवडी परिसरातील वाहनांसाठी वापरल्या जाणाऱ्या कॉम्प्रेस्ड नॅचरल गॅस (सीएनजी)च्या विक्री दरात प्रतिकिलो २.५० रुपयांची वाढ करण्यात आली आहे. त्यामुळे आता सीएनजीचा नवा दर प्रतिकिलो ९४.७५ रुपये इतका




झाला आहे. हे वाढीव दर बुधवारी मध्यरात्रीपासून लागू करण्यात येणार असल्याची माहिती महाराष्ट्र नॅचरल गॅस लिमिटेड यांनी दिली आहे.


सीएनजी निर्मितीसाठी आवश्यक असलेल्या नैसर्गिक वायूच्या खरेदी खर्चात वाढ झाल्याने दरवाढ करणे आवश्यक ठरल्याचे एमएनजीएलने स्पष्ट केले. मात्र, या किरकोळ दरवाढीनंतरही पुण्यातील सध्याच्या दरपातळीनुसार प्रवासी कार विभागात पेट्रोलच्या तुलनेत सुमारे ४८ टक्के आणि डिझेलच्या तुलनेत २६ टक्के बचत सीएनजीमुळे होत असल्याचा दावा कंपनीने केला आहे. तसेच, ऑटोरिक्षांसाठीही डिझेलच्या तुलनेत सुमारे २६ टक्के बचत होत असल्याचे सांगण्यात आले.

दरम्यान, घरगुती वापरासाठीच्या पाइप्ड नॅचरल गॅसच्या दरात कोणतीही वाढ करण्यात आलेली नसल्याचे एमएनजीएलने स्पष्ट केले आहे. ग्राहकांनी सुधारित दराची नोंद घ्यावी, असे आवाहनही प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

एमएनजीएलने दिलेल्या स्पष्टीकरणानुसार, इनपुट गॅसच्या किमतीत वाढ झाल्यामुळे हा निर्णय घ्यावा लागला आहे. आधीच पेट्रोल-डिझेलच्या वाढत्या भावाने होरपळणाऱ्या नागरिकांना आता सीएनजीच्या महागाईचा सामना करावा लागणार आहे. या दरवाढीमुळे शहरातील रिक्षा, ☞(पान २ वर)

# विधानपरिषदेचा तिढा मुंबईतच सुटणार, दोन जागांवरून अडलंय- देवेंद्र फडणवीस

**मुंबई/प्रतिनिधी** : राज्याचं लक्ष लागलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांमधील विधानपरिषद निवडणुकांच्या (तिमूग्दह म्दस्स्ग्ेग्दह) १७ जागांसाठी महायुतीमधील (ईर्ृ्ब्लूग) जागावाटपाचा तिढा जवळपास सुटला असून, केवळ दोन ते तीन जागांवर अंतिम निर्णय होणे बाकी असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस (अनर्हे ईर्हिन्े) यांनी स्पष्ट केले. नाशिक आणि छत्रपती संभाजीनगर या जागांवर शिवसेनेसोबत (शिंदे गट), तर पुण्याच्या जागेवरून राष्ट्रवादी काँग्रेससोबत (अजित पवार गट) भाजपची सध्या सकारात्मक चर्चा





सुरू आहे. मित्रपक्षांचे नेते एकत्र बसून यावर अत्यंत सन्मानजनक तोडगा काढतील, असेही त्यांनी स्पष्ट केले. राजधानी दिल्लीत केंद्रीय सहकारमंत्री अमित शाह यांच्यासमवेत साखर उद्योगसंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि इतर नेत्यांची बैठक होती, त्यासंदर्भाने चर्चा करण्यासाठी आलो होतो, अशी माहिती देवेंद्र फडणवीस यांनी दिली. तसेच, विधानपरिषद निवडणुकांच्या जागेचा तिढा दिल्लीत नाही तर मुंबईत सोडवला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

विधानपरिषदेच्या १७ पैकी १२ जागा भाजप लढवणार असल्याची माहिती असून शिंदेंच्या शिवसेनेला तीन आणि राष्ट्रवादी काँग्रेसला २ जागा देण्यात येणार असल्याची चर्चा आहे. त्याच पार्श्वभूमीवर आज तिन्ही पक्षाचे प्रमुख दिल्लीत होते. त्याच अनुषंगाने महायुतीच्या वरिष्ठ नेत्यांसोबत बैठकीत चर्चा झाल्याची माहिती आहे. देवेंद्र फडणवीस यांनीही या बैठकीनंतर माहिती दिली. विधानपरिषद निवडणुकीबाबत मी पुन्हा सांगतो, आमचं जवळपास ॲग्रीमेंट झालेलं आहे, फक्त शिवसेनेसोबत नाशिक आणि संभाजीनगर येथील जागा आम्हाला मिळाली पाहिजे हा आमचा आग्रह आहे. राष्ट्रवादीने आमच्याकडे पुण्याची जागा मागितलेली आहे, सध्या याच गोष्टींवर आमचं अडलं आहे जे आम्ही सोडवून घेऊ, असे म्हणत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानपरिषद निवडणुकांवर भाष्य केलं. कठीण पेपर संपलाय, आता सोपा पेपरही आम्ही सोडवून घेऊ, टीकमार्क करायचं बाकी आहे, ते होऊन जाईल.

विधान☞(पान २ वर)

### निवडणूक कार्यक्रम जाहीर


| | |
|---|---|
| अधिसूचना जारी | : २५ मे |
| अर्ज भरण्याची शेवटची तारीख | : १ जून |
| अर्जाची छानणी | : २ जून |
| अर्ज माघारीची शेवटची तारीख | : ४ जून |
| मतदान | : १८ जून - स. ८ ते दु. ४. |
| मतमोजणी | : २२ जून |

## वैभव सूर्यवंशीची २९ चेंडूंत ९७ धावांची वादळी खेळी

# गेलचा महाविक्रम मोडीत काढत ठरला IPL चा नवा 'सिक्सर किंग'

**चंदीगड/वृत्तसंस्था-** : अवघ्या १५ वर्षांच्या वैभव सूर्यवंशीने आयपीएलच्या १९ व्या हंगामात क्रिकेट विश्वात खळबळ उडवून दिली आहे. सनरायझर्स हैदराबादविरुद्धच्या अटीतटीच्या एलिमिनेटर सामन्यात आक्रमक फलंदाजी करत वैभवने वेस्ट इंडिजचा दिग्गज फलंदाज ख्रिस गेलचा एका मोसमातील सर्वाधिक षटकारांचा ऑल-टाइम विक्रम मोडीत काढला आहे. या कामगिरीसह वैभव आता आयपीएलच्या इतिहासातील नवा 'सिक्सर किंग' ठरला आहे.

न्यू चंदीगडमधील मुल्लांपुर स्टेडियमवर रंगलेल्या या सामन्यात राजस्थान रॉयल्सकडून खेळताना वैभवने सुरुवातीपासूनच हैदराबादच्या गोलंदाजांची धुलाई केली. आपल्या डावातील सातवा षटकार मारताच त्याने ख्रिस गेलच्या विक्रमाला मागे टाकले. या महत्त्वपूर्ण सामन्यात त्याने केवळ १६ चेंडूंत अर्धशतक पूर्ण करत चाहत्यांना मंत्रमुग्ध केले.



शतकाकडे वाटचाल करत असताना वैभव २९ चेंडूंत ९७ धावांची वादळी खेळी करून बाद झाला. या शानदार खेळीत त्याने ५ चौकार आणि तब्बल १२ षटकार लगावले.


केवळ☞(पान २ वर)

### एका आयपीएल हंगामात सर्वाधिक षटकार ठोकणारे फलंदाजः

- वैभव सूर्यवंशी (२०२६): ६५ षटकार
- ख्रिस गेल (२०१२): ५९ षटकार
- आंद्रे रसेल (२०१९): ५२ षटकार
- ख्रिस गेल (२०१३): ५१ षटकार
- जोस बटलर (२०२२): ४५ षटकार

## राज्याला पुन्हा अवकाळी पावसाचा तडाखा, काही भागांमध्ये गारपीट, वीज पडून शेतकऱ्याचा मृत्यू

**मुंबई/प्रतिनिधी** : आज पुन्हा एकदा राज्याच्या काही भागांमध्ये अवकाळी पावसाने हजेरी लावली आहे. काही भागांमध्ये वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस झाला तर काही भागांमध्ये रिमझिम पावसाच्या सरी कोसळल्या आहेत. दरम्यान या पावसामुळे हवेत गारवा निर्माण झाला असून, नागरिकांना वाढत्या उकाड्यापासून दिलासा मिळाला आहे. मात्र दुसरीकडे या पावसामुळे शेतकऱ्यांच्या फळबागांचं मोठं नुकासन झालं आहे. तसेच अंगावर वीज पडल्यानं संगमनेर तालुक्यातील शेतकऱ्याचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे.



संगमनेर तालुक्यातील हिवरगाव पठार परिसरात आज सायंकाळी वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस झाला. याचदरम्यान अंगवार वीज पडून शेतकऱ्यांचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. गिर्हेवाडी येथील रहिवासी असलेलेले शेतकरी मच्छिंद्र झुंबर दुधवडे (वय ३५) यांचा अंगावर वीज पडून मृत्यू झाला आहे.

**जालना जिल्ह्याला पावसाचा तडाखा**

जालना जिल्ह्यात आज सलग दुसऱ्या दिवशी सर्व दूर मान्सूनपूर्व पावसाने हजेरी लावली. अनेक ठिकाणी वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसामुळे झाडे उन्मळून पडली, तर काही ठिकाणी पत्रे उडाल्याच्या घटना देखील घडल्या आहेत. बदनापूर तालुक्यातल्या वंजारवाडी, साखरवाडी कंडारी यासह आसपासच्या परिसरात सायंकाळी सहा वाजेच्या सुमारास वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस झाला आहे. या पावसामुळे मोठं नुकसान झालं आहे.

हिंगोली जिल्हयातही पाऊस

दरम्यान दुसरीकडे हिंगोली जिल्ह्यात देखील आज अनेक ठाकाणी वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस झाला☞(पान २ वर)

तालुक्यातील साकूरसह परिसरात मान्सूनपूर्व पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. मेघगर्जना, विजांचा कडकडाट आणि वादळी वाऱ्यासह आलेल्या पावसामुळे शेतकऱ्यांची चांगलीच तारांबळ उडाल्याचं पहायला मिळालं.

# अमेरिकेचा इराणवर हवाई हल्ला!'

## इराणची पुन्हा युद्धाची तयारी



'अमेरिकेवर अजिबात भरवसा नाही' असे म्हणत इराणने पुन्हा युद्धाची तयारी सुरू केली आहे. होर्मुज सामुद्रधुनी हे त्यांचे सर्वात मोठे रणनीतिक हत्यार बनले आहे.

आखाती देशांमध्ये सुरू असलेला तणाव संपण्याचे नाव घेत नाही आहे. अमेरिका आणि इराण यांच्यात युद्धविरामाची चर्चा सुरू असली, तरी अमेरिकेने इराणला गाफिल ठेवत पुन्हा हवाई हल्ले सुरु केले आहेत. यामुळे इराणने देखील अमेरिकेसोबतच्या संभाव्य नव्या युद्धासाठी जोरदार तयारी सुरू केली आहे.

'अल जजीरा'च्या ताज्या अहवालानुसार, इराणला वॉशिंग्टनवर (अमेरिका) अजिबात विश्वास नाही. त्यामुळेच इराणने जागतिक तेल वाहतुकीसाठी अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या 'होर्मुज सामुद्रधुनीला' आपले सर्वात मोठे रणनीतिक हत्यार मानले आहे. इराणी अधिकारी सध्या तीन महत्त्वाच्या आघाड्यांवर एकाच वेळी काम करत आहेत- लष्करी सज्जता, अंतर्गत घरगुती समर्थन आणि आंतरराष्ट्रीय मुत्सद्देगिरी. इराणने चर्चेचे दरवाजे उघडे ठेवले असले, तरी त्यांचे मुख्य सैन्य आणि 'इराण रेवोल्यूशनरी गार्ड्स कॉर्प्स' हाय अलर्टवर आहेत.

होर्मुज सामुद्रधुनी: इराणची सर्वात मोठी ताकद

इराणच्या नेतृत्वाचा असा ठाम विश्वास आहे की, होर्मुज सामुद्रधुनी हा सागरी मार्ग त्यांची सर्वात मोठी ताकद आहे. जगातील एकूण तेल पुरवठ्याचा एक खूप मोठा हिस्सा याच सामुद्रधुनीतून प्रवास करतो. त्यामुळे युद्धाच्या स्थितीत हा मार्ग रोखून अमेरिका आणि त्याच्या मित्र राष्ट्रांवर आर्थिक कोंडी करण्याचा इराणचा विचार आहे. इराणी नेतृत्वाने ☞(पान २ वर)

# देवगिरी बँक फसवणूक प्रकरणात माजी खासदारावर गुन्हा दाखल

राज्याच्या राजकारणातून मोठी बातमी समोर आली आहे. देवगिरी बँक फसवणूक प्रकरणात शिवसेनेचे नेते तथा माजी खासदार उन्मेष पाटील यांचे नातेवाईक प्रशांत वाघ यांना अटक करण्यात आला आहे. या कारवाईमुळे चाळीसगावसह संपूर्ण जळगाव जिल्ह्यात राजकीय चर्चांना उधाण आले आहे. ५.३३ कोटींच्या बँक फसवणूक प्रकरणी सहा महिन्यांपूर्वी माजी खासदार उन्मेष पाटील यांच्यासह चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल झाला होता. त्यानंतर आता आर्थिक गुन्हे शाखेने सापळा रचून प्रशांत वाघ यांना चाळीसगावातून केली अटक आहे. याबाबत सविस्तर माहिती जाणून घेऊयात.



देवगिरी नागरी सहकारी बँकेच्या चाळीसगाव शाखेची तब्बल ५ कोटी ३३ लाख रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी फरार असलेला संशयित आरोपी प्रशांत वाघ याला पोलिसांनी सापळा रचून अटक केली आहे. या प्रकरणात शिवसेना शिंदे गटाचे नेते माजी खासदार उन्मेष पाटील यांच्यासह चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल आहे. उमंग व्हाईट गोल्ड प्रायव्हेट लिमिटेड कंपनीच्या नावावरील औद्योगिक कर्ज थकीत झाल्यानंतर बँकेत गहाण असलेली मशिनरी संगनमताने विकल्याचा आरोप आहे. या व्यवहारामुळे बँकेचे मोठे आर्थिक नुकसान झाल्याचे सांगितले जात आहे.

चाळीसगाव शहर पोलिसांनी गोपनीय माहितीच्या आधारे प्रशांत ☞(पान २ वर)

# शरद पवार पुन्हा रुग्णालयात दाखल



**मुंबई/प्रतिनिधी** :गेल्या काही दिवसांपासून राष्ट्रवादी काँग्रेसचे (एझ) अध्यक्ष शरद पवार यांची प्रकृती ठीक नाहीये. काही दिवसांपूर्वी त्यांना रुबी हॉल क्लिनीकमध्ये ॲडमिट केलं होतं. तिथे चार ते पाच दिवस उपचार घेतल्यानंतर त्यांना डिस्चार्ज देण्यात आला होता. तेव्हा डॉक्टरांनी पवारांना तब्येतीची विशेष काळजी घेण्याची सूचना दिली होती. त्यानंतर आता पुन्हा मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात शरद पवारां दाखल करण्यात आलं आहे. हे वृत्त समोर येताच राजकीय वर्तुळात आणि त्यांच्या कार्यकर्त्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झालं आहे.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, शरद पवार यांच्या प्रकृतीत कोणतीही गंभीर समस्या उद्भवलेली नाही. ते केवळ नियमित वैद्यकीय तपासणीसाठी रुग्णालयात दाखल झाले आहेत. वाढते वय, सततचे दौरे आणि राजकीय-सामाजिक कार्यक्रमांमधील व्यस्त दिनक्रम यामुळे डॉक्टरांनी त्यांना काही आरोग्य चाचण्या करून घेण्याचा सल्ला दिला ☞(पान २ वर)

# केरळचे माजी सीएम पी. विजयन यांच्यावर ईडीची छापेमारी

## समर्थकांचा ईडीच्या पथकावर हल्ला, कारवर वीटा फेकल्या

**तिरुवनंतपुरम** केरळमधील तिरुवनंतपुरम येथे माजी मुख्यमंत्री पी. विजयन यांच्या निवासस्थानी छापा टाकण्यासाठी आलेल्या अंमलबंदी संचालनालयाच्या (ईडी) पथकावर विजयन यांच्या समर्थकांनी हल्ला केला. १२ सदस्यीय पथकाने आज बेकरी जंक्शन येथील विजयन यांच्या निवासस्थानी छापा टाकला. त्यांच्या मुलीच्या 'एक्झालॉजिक सोल्युशन्स' या आयटी कंपनीशी संबंधित मनी लाँड्रिंग प्रकरणात हे छापे टाकण्यात आले. हे प्रकरण 'कोचीन मिनरल्स अँड रुटाइल लिमिटेड' (सीएमआरएल) द्वारे केलेल्या मनी लाँड्रिंगशी संबंधित आहे.



केरळ उच्च न्यायालयाने याचिका फेटाळली

ईडीचा तपास रद्द करण्याची मागणी कंपनीने केल्यानंतर दुसऱ्याच दिवशी, मंगळवारी केरळ उच्च न्यायालयाने सीएमआरएलची याचिका फेटाळली. ईडीने या प्रकरणात २०२४ मध्ये गुन्हा दाखल केला होता. सीएमआरएल नावाच्या कंपनीने २०१८-१९ दरम्यान विजयन यांची मुलगी टी. वीणा यांच्या 'एक्झालॉजिक सोल्युशन्स' या आयटी कंपनीला ?१.७२ कोटी दिले. कोणतेही सॉफ्टवेअर किंवा आयटी सेवा न देता, हे पैसे बनावट खर्च म्हणून देण्यात आले असल्याचा आरोप आहे. हा खुलासा झाल्यानंतर, ईडीने पीएमएलए अंतर्गत गुन्हा दाखल करून तपास सुरू केला.

या आरोपांची चौकशी करण्यासाठी ईडीने २०२४ मध्ये पीएमएलए अंतर्गत गुन्हा दाखल केला. हा ☞(पान २ वर)




जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# बकरी ईदसाठी शहरात पोलिसांचा तगडा बंदोबस्त

## नाकाबंदी, ड्रोनने राहणार वॉच



**अमरावती/प्रतिनिधीः-** देशभरात बकरी ईदचा उत्सव आज गुरुवार २८ मे रोजी साजरा करण्यात येणार आहे. या दिवशी मुस्लिम समाजाच्या वतीने कुर्बानी दिली जाते. बकरी ईद निमित्त शहरात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी पोलिसांचा तगडा बंदोबस्त राहणार आहे. पोलीस कर्मचारी तैनात राहणार आहे.

तसेच ड्रोन कॅमेराने निगराणी ठेवली जाणार आहे. शहरात पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या मार्गदर्शनात उपायुक्त श्याम घुगे ,रमेश धुमाळ, सहायक आयुक्त सह १५०० पोलीस अधिकारी, कर्मचारी बंदोबस्त मध्ये राहणार आहे. याव्यतिरिक्त ८०० होमगार्ड तैनात राहणार आहेत. शहरातील ८ सिलिंग बॉर्डरवर नाकाबंदी करण्यात येणार आहे.तसेच गोवंश कत्तली रोखण्यासाठी तीन पथक तैनात करण्यात आलेले आहे. विविध क्षेत्रामध्ये पोलिसांची पेट्रोलिंग सुरू राहणार आहे. विशेषतः नागपुरी गेट, गाडगे नगर, फ्रेजरपुरा व कोतवाली पोलीस ठाणे अंतर्गत एसआरपीएफ कंपनी तैनात राहणार आहे.

### महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा २०२६:

# अल्पसंख्य उमेदवारांसाठी विशेष परीक्षा केंद्र निश्चित

**अमरावती/प्रतिनिधीः-** शासन निर्णय दिनांक २३ ऑगस्ट २०१३ अन्वये महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या वतीने महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (TET)-२०२६ चे आयोजन रविवार, दि. २८ जून २०२६ रोजी करण्यात येणार आहे. सदर परीक्षा राज्यातील शिक्षक पात्रता निश्चित करण्याच्या दृष्टीने महत्त्वाची मानली जाते. बंगाली, कन्नड, तेलगु, गुजराथी व सिंधी माध्यमातील संबंधित सर्व विद्यार्थी व उमेदवारांनी आपल्या माध्यमासाठी निश्चित करण्यात आलेल्या जिल्ह्यांची माहिती परिषदेच्या अधिकृत संकेतस्थळावर तपासून आवश्यक ती नोंद घ्यावी, असे आवाहन महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेचे आयुक्त महेश चोथे यांनी केले आहे. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत प्रसिद्ध करण्यात आलेल्या निवेदनानुसार, बंगाली, कन्नड, तेलगु, गुजराथी व सिंधी माध्यमातील विद्यार्थी/उमेदवारांची राज्यातील संख्या तुलनेने कमी असल्याने संबंधित उमेदवारांसाठी विशेष परीक्षा केंद्र निश्चित करण्यात आले आहेत. या माध्यमांच्या उमेदवारांना उपलब्ध करून देण्यात आलेल्या जिल्ह्यांमध्येच परीक्षा केंद्रे निश्चित केली जाणार असल्याची माहिती परिषदेकडून देण्यात आली आहे. सविस्तर माहितीसाठी उमेदवारांनी परिषदेच्या www.mscepune.in या संकेतस्थळला भेट द्यावी. संबंधित सर्व विद्यार्थी व उमेदवारांनी आपल्या माध्यमासाठी निश्चित करण्यात आलेल्या जिल्ह्यांची माहिती तपासून आवश्यक ती नोंद घ्यावी, असेही परिषदेव्दारे आवाहन करण्यात आले आहे.

# फ्रेजरपुरात जुन्या वादातून तरुणावर जीवघेणा हल्ला

## चाकू-रॉडने मारहाण, पाच जणांविरुद्ध गुन्हा



**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील फ्रेजरपुरा परिसरात जुन्या वादातून एका २४ वर्षीय तरुणावर पाच जणांनी मिळून जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घटना रविवारी सायंकाळी घडली. लोखंडी रॉड, लाठी आणि चाकूने करण्यात आलेल्या या हल्ल्यात तरुण गंभीर जखमी झाला असून फ्रेजरपुरा पोलिसांनी पाच आरोपींविरुद्ध विविध गंभीर कलमांन्वये गुन्हा दाखल केला आहे.

जखमी तरुणाचे नाव नेहाल रामदास चौधरी (वय २४, रा. लायब्ररी चौक, फ्रेजरपुरा) असे आहे. तो मजुरीचे काम करतो. या प्रकरणात यश बियानी, विशाल मंडले, धिरज बरमैया, मयंक मंडले आणि राहुल श्रीवास (सर्व रा. फ्रेजरपुरा) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नेहाल चौधरी हा रविवारी सायंकाळी कामावरून दुचाकीने घरी परतत असताना फ्रेजरपुरा येथील सरकारी शौचालयाजवळ आरोपींनी त्याला अडवले. आठ दिवसांपूर्वी झालेल्या जुन्या भांडणाचा राग मनात धरून आरोपींनी त्याच्यावर अचानक हल्ला चढवला. यावेळी विशाल मंडले याने लोखंडी रॉडने नेहालच्या दोन्ही हातांवर वार केले. तर मयंक मंडले आणि राहुल श्रीवास यांनी त्याचे पाय पकडून ठेवले. धिरज बरमैया याने लाठीने दोन्ही पायांवर मारहाण केली. त्यानंतर यश बियानी याने चाकूने नेहालच्या डोक्यावर आणि डाव्या हातावर वार केल्याने तो गंभीर जखमी झाला. हल्ल्यात त्याच्या दुचाकीचेही नुकसान करण्यात आले. घटनेनंतर आरोपी घटनास्थळावरून पसार झाले. जखमी अवस्थेतील नेहालला त्याच्या नातेवाईकांनी तातडीने पोलिस ठाण्यात आणले. त्यानंतर वैद्यकीय तपासणी आणि जबाबाच्या आधारे फ्रेजरपुरा पोलिसांनी गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे.

# पोलीस आयुक्तालयात कर्मचाऱ्यांचा दरबार तक्रारींचे लवकर निराकरण करणारः सीपी ओला



**अमरावती/प्रतिनिधीः-** शहर पोलीस आयुक्तालय मध्ये कार्यरत कर्मचाऱ्यांच्या तक्रारीचे निवारण करण्याच्या उद्देशाने पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी आज बुधवार २७ मे रोजी कर्मचाऱ्यांचा दरबार आयुक्तालयाच्या बेसमेंट हॉलमध्ये आयोजित केला होता. शहरातील विविध पोलीस ठाण्यामध्ये कार्यरत अधिकारी कर्मचारी येथे पोहोचले होते. कर्मचाऱ्यांनी ड्युटी करताना त्यांना येणाऱ्या प्रशासकीय अडचण, वेतन व सेवा संबंधित तक्रारी, खाजगी अडचणी सह इतर तक्रारी पोलीस आयुक्तांसमोर मांडल्या. पोलीस आयुक्तांनी त्यांच्या अडचणी ऐकून घेतल्या आणि त्यांच्यासोबत चर्चा करून लवकरात लवकर त्याचे निराकरण करण्याचे आश्वासन दिले. त्यांनी सांगितले की पोलीस कर्मचाऱ्यांना येणाऱ्या अडचणींचे निवारण केले जाईल. कर्मचाऱ्यांचे समाधान आवश्यक आहे. कर्मचारी दिवस-रात्र कायदा व सुव्यवस्था कायम ठेवण्यासाठी कार्य करतात. त्यांच्या तक्रारीचे निवारण करण्यासाठी पोलीस विभागाच्या वतीने प्रयत्न केले जाईल असेही त्यांनी म्हटले. यावेळी डीसीपी रमेश धुमाळ, श्याम घुगे उपस्थित होते.

# नियमित मार्गाने धावणार अमरावती-पुणे एक्सप्रेस -प्रवाशांची गैरसोय टळणार



**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती – पुणे एक्स्प्रेससंदर्भात मोठा निर्णय घेण्यात आला आहे. पुणे मंडळांतर्गत तांत्रिक कामामुळे ही रेल्वेगाडी पर्यायी मार्गाने सोडण्याचा निर्णय घेण्यात आला होता. २७ आणि २८ मे रोजी सुटणाऱ्या अमरावती – पुणे व पुणे – अमरावती एक्स्प्रेस संदर्भात निर्णय बदलला आहे. हे दोन दिवस ही गाडी नियमित मार्गानेच धावणार आहे.

मध्य रेल्वेच्या पुणे मंडळामार्फत दौंड-मनमाड विभागातील विसापूर – रांजणगाव – सारोळा स्थानकांदरम्यान सुरू असलेल्या दुहेरीकरणाच्या कामामुळे अनेक रेल्वेगाड्यांचे नियोजित मार्ग बदलण्यात आले आहेत. यामध्ये गाडी क्रमांक ११०२६ व ११०२५ अमरावती – पुणे एक्स्प्रेसचा देखील मार्ग बदलण्यात आला होता. आता संबंधित निर्णयात सुधारणा करून रेल्वे प्रशासनाने या गाड्या त्यांच्या नियमित मार्गावरून चालविण्याचा निर्णय घेतला आहे. गाडी क्रमांक ११०२६ अमरावती – पुणे एक्सप्रेस अमरावतीहून आपल्या नियमित मार्गाने सुटेल व पुणे स्थानकावर पोहोचेल. गाडी क्रमांक ११०२५ पुणे – अमरावती एक्स्प्रेस २८ मे रोजी पुण्याहून आपल्या नियमित मार्गाने सुटेल व अमरावती स्थानकावर पोहोचेल, अशी माहिती मध्य रेल्वेच्या भुसावळ विभागाकडून देण्यात आली.

२८ आणि २९ मे रोजी मात्र पुणे – अमरावती एक्स्प्रेस पर्यायी मार्गाने धावणार आहे.मध्य रेल्वेच्या पुणे विभागातील दुहेरीकरण प्रकल्पांतर्गत ब्लॉक घेण्यात आला आहे. या कामामुळे काही रेल्वे गाड्यांच्या मार्गात तात्पुरते बदल करण्यात आले आहेत. गाडी क्रमांक ११०२६ अमरावती – पुणे एक्स्प्रेस २८ मे रोजी अकोला, पूर्णा, परभणी, लातूर रोड, कुर्डुवाडी, दौंड मार्गे धावणार आहे. गाडी क्रमांक ११०२५ पुणे – अमरावती एक्स्प्रेस २९ मे रोजी दौंड, कुर्डुवाडी, लातूर रोड, परभणी, पूर्णा, अकोला मार्गे धावेल. गाडी क्रमांक १२६२७ एसबीसी-नवी दिल्ली एक्स्प्रेस सोलापूर, कुर्डुवाडी, लातूर रोड, परभणी व मनमाड मार्गे धावेल. गाडी क्रमांक ११४१० निजामाबाद-पुणे एक्स्प्रेस २७ मे रोजी परभणी, लातूर रोड, कुर्डुवाडी, दौंड मार्गे धावेल. याशिवाय ही इतर अनेक रेल्वे गाड्यांच्या मार्गात बदल करण्यात आले आहेत. प्रवासापूर्वी गाड्यांच्या वेळापत्रकाची व मार्गातील बदलांची माहिती रेल्वेच्या अधिकृत संकेतस्थळावर किंवा चौकशी केंद्रातून तपासून घ्यावी. प्रवाशांनी सहकार्य करावे, असे आवाहन रेल्वे विभागाकडून करण्यात आले आहे.

## १ व १० वरील उर्वरित

### एमएनजीएलच्या सीएनजी गॅसच्या

टॅक्सी आणि खासगी गाड्यांमधून प्रवास करणे अधिक महाग होणार आहे.

दरम्यान, काही दिवसांपूर्वीच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील परिस्थिती पाहता नागरिकांना पेट्रोल, डिझेल आणि इंधनाचा अत्यंत जपून वापर करण्याचे आवाहन केले होते. मात्र, त्यानंतर लगेचच कंपन्यांनी इंधन दर वाढवण्यास सुरुवात केली आहे. जागतिक संकट पाहता आगामी काळात इंधनाचे भाव आणखी वाढण्याची शक्यता असल्याने सर्वसामान्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.

### विधानपरिषदेचा तिढा मुंबईतच

परिषदेत इतक्या आधी गोष्टी होत नाहीत, त्या वेळेवर होतात. त्यामुळे, उमेदवारी अर्ज भरतेवेळीच सर्वकाही अंतिम होईल, जागावाटप असेल किंवा उमेदवारांची नावे असतील, असेच फडणवीस यांनी सूचवले आहे. गृहमंत्री महोदय आमचे नेते आहेत, त्यांच्यासोबत बसून आम्ही चर्चा करत असतो. मात्र, विधानपरिषदेच्या जागेचा प्रश्न मुंबईतच सोडवला जाईल, असेही फडणवीस यांनी स्पष्ट केले. दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस पुणे आणि रायगड जिल्ह्यातील जागांसाठी आग्रही आहे, तर शिंदेंची शिवसेना संभाजीनगरची जागा आपल्याकडेच राहावी, यासाठी प्रयत्नशील असल्याचं दिसून येत आहे.

### गेलचा महाविक्रम मोडीत

षटकारांचा विक्रमच नव्हे, तर वैभवने ऋषभ पंत आणि यशस्वी जयसवाल यांच्याही विक्रमांना गवसणी घातली आहे. हैदराबादविरुद्धच्या सामन्यात अर्धशतक पूर्ण करताच वैभवने यंदाच्या हंगामात ६०० धावांचा टप्पा ओलांडला. यासह, आयपीएलच्या एकाच हंगामात ६०० किंवा त्याहून अधिक धावा करणारा तो आतापर्यंतचा सर्वात युवा खेळाडू ठरला आहे. यापूर्वी हा विक्रम दिल्ली कॅपिटल्सच्या ऋषभ पंतच्या नावावर (२०१८) होता.

याव्यतिरिक्त, आयपीएलमध्ये एका मोसमात सर्वाधिक धावा करणारा 'अनकॅप्ड' (भारतीय संघाकडून न खेळलेला) खेळाडू म्हणूनही वैभवने इतिहास रचला आहे. त्याने सनरायझर्स हैदराबादविरुद्धच्या सामन्यात एकूण ६३० धावांचा पल्ला गाठत यशस्वी जयसवालचा २०२३ मधील ६२५ धावांचा विक्रम मागे टाकला. तसेच, आयपीएलमधील डावाच्या पहिल्या षटकात सर्वाधिक षटकार मारण्याच्या बाबतीत त्याने ब्रेंडन मॅक्युलमच्या विक्रमाशी बरोबरी केली असून, या हंगामात त्याने पहिल्या षटकात एकूण १० षटकार ठोकले आहेत. अवघ्या १५ व्या वर्षी वैभवने गाजवलेली ही कामगिरी क्रिकेट जगतासाठी एक विस्मयकारक घटना मानली जात आहे.

### राज्याला पुन्हा अवकाळी

आहे. काही ठिकाणी गारपीट देखील झाली. मान्सूनपूर्व अवकाळी पावसाने गोरेगाव – कडोळी मार्गावरील ओढ्याला पूर आल्याने काही काळ वाहतूक ठप्प झाल्याचं पहायला मिळालं. मात्र या पावसामुळे जमीन भिजल्याने आता खरीपपूर्व मशागतीच्या कामाला वेग येणार आहे.

वाशिममध्येही पाऊस

वाशिम जिल्ह्यातील तोंडगाव फाटा परिसरात आज सायंकाळी अचानक झालेल्या गारपीट आणि जोरदार पावसामुळे नागरिकांना उकाड्यापासून मोठा दिलासा मिळाला. पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला आहे. मात्र अचानक आलेल्या या पावसामुळे नागरिकांची चांगलीच तारांबळ उडाल्याचं पहायला मिळालं.

### अमेरिकेचा इराणवर हवाई

थेट इशारा दिला आहे की, जर नवा संघर्ष सुरू झाला, तर अमेरिकेचे लष्करी तळ, ऊर्जा पायाभूत सुविधा आणि त्यांचे हितसंबंध थेट निशाण्यावर असतील. काही दिवसांपूर्वीच ध्ेंउण ने स्पष्ट केले होते की, अमेरिकेच्या कोणत्याही नव्या हल्ल्याला आधीपेक्षा अत्यंत हिंसक आणि कडक प्रत्युत्तर दिले जाईल, ज्याचे परिणाम संपूर्ण मिडल-ईस्टच्या बाहेरपर्यंत जाणवतील.

इस्त्रायलच्या विमानतळांवर अमेरिकन लढाऊ विमाने

दुसरीकडे, इराणसोबत तात्पुरता युद्धविराम झालेला असतानाही, अमेरिकेने इस्त्रायलमधील आपली लष्करी उपस्थिती कमी केलेली नाही. इस्त्रायलच्या 'बेन गुरियन' आणि 'रेमन' विमानतळांवर सध्या मोठ्या संख्येने अमेरिकन लढाऊ विमाने आणि हवेतच इंधन भरणारी विमाने तैनात आहेत. या लष्करी विमानांची संख्या इतकी जास्त आहे की, तिथल्या सामान्य प्रवाशांच्या विमानांवर याचा परिणाम होऊ लागला आहे. सध्यातरी ही विमाने तिथून हटवण्याची अमेरिकेची कोणतीही तयारी दिसत नाही.

### देवगिरी बँक फसवणूक

वाघ यांना ताब्यात घेत आर्थिक गुन्हे शाखेकडे सोपवले. न्यायालयाने त्यांना ४ दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. दरम्यान प्रशांत वाघ शिवसेना शिंदे गटाचे नेते तथा माजी खासदार उन्मेष पाटील यांचे नातेवाईक आहेत. त्यामुळे या घटनेने चाळीसगावसह जिल्ह्याच्या राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. या अटकमुळे उन्मेश पाटील यांच्या अडचणीत वाढ होण्याची शक्यता आहे.

आणखी काही नावे समोर येण्याची शक्यता

प्रशांत वाघ हे माजी खासदार उन्मेष पाटील यांचे नातेवाईक असल्याने या प्रकरणाला अधिक राजकीय रंग चढला आहे. आर्थिक गुन्हे शाखा आता मशिनरी विक्रीची प्रक्रिया आणि संबंधित व्यक्तींमधील आर्थिक व्यवहारांची सखोल चौकशी करत आहे. त्यामुळे येत्या काही दिवसांत या प्रकरणात आणखी धक्कादायक खुलासे होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे उन्मेष पाटील यांत्यासह प्रशांत वाघ आणि त्यांच्या इतर सहकाऱ्यांची अडचण वाढण्याची शक्यता आहे.

### शरद पवार पुन्हा

होता. त्यानुसार डॉक्टरांच्या देखरेखीखाली त्यांच्या चाचण्या सध्या सुरू आहेत.

शरद पवार रुग्णालयात दाखल झाल्याचं समजताच सोशल मीडियावर त्यांच्या प्रकृतीबाबत उलट सुलट चर्चा सुरू झाल्या आहेत. त्यांची प्रकृती बिघडल्याचे दावे केले जात आहेत. मात्र त्यांची प्रकृती पूर्णपणे ठीक असल्याची माहिती डॉक्टरांकडून देण्यात आली आहे. शरद पवारांना केवळ रुटीन चेकअप साठी रुग्णालयात दाखल केलं आहे. येथील चेक अप झाल्यानंतर पवारांना डिस्चार्ज देण्यात येईल. त्यामुळे राज्यभरातील कार्यकर्त्यांनी काळजी करू नये, अफवांवर विश्वास ठेवू नये, असं आवाहन राष्ट्रवादीकडून करण्यात आलं आहे.

### केरळचे माजी सीएम

मुद्दा विजयन सरकारसमोरील सर्वात राजकीयदृष्ट्या संवेदनशील वादांपैकी एक राहिला आहे. ईडीच्या तपासाव्यतिरिक्त, गंभीर फसवणूक तपास कार्यालय (एसएफआयओ) देखील या प्रकरणाचा तपास करत आहे.

### बुलढाण्यातच दरपत्रकांचा

निविदा किंवा GeM प्रक्रिया टाळण्यात आली असण्याची शक्यता नाकारता येत नाही. प्रशासकीय मान्यतेत तुटक खरेदी टाळण्याचे स्पष्ट नियम असतानाही प्रत्यक्ष व्यवहारात त्याचे पालन झाले का, याची चौकशी व्हावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

या प्रकरणात साठा नोंदवही, Issue Voucher, मागणीपत्रे, Purchase Orders, दरपत्रके, Comparative Statements, बिल व देयक नोंदी, प्रशासकीय व तांत्रिक मान्यता, निधी वितरण आदेश, पुरवठादार नोंदवही, GeM पोर्टल व्यवहार तसेच उत्पादक कंपन्यांच्या मूळ दरांची तुलना यांची सखोल तपासणी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

तसेच L-1 पुरवठादाराला डावलण्यात आले का, Comparative Statement मध्ये फेरफार झाला का, मंजूर दर आणि GeM दरांमध्ये तफावत आहे का, प्रत्यक्षात साहित्य प्राप्त झाले का आणि आर्थिक नियमांचे उल्लंघन झाले का, याची स्वतंत्र पडताळणी करण्याची मागणी तक्रारीत करण्यात आली आहे.

तक्रारदाराने प्रथम अपील सुनावणीदरम्यान काही अधिकाऱ्यांकडून दबावाचे वातावरण निर्माण झाल्याचाही आरोप केला आहे. 'हमको हाईकोर्ट की धमकी मत दो', 'हम देख लेंगे' अशा स्वरूपाची वक्तव्ये करण्यात आल्याचा दावा तक्रारीत करण्यात आला आहे. तसेच या संदर्भातील काही संभाषणांचे ऑडिओ रेकॉर्डिंग आपल्या ताब्यात असल्याचा दावा तक्रारदाराने केला असून, निष्पक्ष चौकशी झाल्यास ते सादर करण्याची तयारीही दर्शविली आहे.

या आरोपांबाबत संबंधित अधिकाऱ्यांची अधिकृत भूमिका अद्याप समोर आलेली नाही.

प्रकरणातील आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे बुलढाणा जिल्हा हिवताप अधिकारी पदाचा अतिरिक्त कार्यभार एका वर्ग-३ कर्मचाऱ्याकडे दीर्घकाळ असल्याचा आरोप. संबंधित व्यक्तीकडून दोन वर्षांपूर्वी DDO अधिकार काढून घेण्यात आले होते का, आणि त्यानंतरही आर्थिक कागदपत्रांवर त्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत का, याची Signature Verification सह चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

तक्रारदाराने सहाय्यक संचालक हिवताप यांच्याकडून चौकशी न करता स्वतंत्र समिती स्थापन करण्याची मागणी केली आहे. उपसंचालक आरोग्य सेवा कार्यालयातील सहाय्यक संचालक वैद्यकीय यांच्या अध्यक्षतेखाली वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांचा समावेश असलेली समिती गठीत करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

याशिवाय NHM विभागातील अनुभवी अधिकाऱ्यांचाही समावेश करून आर्थिक, प्रशासकीय आणि खरेदी प्रक्रियेची बहुआयामी चौकशी व्हावी, असे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

### वर्क फ्रॉम होमच्या आमिषातून

आरोपीने महिलेचे अश्लील फोटो व्हॉट्सअॅपवर पाठवत ते सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी दिली. बदनामीच्या भीतीने घाबरलेल्या महिलेने आरोपीच्या सांगण्यानुसार यूपीआयच्या माध्यमातून वेळोवेळी रक्कम पाठविली. अशा प्रकारे आरोपीने महिलेकडून एकूण ८ लाख ५९ हजार ३३२ रुपये उकळल्याचे समोर आले आहे. सततच्या धमक्या, मानसिक छळ आणि आर्थिक फसवणुकीमुळे त्रस्त झालेल्या महिलेने अखेर धाडस करत वरुड पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. या तक्रारीवरून वरुड पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध विनयभंग, धमकी, फसवणूक आणि माहिती तंत्रज्ञान कायद्यान्वये गुन्हा नोंदविला असून सायबर शाखेच्या मदतीने तपास सुरू केला आहे. दरम्यान, पोलिसांनी नागरिकांना सोशल मीडियावरील अनोळखी लिंक, वर्क फ्रॉम होम ऑफर आणि टास्क बेस्ड कमाईच्या आमिषांपासून सावध राहण्याचे आवाहन केले आहे. कोणतीही वैयक्तिक माहिती, फोटो किंवा आर्थिक व्यवहार अनोळखी व्यक्तींशी शेअर करू नयेत, असेही पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

### सात फुटाच्या अजगरासह १०

हालचाली आढळून आल्या.तेव्हा सर्पमित्र शुभम विघे यांना घटनास्थळी पाचारण केले असता तेथे एक ७ फुटाचा अजगर हा उन्हामुळे जमिनीच्या बिळात सुरक्षिततेच्या दृष्टीने आपल्या अंड्यासह बसला होता.त्याचे रेस्क्यू करीत असताना त्याठिकाणी असलेल्या अंड्याना जराही ईजा न होऊ देता अजगरासह १० अंड्याना देखील सुखरूप बाहेर काढले. तसेच नजीकच्या वनविभागाला याबाबत माहिती देऊन अजगर व अंडे दोनही सुपूर्त केले. यावेळी अजगाराचे रेस्क्यू करण्यासाठी ऋषभ शेंडे व जीवन शेंडे,यश विघे यांनी देखील सर्पमित्र शुभम विघे यास मदत केली.

**अजगारासह अंडे हस्तगत झाल्याची पहिलीच घटना-**

सापांचे अंडे,त्यांची पिल्ले अनेकदा हस्तगत झाल्याचे आपण बघितले असेल किंवा अनेकदा मोठमोठे अजगर देखील बघितले असेल मात्र आज पहिल्यांदा अजगरासह त्याची १० अंडे मिळाल्याची बहुधा ही पहिलीच घटना समोर आली आहे.

### जुन्या वैमनस्यातू तरुणावर चाकू

झाले होते. त्याचवेळी आरोपी सलमान असलम हा मद्यधुंद अवस्थेत तेथे पोहोचला आणि फिर्यादीविषयी उपस्थितांमध्ये उलटसुलट बोलू लागला. समारंभात तणाव निर्माण होत असल्याचे लक्षात येताच काही नागरिकांनी हस्तक्षेप करून त्याला शांत करण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर आरोपी बाहेर निघून गेला. मात्र काही वेळाने त्याने बाहेर उभी असलेल्या फिर्यादीच्या भावाच्या वाहनाची तोडफोड सुरू केली. वाहनाची तोडफोड होत असल्याचे लक्षात येताच फिर्यादीचा भाऊ जाब विचारण्यासाठी बाहेर गेला. यावेळी आरोपी सलमानने वाहन फोडल्याची कबुली देत त्याच्याशी वाद घालत मारहाण सुरू केली. वाद सुरू असतानाच दुसरा आरोपी शहजाद घटनास्थळी आला आणि त्याने चाकूने तरुणाच्या छातीवर व मांडीवर वार केले. अचानक झालेल्या या हल्ल्यामुळे लग्नसमारंभात एकच गोंधळ उडाला. जखमी तरुणाच्या शरीरातून मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव होत असल्याने उपस्थितांनी तातडीने त्याला रुग्णालयात दाखल केले. सध्या त्याच्यावर उपचार सुरू असल्याची माहिती आहे.

### बकरी ईदपूर्वी अमरावतीत्त

पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त, सहाय्यक पोलीस आयुक्तांसह गुन्हे शाखा आणि स्थानिक पोलीस स्टेशनचे अधिकारी सहभागी झाले होते.

बडनेरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील अंजनगावबारी येथे रोहन बाळू डोळे (वय २२) हा युवक अवैधरित्या लोखंडी तलवार घेऊन फिरताना पोलिसांच्या ताब्यात आला. त्याच्याविरुद्ध आर्म अॅक्टनुसार गुन्हा दाखल करण्यात आला.

फ्रेजरपुरा पोलीस ठाण्याच्या हद्दीत प्रथमेश तलाव परिसरात सुनिल राधेश्याम जांभुळकर (वय ३८) याच्याकडून विविध कंपनींच्या देशी दारूच्या नऊ पेट्या जप्त करण्यात आल्या. सुमारे ४३ हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केला. तर गाडगेनगर परिसरातील एका बिअर शॉपीवर कारवाई करत ग्राहकांना बसून मद्यपानासाठी जागा उपलब्ध करून दिल्याप्रकरणी दुकान मालक व चालकाविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

**ऑनलाइन लॉटरीच्या नावाखाली जुगार-** राजापेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गोपाल नगर परिसरात ऑनलाइन लॉटरी सेंटरच्या नावाखाली अवैध 'फन टारगेट' चक्री जुगार सुरू असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी छापा टाकला. यावेळी दोन आरोपींना ताब्यात घेऊन सुमारे १९ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

**सार्वजनिक ठिकाणी गांजा सेवन-** नागपुरी गेट परिसरात सार्वजनिक ठिकाणी गांजाचे सेवन करणाऱ्या दोन युवकांवर एनडीपीएस कायद्यान्वये कारवाई करण्यात आली. तसेच रात्री संशयास्पद हालचाली करणाऱ्या दोन इसमांवरही महाराष्ट्र पोलीस कायद्यानुसार प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली. गाडगेनगर आणि नांदगाव पेठ परिसरातील वाईन शॉपीजवळ सार्वजनिक ठिकाणी मद्यपान करणाऱ्या तब्बल २० जणांवर पोलिसांनी कारवाई केली. याशिवाय १५ फरार आणि पाहिजे आरोपींचीही तपासणी करण्यात आली. शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी अशा प्रकारचे नाकाबंदी आणि कोंबींग ऑपरेशन पुढेही सातत्याने राबविण्यात येणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे. या मोहिमेमुळे गुन्हेगारी प्रवृत्तींवर मोठ्या प्रमाणात अंकुश बसण्यास मदत होणार असल्याचा विश्वास पोलिसांनी व्यक्त केला.

### शहरात आठ ठिकाणी झाडे

अधिकारी तत्काळ घटनास्थळी दाखल झाले. अग्निशमन विभागाने पडलेली झाडे हटवून वाहतुकीसाठी रस्ते मोकळे केले. सुदैवाने या घटनांमध्ये कोणतीही जीवित किंवा वित्तीय हानी झाली नसल्याची माहिती प्रशासनाने दिली.

### युवक काँग्रेस तर्फे 'आवाज

असल्याची माहिती प्रदेशाध्यक्ष शिवराज मोरे यांनी दिली आहे. त्यांनी सांगितले की शहरातील कचरा व्यवस्थापन, ढासळलेली आरोग्य सुविधा, बंद पडलेल्या सरकारी शाळा,वाढते शहरीकरण, अतिक्रमण रखडलेले उडान पूल, बेरोजगारी या शहरातील प्रमुख समस्या आहे. या समस्या सोडवण्यासाठी स्वच्छता कंत्राटामध्ये पारदर्शकता आणण्याची गरज आहे. सरकारी रुग्णालयामध्ये पुरेशी व अत्याधुनिक सुविधा पुरविण्यासाठी कार्य करणार असून महानगरपालिकेच्या शाळेमध्ये शैक्षणिक गुणवत्ता वाढवण्यासाठी पाऊले उचलले जाणार आहे. नवीन निर्माण झालेल्या नागरी वस्त्यांमध्ये रस्ते पाणी व वीज पुरवठा उपलब्ध करून देण्यासाठी पाठपुरावा केला जाणार आहे. हॉकर्स झोन उभारण्यासाठी प्रयत्न, संथ गतीने सुरू उडान पुलाचे बांधकाम करायला गती मिळण्यासाठी प्रयत्न या सह इतर विषयावर मोहीमेच्या माध्यमातून लढा दिला जाणार आहे. शहराला स्वच्छ, सुंदर, सुरक्षित बनविण्यासाठी प्रयत्न असल्याचेही ते म्हणाले. पत्रकार परिषदेमध्ये राहुल येवले, वैभव देशमुख, गुड्डू हमीद, निलेश गुहे, परीक्षित जगताप, नितीन काळे, सागर कलाने आदि उपस्थित होते.

# जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ गुरुवार, २८ मे २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# कृषी अभियानांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी यंत्रणांनी समन्वयाने काम करावे- जिल्हाधिकारी

■ प्रतिनिधी | वाशिम ■

जिल्ह्यात कृषी उत्पादनवाढ, अन्न सुरक्षा बळकटीकरण आणि शेतकरी सक्षमीकरणाच्या उद्देशाने राबविण्यात येणाऱ्या कडधान्य आत्मनिर्भरता अभियान, राष्ट्रीय खाद्यतेल अभियान–तेलबिया तसेच राष्ट्रीय अन्न सुरक्षा व पोषण अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करावी. कृषी विभागासह विविध यंत्रणांच्या समन्वयातून ही अभियाने यशस्वी करून जिल्ह्यातील शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी सर्वांनी सज्ज राहावे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले.

## कृषी विषयक विविध समित्यांची आढावा बैठक संपन्न



या तिन्ही महत्त्वपूर्ण अभियानांच्या सुयोग्य संचलनासाठी आयोजित जिल्हास्तरीय समित्यांच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीस जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी आरिफ शाहा, आत्मा प्रकल्प संचालक अनिसा महाबळे, उपविभागीय कृषी अधिकारी संतोष वाळके, कृषी उपसंचालक हिना शेख, कृषी विकास अधिकारी अभिजित देवगीरकर आदी उपस्थित होते. राष्ट्रीय अन्न सुरक्षा आणि पोषण अभियानातून कडधान्य घटक स्वतंत्र करून रब्बी हंगामापासून कडधान्य आत्मनिर्भरता अभियान राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या अभियानांतर्गत जिल्ह्यात कडधान्य लागवड, उत्पादन व उत्पादकता वाढीसाठी वार्षिक कृती आराखडा तयार करण्यात येणार असून शेतकऱ्यांना प्रमाणित बियाण्यांचे वितरण, प्रशिक्षण, शेतकरी शेतीशाळा तसेच कृषी विज्ञान केंद्रामार्फत आद्यरेषीय समूह प्रात्यक्षिके राबविण्यात येणार आहेत. सन २०२६-२७ साठी सलग गट प्रात्यक्षिकांसाठी नियोजन करण्यात आले असून प्रमाणित बियाणे वितरण, बियाणे उत्पादन, प्रशिक्षण तसेच प्रक्रिया युनिट स्थापनेसाठी विविध घटकांचा आराखडा मंजूर करण्यात आला आहे. अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी कृषी विभाग, नाबार्ड, कृषी विद्यापीठ, कृषी विज्ञान केंद्र आणि शेतकरी उत्पादक संस्थांच्या समन्वयावर भर द्यावा, असे निर्देश जिल्हाधिकारी यांनी दिले.

राष्ट्रीय खाद्यतेल अभियान–तेलबिया अंतर्गत जिल्ह्यात तेलबिया लागवड आणि उत्पादनवाढीसाठी मूल्य साखळी भागीदार निवड प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. या समितीमार्फत तेलबिया कृती आराखडा तयार करणे, बी-बियाण्यांच्या मागणीचे नियोजन, पात्र शेतकऱ्यांना बियाणे वितरण, शेतकरी प्रशिक्षण व शेतीशाळांचे आयोजन तसेच शेतकरी उत्पादक कंपन्या, सहकारी संस्था किंवा खाजगी संस्थांची मूल्य साखळी भागीदार म्हणून निवड करण्यात येणार आहे. यामध्ये शेतकऱ्यांना पीक विमा, सूक्ष्म सिंचन आणि कृषी पत योजनांशी जोडून उत्पादनक्षमता वाढविण्यावर विशेष भर द्यावा. सुधारित तंत्रज्ञान, सुधारित वाण आणि काढणीनंतरच्या तंत्रज्ञानाबाबत शेतकऱ्यांची क्षमता वाढविण्यासाठी प्रशिक्षण कार्यक्रम प्रभावीपणे राबवावेत, असेही जिल्हाधिकारी यांनी सांगितले.

# शेतरस्त्यासाठी १०० हून अधिक शेतकऱ्यांचा इशारा

■ प्रतिनिधी | मालेगाव ■



तालुक्यातील खिर्डा येथील १०० हून अधिक शेतकरी बांधवांनी त्यांच्या शेतात जाण्यासाठी अधिकृत व सुरक्षित रस्ता उपलब्ध करून देण्याची मागणी करत तहसीलदारांना निवेदन दिले आहे. मालेगाव ते शेलू रोडपासून जुन्या सर्व तिर्थकडे जाणाऱ्या परिसरातील शेतकऱ्यांना आजही शेतात जाण्यासाठी योग्य रस्ता नसल्याने मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

शेतकऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, रस्ता नसल्यामुळे ट्रॅक्टर, शेती अवजारे, बियाणे, खत तसेच शेतीमालाची वाहतूक करणे अत्यंत कठीण झाले आहे.

## प्रश्न न सुटल्यास रस्ता रोको आंदोलन

खरीप हंगाम तोंडावर आला असताना मशागत आणि पेरणीचे काम अडचणीत आले असून यामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

यापूर्वी अनेक वेळा प्रशासनाला निवेदने देऊनही केवळ आश्वासने मिळाली, मात्र प्रत्यक्ष कार्यवाही करण्यात आलेली नाही, असा आरोपही शेतकऱ्यांनी केला आहे. त्यामुळे प्रशासनाने तात्काळ स्थळ पाहणी करून शेतरस्त्याचा प्रश्न मार्गी लावावा, अन्यथा सर्व शेतकरी लोकशाही मार्गाने तीव्र 'रस्ता रोको आंदोलन' छेडतील, असा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे.

'शेतकऱ्यांच्या संयमाचा अंत पाहू नका, कारण अन्नदाता जेव्हा रस्त्यावर उतरतो तेव्हा आंदोलन नव्हे तर वेदना बोलत असतात,' अशी भावना यावेळी शेतकऱ्यांनी व्यक्त केली.

निवेदन देताना बहुसंख्येने खिर्डा येथील शेतकऱ्यांची उपस्थिती होती.

# सणोत्सव व पोटनिवडणूक पार्श्वभूमीवर जिल्ह्यात प्रतिबंधात्मक आदेश लागू

■ प्रतिनिधी | वाशिम ■

जिल्ह्यात दि. २७ मे २०२६ रोजी मुस्लिम धर्मीयांचा 'बकरी ईद' सण (चंद्र दर्शनानुसार एक दिवस मागे पुढे), दिनांक २८ मे रोजी स्वातंत्र्यवीर सावरकर जयंती तसेच दि. ३१ मे रोजी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती विविध ठिकाणी उत्साहात साजरी होणार असून त्यानिमित्त मिरवणुका, सामूहिक पूजा व विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. तसेच मानोरा नगर पंचायत पोटनिवडणुकीमुळे संबंधित परिसरात आदर्श आचारसंहिता लागू आहे. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी जिल्हादंडाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी प्रतिबंधात्मक आदेश लागू केले आहेत.

कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी मुंबई पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) (३) अंतर्गत प्रतिबंधात्मक आदेश लागू करणे आवश्यक असल्याचे जिल्हा पोलिस अधीक्षक यांनी नमूद केले होते. त्यानुसार जिल्हादंडाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी संपूर्ण जिल्ह्यात दि. २७ मे २०२६ पासून ते दि. ८ जून २०२६ रोजी रात्री २४ वाजेपर्यंत प्रतिबंधात्मक आदेश लागू केले आहेत.

या आदेशान्वये शस्त्रे, तलवारी, भाले, दंडे, लाठ्या, सुरे किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येतील अशा वस्तूजवळ बाळगण्यास मनाई करण्यात आली आहे. तसेच दाहक किंवा स्फोटक पदार्थ वाहून नेणे, दगड किंवा क्षेपणास्त्रे फेकण्यासाठीची साधने जमा करणे किंवा तयार करणे यावरही बंदी घालण्यात आली आहे.

# कारंज्यातील प्रशिक ग्रामीण पतसंस्थेवर आर्थिक गैरव्यवहाराचा आरोप; ठेवीदारांचा संताप

■ प्रतिनिधी | कारंजा ■

शहरातील प्रशिक ग्रामीण सहकारी पतसंस्था शाखा कारंजा लाड येथे ठेवीदारांचे कोट्यवधी रुपये अडकून पडल्याचा गंभीर आरोप समोर आला असून ठेवीदारांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. मुदतपूर्ती होऊनही पैसे मिळत नसल्याने अनेक नागरिकांना वारंवार पतसंस्थेच्या कार्यालयाच्या चकरा माराव्या लागत असल्याचे सांगितले जात आहे.

निवृत्त पोलिस कर्मचारी प्रकाश रामचंद्र पडघान यांनी सहा लाख रुपयांच्या मुदत ठेवी परत मिळत नसल्याची लेखी तक्रार सहाय्यक निबंधक कार्यालयाकडे दाखल केली आहे.

खात्यात पुरेशी रक्कम नसताना चेक देण्यात आल्याचा गंभीर आरोपही त्यांनी केला आहे. त्यामुळे ठेवीदारांची फसवणूक होत असल्याची चर्चा शहरात रंगली आहे. दरम्यान, अनेक ठेवीदारांचे पैसे अडकले असल्याने कुटुंबांवर आर्थिक संकट ओढवले असल्याची माहिती समोर येत आहे. या प्रकरणात सहाय्यक निबंधक कार्यालय गुन्हे दाखल करण्यास टाळाटाळ करीत असल्याचा आरोप ठेवीदारांकडून करण्यात येत आहे.संतप्त नागरिकांनी संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून संबंधित व्यवस्थापन, संचालक मंडळ व जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

**'सहा लाखांसाठी निवृत्त पोलिस कर्मचाऱ्यांची फरफट!'**

प्रकाश पडघान यांनी सहा लाख रुपयांच्या मुदत ठेवी परत मिळवण्यासाठी अनेकदा पतसंस्थेच्या चकरा मारल्या. मात्र खात्यात पैसे नसताना चेक देण्यात आल्याचा आरोप समोर आल्याने ठेवीदारांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

# महात्मा फुले भाजी मार्केट हागणदारी मुक्त करा

**वाशीम :** शहरातील पाटणी चौक येथे असलेले महात्मा फुले भाजी मार्केटची झालेली दूर अवस्थेबाबत मनसे चे मा जिल्हाध्यक्ष मनिष डांगे यांच्या मार्गदर्शनात मनसे चे मा शहर अध्यक्ष गणेश इगोले यांनी नगरपरिषद चे मुख्याधिकारी यांना निवेदन देऊन महात्मा फुले भाजी मार्केट समस्या बाबत अवगत केले महात्मा फुले भाजी मार्केटच्या कमानीला अनेक वर्षापासून रंगरंगोटी नाही महात्मा फुले भाजी मार्केट मध्ये घाणीचे साम्राज्य, महात्मा फुले भाजी मार्केटचा पडलेला जिना, पडलेला स्लॅप मार्केट मध्ये ग्राहकांना ये जा करण्यासाठी लावण्यात आलेल्या पिल्लर मधील लोखंडी खांबा चोरून नेल्या आहेत या सर्व बाबी बाबत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे मा. शहराध्यक्ष गणेश इंगोले यांनी वारंवार निवेदन देऊनही कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही सात दिवसात कारवाई करा अन्यथा महात्मा फुले भाजी मार्केट वर बोंबाबोंब आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने देण्यात येत आहे.


## जाहीरनामा

सर्वत्र लोकांना कळविण्यात येते की, अर्जदार श्री कुंदनसिंह भरतसिंह रघुवंशी रा. वाशिम ता. जि. वाशिम यांनी संदर्भेय अर्ज या कार्यालयात सादर केला असून त्यांनी त्यांचे अर्जामध्ये नमुद केले आहे की, माझी मौजे चिखली बु. येथे गट नं १२२ मध्ये जमिन असून त्यामध्ये त्यांचे नांव चुकीने कुंदनसिंह मोहनसिंह रघुवंशी असे झालेले आहे परंतु माझे नांव हे कुंदनसिंह भरतसिंह रघुवंशी असे आहे. त्याबाबत मुळ कागदपत्रे व राजपत्र सुध्दा सादर केले आहे. तेव्हा सदरचे राजपत्रानुसार माझे वरील गटाच्या ७/१२ मध्ये नांव दुरूस्ती करून कुंदनसिंह भरतसिंह रघुवंशी असे करण्यात यावे याबाबत अर्ज या कार्यालयात सादर केला आहे.

तेव्हा अर्जदार यांचे अर्जानुसार मौजे चिखली बु. ता. जि. वाशिम येथील त्यांचे ताब्यातील व वहीतीमधील गट नं १२२ च्या ७/१२ वर चुकीने कुंदनसिंह मोहनसिंह रघुवंशी झालेले नांव कुंदनसिंह भरतसिंह रघुवंशी असे दुरूस्ती करण्यास हरकत व आक्षेप असल्यास सदर जाहीरनामा प्रसिध्द झाल्याचे दिनांकापासून ७ दिवसाचे आत त्यांनी लेखी या कार्यालयात कळवावे. मुदतीनंतर प्राप्त आक्षेप / हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- २०/०५/२०२६
ठिकाण :- वाशिम

शिक्का

**(निलेश पळसकर)**
तहसिलदार वाशिम


# एमपीएससी पूर्व परीक्षा २०२६
# परीक्षा केंद्र परिसरात प्रतिबंधात्मक आदेश लागू

■ प्रतिनिधी | वाशिम ■



महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित गट-अ व गट-ब संयुक्त पूर्व परीक्षा-२०२६ च्या पार्श्वभूमीवर वाशिम जिल्ह्यातील परीक्षा केंद्र परिसरात भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३(३)अन्वये प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आले आहेत. जिल्हादंडाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी हे आदेश जारी केले आहेत.

सदर परीक्षा रविवार, दि. ३१ मे २०२६ रोजी सकाळी १० ते दुपारी १२ वाजेपर्यंत तसेच दुपारी ३ ते ५ वाजेपर्यंत आयोजित करण्यात आली आहे. वाशिम शहरातील चार परीक्षा उपकेंद्रांवर ही परीक्षा पार पडणार आहे. यामध्ये आर ए कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, राणी लक्ष्मीबाई कन्या शाळा व कनिष्ठ महाविद्यालय तसेच पी. एम. श्री जवाहर नवोदय विद्यालय या उपकेंद्रांचा समावेश आहे.

परीक्षेच्या दिवशी परीक्षा केंद्रांच्या १०० मीटर परिसरात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी तसेच परीक्षेसंदर्भातील गैरप्रकारांना आळा बसावा यासाठी हे आदेश लागू करण्यात आले आहेत. आदेशानुसार ओळख पत्राशिवाय परीक्षा केंद्र परिसरात प्रवेश करण्यास मनाई करण्यात आली आहे. तसेच केंद्राधिकारी, उपकेंद्रप्रमुख, पर्यवेक्षक, सहाय्यक कर्मचारी, परीक्षार्थी आणि प्रशासनाने नियुक्त केलेले अधिकारी-कर्मचारी वगळता इतर चारपेक्षा अधिक व्यक्तींना परिसरात प्रवेश करता येणार नाही. याशिवाय परीक्षा केंद्रांच्या १०० मीटर परिसरातील सार्वजनिक दूरध्वनी, आंतरजिल्हा दूरध्वनी सेवा, आंतरराष्ट्रीय दूरध्वनी सेवा, छायांकित प्रत सेवा, दूरप्रेषण सेवा, ई-मेल, ध्वनीक्षेपक आदी सुविधा सुरू ठेवण्यास बंदी घालण्यात आली आहे. परीक्षा केंद्र परिसरात वाहनांची जाणीवपूर्वक कोंडी करणे तसेच भ्रमणध्वनी, बिनतारी संदेश यंत्रणा, रेडिओ, दूरदर्शन, गणकयंत्र आणि संगणकाचा वापर करण्यासही प्रतिबंध करण्यात आला आहे.

सदर आदेशांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम २२३ कारवाई करण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# आ. भावना गवळी यांची बोरकर यांच्या निवासस्थानी सांत्वनपर भेट

■ प्रतिनिधी | वाशिम ■

आमदार भावनाताई गवळी पाटील यांनी आज २६ मे रोजी निरंकारी मिशनचे प्रचारक तथा शिक्षक जनादन बोरकर यांच्या निवासस्थानी भेट देऊन बोरकर परिवाराचे सांत्वन केले. वाशीम येथील नवीन आययुडीपी कॉलनी मधील रहिवाशी , माजी गट शिक्षणाधिकारी विश्वनाथ बोरकर यांचे २२ मे रोजी अल्पशा आजाराने निधन झाले . स्व . विश्वनाथ बोरकर हे वारकरी संप्रदायातील सक्रिय तथा समाजाभिमुख व्यक्तिमत्व असल्याने वाशीम जिल्ह्यात त्यांचा मोठ्या प्रमाणात चाहता वर्ग आहे . विश्वनाथ बोरकर यांच्या निधनाची वार्ता कळताच आमदार भावनाताई गवळी यांनी त्यांच्या नवीन आययुडीपी परिसरातील निवासस्थानी भेट देऊन बोरकर परिवाराचे सांत्वन केले.

# 'उपजिल्हा रुग्णालयात सुरक्षा की बेफिकिरी?' – मेस्को सुरक्षा यंत्रणेवर गंभीर आरोप

■ प्रतिनिधी | कारंजा ■

कारंजा उपजिल्हा रुग्णालयातील सुरक्षा व्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून मेस्को सुरक्षा संस्थेच्या मनमानी कारभाराविरोधात मनसेचे प्रभारी शहराध्यक्ष कपिल महाजन यांनी जिल्हा शल्य चिकित्सकांकडे तक्रार दाखल केली आहे. सुरक्षारक्षकांकडून कामगार कायद्यांचे उल्लंघन, ड्युटीवरील निष्काळजीपणा, महिला रक्षकांच्या माध्यमातून खोट्या तक्रारींचा दबाव आणि रुग्णांच्या सुरक्षेशी खेळ सुरू असल्याचे गंभीर आरोप या निवेदनातून करण्यात आले आहेत.



कपिल महाजन यांनी दिलेल्या निवेदनानुसार, कारंजा उपजिल्हा रुग्णालयातील सुरक्षारक्षकांकडून सलग १६ ते २४ तास ड्युटी करून घेतली जात असून त्यामुळे रक्षक थकव्यामुळे ड्युटीवरच झोपलेले दिसतात. अनेकदा ते आपले कर्तव्य सोडून रुग्णालय परिसरात फिरत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. ही बाब सीसीटीव्हीमध्ये स्पष्ट दिसून येईल, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

याच अत्याधिक कामाच्या तणावामुळे मागील वर्षी महेश विभुते या सुरक्षा रक्षकाचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाल्याचा धक्कादायक दावा देखील करण्यात आला आहे. एवढी गंभीर घटना घडूनही मेस्को प्रशासनाने कोणतीही सुधारणा केली नसल्याचे निवेदनात म्हटले आहे.

रुग्णालयातील सुरक्षेचा स्तर इतका खालावला असल्याचा आरोप आहे की, मोकाट कुत्रे थेट वार्डपर्यंत पोहोचत असून रुग्णांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे. संसर्गजन्य परिस्थिती वाढण्याची भीतीही व्यक्त करण्यात आली आहे.

निवेदनात मेस्को अधिकाऱ्यांवर अरेरावीची भाषा वापरणे, वैद्यकीय प्रशासनालाही न जुमानणे आणि चौकशी टाळण्यासाठी महिला सुरक्षा रक्षकांच्या माध्यमातून खोट्या तक्रारींचा दबाव निर्माण करण्याचे गंभीर आरोप करण्यात आले आहेत. ड्युटीवरील निष्काळजीपणाबद्दल विचारणा करणाऱ्या डॉक्टर किंवा कर्मचाऱ्यांवरही भविष्यात बिनबुडाचे आरोप होऊ शकतात, अशी भीती व्यक्त करण्यात आली आहे.


# नगर परिषद कार्यालय, वाशिम

## निविदा सूचना २०२६-२७ क्र. २ (Open Tender)

वाशिम नगर परिषद, वाशिम जि. वाशिम कडून नगर परिषद निधी अंतर्गत खालील नमूद कामांसाठी टक्केवारी स्वरुपात दोन लिफाफा पध्दतीने मोहरबंद निविदा दिनांक ०९.०६.२०२६ रोजी सांय ५.०० वा. पर्यंत न.पा. आवक जावक शाखेत मागवित आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय किंमत रुपये | बयाणा रक्कम रुपये | निविदा संचाची किंमत | कंत्राटदाराचा वर्ग | कामाची मुदत पावसाळा धरून |
|---|---|---|---|---|---|---|
| नगर परिषद निधी अंतर्गत | | | | | | |
| 1 | वाशिम न. प. प्रभाग क्र. 7 मध्ये सोनखास रोडवरील विराज काळे घर ते इढोळे घरापर्यंत सिमेंट कॉंक्रेट नाली बांधकाम करणे | 409921 | 4099 | 590 | 8 व त्यावरील | 100 दिवस |
| 2 | चरण सिंग राठोड घरा जवळ सिमेंट कॉंक्रिट नाली बांधणे | 412837 | 4128 | 590 | 8 व त्यावरील | 100 दिवस |
| 3 | एस. एन. लांभाडे आणि गौरव नथवानी यांचे घरासमोर पेव्हर ब्लॉक बसविणे | 401475 | 4020 | 590 | 8 व त्यावरील | 100 दिवस |
| 4 | हिरामन इंगोले घराजवळ व विविध ठिकाणी सिमेंट कॉंक्रेट नाली बांधणे | 413563 | 4140 | 590 | 8 व त्यावरील | 100 दिवस |
| 5 | महाराणा प्रताप चौका मध्ये मुन्नाभाऊ ठाकूर घर ते हनुमान मंदिरा पर्यंत सिमेंट कॉंक्रिट नाली व धापा बांधणे | 373269 | 3740 | 590 | 8 व त्यावरील | 100 दिवस |
| 6 | प्र.क्र. 15 मध्ये हुसेन गवळी घर ते युनुस बागवान घरापर्यंत सिमेंट कॉंक्रेट नाली बांधणे | 377229 | 3780 | 590 | 8 व त्यावरील | 100 दिवस |
| 7 | वाशिम ता.जि. वाशिम प्र.क्र. 08 मध्ये काकडे घर ते वानखेडे घरापर्यंत सिमेंट कॉंक्रेट नाली बांधणे | 298955 | 2990 | 590 | 8 व त्यावरील | 100 दिवस |
| 8 | प्रभाग क्र. 1 मध्ये संजय कुटे घर ते राहुल कुटे घरापर्यंत सिमेंट कॉंक्रेट नाली बांधणे | 819810 | 8200 | 590 | 7 व त्यावरील | 100 दिवस |
| 9 | प्रभाग क्र. 11 मध्ये कैकाडी घर ते मुरलीधर घर पर्यंत सि.सि. रोड आणि नाली बांधकाम करणे | 562773 | 5630 | 590 | 7 व त्यावरील | 100 दिवस |
| 10 | वाशिम न.प. प्रभाग क्र. 9 मध्ये कय्युम भाई घर ते जब्बार भाई घरापर्यंत सिमेंट कॉंक्रेट रोड व नाली बांधकाम करणे | 797097 | 7800 | 590 | 7 व त्यावरील | 100 दिवस |

**अटी व शर्ती**

१) वरील कामाबाबतची कोरे निविदा प्रपत्र प्राप्त करणे न.प. आवक जावक विभागामध्ये दि. ०८.०६.२०२६ साय. ५.०० वाजेपर्यंत लेखीस्वरूपात अर्ज करून न.पा. रोखपाल विभागा मध्ये आवश्यकत्या रक्कमेचा भरणा करून कोरे निविदा प्रपत्र प्राप्त करता येतील, २) बयाणा रक्कम रोख स्वरुपात अथवा धनाकर्ष (D.D.) स्वरुपात स्विकारल्या जाईल. निविदा बयाणा रक्कम नगदी स्वरुपात भरावयाची असल्यास दि. ०९.०६.२०२६ रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत न.पा. रोखपाल विभागात स्विकारण्यांत येईल ३ ) शक्य झाल्यास निविदा दि. ०९.०६.२०२६ रोजी दुपारी ५.३० वाजता उपस्थित कंत्राटदार अथवा त्यांचे प्रतिनिधी यांचे उपस्थीतीत उघडण्यांत येतील. ४) निधीचे उपलब्धते नूसार देयकाची अदायगी करण्यात येईल. ५) वरील कामा संबंधी इतर शर्ती व अटी कार्यालयीन वेळेत नगर परिषद बांधकाम विभागात पहावयास मिळतील.

**-स्वा-**
**(निलेश गायकवाड)**
मुख्याधिकारी नगर परिषद, वाशिम

जा. क्र. /नपवा/कार्या-१७/१७५२/२०२६
दिनांक : २७/०५/२०२६

जनमाध्यम
e paper www.janmadhyam.com
एक प्रतिष्ठित सवय
■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक १८० ■ गुरुवार, २८ मे २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.

मृत्यूशी झुंज अखेर हरली

# पवनारच्या भीषण अपघातातील गंभीर जखमी सितम बोरकरचा करुण अंत; गावावर शोककळा

**सेलू जनमाध्यम :** नागपूर–तुळजापूर राष्ट्रीय महामार्गावरील पवनारजवळील मामा-भांजा दर्गा परिसरात घडलेल्या भीषण साखळी अपघातातील गंभीर जखमी तरुण सितम दिनकर बोरकर (२२, रा. पवनार) याची मृत्यूशी सुरू असलेली झुंज अखेर अपयशी ठरली. उपचारादरम्यान बुधवारी सकाळी त्याने अखेरचा श्वास घेतला. या हृदयद्रावक घटनेने पवनार परिसर शोकसागरात बुडाला आहे.



गत २२ मे रोजी दुपारी भरधाव एसटी बसने पुढे जाणाऱ्या रोड रोलरला मागून जोरदार धडक दिली होती. धडकेची तीव्रता इतकी भीषण होती की रोड रोलरचे अक्षरशः दोन तुकडे झाले. याचवेळी दुचाकीने पवनारकडे येत असलेला सितम बोरकर या भीषण अपघाताच्या तडाख्यात सापडला. एसटी बसची जोरदार धडक बसल्याने तो गंभीर जखमी झाला होता.

अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी तत्परता दाखवत घटनास्थळी धाव घेतली आणि जखमींना तातडीने सावंगी येथील रुग्णालयात दाखल केले. डॉक्टरांनी सितमला वाचवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले; मात्र अखेर बुधवारी सकाळी १०.४५ वाजताच्या सुमारास त्याची प्राणज्योत मालवली.

या दुर्घटनेनंतर राष्ट्रीय महामार्गावरील सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. मामा-भांजा दर्गा परिसरात सातत्याने होत असलेल्या अपघातांमुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत असून, प्रशासनाने तातडीने वाहतूक नियंत्रण यंत्रणा मजबूत करून सुरक्षात्मक उपाययोजना कराव्यात, अशी जोरदार मागणी होत आहे.

तरुण वयात सितमचा झालेला दुर्दैवी मृत्यू मित्रपरिवार आणि नातेवाईकांच्या जिव्हारी लागला. सायंकाळी स्थानिक स्मशानभूमीत अत्यंत शोकाकुल वातावरणात अश्रूपूर्ण नयनांनी त्याला अखेरचा निरोप देण्यात आला.

# खरीपपूर्वी बोगस बियाण्यांवर धाड

## २९ लाखांचा एचटीबीटी साठा जप्त; एकाला अटक

**आर्वी जनमाध्यम :** खरीप हंगाम अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला असताना शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या बोगस बियाणे विक्रेत्यांविरोधात कृषी विभाग आणि पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. आर्वी तालुक्यातील शिरपूर (बोके) येथे छापा टाकून तब्बल २९ लाख ४६ हजार ८४६ रुपयांचे एचटीबीटी बोगस बियाणे जप्त करण्यात आले. या प्रकरणी संजय गोपाळे (वय ५२) याला अटक करण्यात आली आहे.



जिल्ह्यात दरवर्षी खरीप हंगामात अनधिकृत बियाण्यांची विक्री करून शेतकऱ्यांची फसवणूक होत असल्याच्या तक्रारी वाढत आहेत. याच पार्श्वभूमीवर कृषी विभागाने संशयित गोदामांवर लक्ष केंद्रीत केले होते. कृषी अधिकारी संजय बनमोटे यांनी दिलेल्या तक्रारीनंतर आर्वी पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला. पोलिसांनी गोपाळे याच्या गोदामाची तपासणी केली असता मोठ्या प्रमाणात बोगस बियाण्यांचा साठा आढळून आला. चौकशीत गुजरातमधून बियाणे आणून त्याचे पॅकिंग करून विक्रीसाठी तयार केल्याचे समोर आले. पोलिसांनी संपूर्ण साठा जप्त केला असून या रॅकेटमध्ये आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचा तपास सुरू आहे. ही कारवाई पोलिस अधीक्षक सौरभ अग्रवाल, अपर पोलिस अधीक्षक सदाशिव वाघमारे व उपविभागीय पोलिस अधिकारी चंद्रकांत ढोले यांच्या मार्गदर्शनात ठाणेदार सतीश डेहनकर व पथकाने केली.

## घरचा आधार विजेच्या खांबावरून कोसळला

**वर्धा जनमाध्यम :** रोज इतरांच्या घरात उजेड पोहोचवणारा महावितरणचा कर्मचारी स्वतः मात्र काळाच्या दारात जाऊन पोहोचल्याची हृदयद्रावक घटना मंगळवारी शहरातील पावडे चौक परिसरात घडली. विजेच्या पोलवर चढून दुरुस्तीचे काम करत असताना महावितरण कर्मचारी विजय वाघमारे (वय ३०) यांचा सुरक्षा झुला अचानक तुटला आणि काही क्षणातच ते उंचावरून खाली कोसळले. या अपघातात ते गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर सावंगी येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

अपघात इतका गंभीर होता की विजय वाघमारे यांना मोठ्या प्रमाणात दुखापत झाल्याचे सांगण्यात येत आहे. जीव धोक्यात घालून काम करणाऱ्या वीज कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. इतरांच्या घरात प्रकाश देणारे कर्मचारी स्वतःच्या जीवाची बाजी लावत काम करतात, अशी भावना परिसरातील नागरिकांनी व्यक्त केली.

नळ कोरडे... प्रशासन झोपेत

# सिंदीत चार दिवसांनी पाणीपुरवठा; संतप्त नागरिकांचे नगरपरिषदेत निवेदन

**सिंदी रेल्वे जनमाध्यम :** सिंदी नगरपरिषदेच्या भोंगळ नियोजनाचा फटका वार्ड क्रमांक १३ व १४ मधील नागरिकांना बसत असून परिसरात तीव्र पाणीटंचाईने नागरिकांचे जगणेच कठीण झाले आहे. चार-चार दिवसांनी होणारा पाणीपुरवठा आणि तोही अत्यल्प दाबाने मिळत असल्याने संतप्त नागरिकांनी बुधवार, २७ रोजी मुख्याधिकाऱ्यांना धडक निवेदन देत प्रशासनाला जाब विचारला.



मागील अनेक दिवसांपासून परिसरातील नळ कोरडे पडले असून महिलांना पाण्यासाठी अक्षरशः भटकंती करावी लागत आहे. अनेक घरांमध्ये पुरेशा दाबाने पाणी पोहोचत नसल्याने नागरिकांची प्रचंड गैरसोय होत आहे. कर वेळेवर भरायचा आणि बदल्यात पाण्यासाठी वणवण करायची, अशी संतप्त प्रतिक्रिया नागरिकांनी व्यक्त केली. यावेळी वार्डातील नागरिक मोठ्या संख्येने एकत्र आले होते. नियमित आणि पुरेशा दाबाने पाणीपुरवठा सुरू करावा, पाणीपुरवठा विभागाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. नागरिकांच्या वाढत्या रोषामुळे नगरपरिषद प्रशासनाविरोधात तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.

वार्ड मेंबर घनश्याम मेंढे यांनी नागरिकांच्या समस्या ऐकून अलंकेश गावंडे यांच्याशी चर्चा केली.दरम्यान, पाणीटंचाईचा प्रश्न तातडीने न सोडवल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा नागरिकांनी दिल्याने सिंदी नगरपरिषद प्रशासनाची आता कसोटी लागणार आहे.

# थेंबाथेंबाचा हिशेब आता सरकारच्या ताब्यात

**मुंबई जनमाध्यम :** जमिनीच्या सातबारानंतर आता पाण्याचाही सातबारा तयार करण्याच्या दिशेने महाराष्ट्राने ऐतिहासिक पाऊल टाकले आहे. गावागावातील पावसाचे प्रमाण, पाण्याची साठवणूक, वापर, पुनर्वापर आणि भूजलाची स्थिती याचा संपूर्ण लेखाजोखा ठेवणारी 'पाण्याचा सातबारा' ही अभिनव योजना राज्यात राबविण्यात येणार आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात झालेल्या बैठकीत हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला.

राज्यात वाढत चाललेली पाणीटंचाई, भूजलपातळीतील घट आणि पाण्याचा वाढता अपव्यय लक्षात घेता शासनाने जलव्यवस्थापनासाठी कठोर आणि दूरदृष्टीचा निर्णय घेतल्याचे बोलले जात आहे. 'पाण्याचा प्रत्येक थेंब आता नोंदवला जाणार' अशीच भावना या योजनेमागे असल्याचे सूत्रांनी सांगितले.

या जलसातबारामध्ये प्रत्येक गावातील पर्जन्यमान, पाणीसाठा, शेती व पिण्याच्या पाण्याचा वापर, पुनर्भरण आणि पुनर्वापराची सविस्तर माहिती नोंदवली जाणार आहे. त्यामुळे गावनिहाय पाण्याचा ताळेबंद तयार होऊन उपलब्ध पाण्याचे काटेकोर नियोजन करता येणार आहे. पाण्याचा वापर मोजल्याशिवाय नियंत्रण शक्य नाही, या भूमिकेतून शासनाने ही संकल्पना पुढे आणली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार ही योजना पुढे सरकविण्यात आली असून, 'अक्वेरियम' संस्थेच्या सहकार्याने सुरुवातीला ती प्रायोगिक तत्त्वावर राबविण्यात येणार आहे. वॉटर ऑडिट आणि वॉटर बॅलन्सशीट'च्या माध्यमातून पाण्याचे तीन टप्प्यांत ऑडिट केले जाणार असून, दरवर्षी त्याचे वर्गीकरणही होणार आहे.

# रानडुकरांच्या हल्ल्याने वडनेर परिसरात भीतीचे वातावरण

## महिलेसह शेतकऱ्यावर हल्ला; दोघेही जखमी

### वनविभागाकडून मदतीचे आश्वासन

**वडनेर जनमाध्यम :** हिंगणघाट तालुक्यातील वडनेर व आजनसरा परिसरात रानडुकरांच्या हल्ल्याच्या दोन घटना घडल्याने शेतकरी व नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या हल्ल्यांमध्ये एक महिला व एक पुरुष गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहेत.





दि. २६ मे रोजी वडनेर शिवारातील कुंभारे यांच्या शेतात राहणाऱ्या मीराबाई किरणे मेश्राम (वय ५५) या सकाळच्या सुमारास शौचालयासाठी बाहेर गेल्या असता अचानक रानडुकराने त्यांच्यावर हल्ला केला. या हल्ल्यात त्यांच्या पायाला गंभीर दुखापत झाली असून जवळपास ४० टाके पडल्याची माहिती मिळाली. त्यांच्यावर ग्रामीण रुग्णालय, वडनेर येथे उपचार सुरू आहेत. मीराबाई मेश्राम या चंद्रपूर जिल्ह्यातील बोर्डा येथील रहिवासी आहेत.

दुसरी घटना रविवारी सकाळी आजनसरा शिवारात घडली. कैलास देवराव मोहिजे (वय ४६, रा. आजनसरा) हे शेतात काम करत असताना सकाळी सुमारे ९ वाजताच्या दरम्यान रानडुकराने त्यांच्यावर हल्ला केला. या हल्ल्यात त्यांच्या दोन्ही पायांना गंभीर दुखापत झाली असून त्यांच्यावरही ग्रामीण रुग्णालय, वडनेर येथे उपचार सुरू आहेत.

घटनेची माहिती सामाजिक कार्यकर्ते सचिन महाजन यांनी वनविभागाला दिल्यानंतर वनविभागाच्या अधिकारी स्नेहल सुखदेव यांनी रुग्णालयात भेट देऊन जखमींची पाहणी केली. शासनाच्या नियमानुसार जखमींना आर्थिक मदत देण्यात येईल, अशी माहिती त्यांनी दिली.

दरम्यान, परिसरात जंगली प्राण्यांच्या वाढत्या हल्ल्यांमुळे शेतकऱ्यांमध्ये चिंता व्यक्त होत आहे. शेतात काम करताना नागरिकांनी व शेतकऱ्यांनी आवश्यक ती काळजी घ्यावी, असे आवाहन वनविभागाकडून करण्यात आले आहे.

# घनकचरा प्रकल्पावर चोरट्यांचा हात; नगर परिषदेचे ७.७८ लाखांचे मशिनरी साहित्य लंपास

**वर्धा जनमाध्यम :** शहरातील नगर परिषद वर्धा अंतर्गत सुरू असलेल्या घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पावर अज्ञात चोरट्यांनी डल्ला मारत तब्बल ७ लाख ७८ हजार ९९८ रुपयांचे मशिनरी साहित्य लंपास केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणामुळे नगर परिषद प्रशासनात खळबळ उडाली असून शासकीय मालमत्तेच्या सुरक्षेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.



सावंगी मेघे पोलीस ठाणे येथे दाखल तक्रारीनुसार, अकुंश लक्ष्मण आडकीने (वय ३१) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३(२) अन्वये चोरीचा गुन्हा नोंद करण्यात आला आहे. ही घटना मौजा इझापूर येथील ग्रामपंचायत परिसरातील घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पात घडली.

तक्रारीनुसार, ७ एप्रिल २०२५ रोजी सकाळी १० वाजेपासून ते १५ मे २०२६ रोजी सकाळी ११.३० वाजेदरम्यान अज्ञात चोरट्यांनी प्रकल्पातील महागडे मशिनरी पार्ट्स चोरून नेले. यात कन्वेयर रोलर, ॲडजेस्टेबल शाफ्ट, ब्रॅकेट, गिअर बॉक्स, हायड्रोलिक पंप, मोटार, एमसीबी, हाय टेन्साईल नट-बोल्ट तसेच विविध मशिनरीचे सुटे भागांचा समावेश आहे. विशेष म्हणजे, घनकचरा व्यवस्थापनासाठी नगर परिषदेमार्फत खरेदी करून ठेवलेले हे साहित्य मोठ्या प्रमाणावर गायब झाल्याने प्रकल्पाच्या सुरक्षेचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात साहित्य चोरीस गेले तरी प्रशासनाला याची माहिती उशिराने मिळाल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.

या प्रकरणाचा तपास गोपाल शिंदे करीत असून अज्ञात आरोपींचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी हालचाली सुरू केल्या आहेत. परिसरातील संशयितांवर लक्ष ठेवण्यात येत असून चोरीस गेलेले साहित्य कुठे विक्रीस गेले याचाही तपास केला जात आहे.

# वर्ध्यासह राज्यात भूमी अभिलेख विभागाचा विस्तार; मोजणीच्या रखडलेल्या कामांना मिळणार गती

## ५० नव्या कार्यालयांची घोषणा; सातबारा, हद्द निश्चिती आणि नगर भूमापनाची कामे होणार जलद

**पुणे/वर्धा जनमाध्यम :** राज्यातील वाढत्या शहरीकरणामुळे भूमी अभिलेख विभागावरील ताण मोठ्या प्रमाणात वाढला असून, प्रलंबित मोजणी आणि नगर भूमापनाच्या कामांमुळे नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत होता. या पार्श्वभूमीवर महसूल विभागाने मोठा निर्णय घेत राज्यभरात ५० नवी कार्यालये सुरू करण्यास मंजुरी दिली आहे. या विस्तारामध्ये वर्ध्यासह अनेक महत्त्वाच्या जिल्ह्यांचा समावेश करण्यात आला असून, त्यामुळे भूमी अभिलेख विभागाच्या कामकाजाला मोठी गती मिळणार आहे. महसूल विभागाने १० हजार ६८३ पदांच्या सुधारित आकृतिबंधाला मंजुरी देत नव्या कार्यालयांचे प्रशासकीय कार्यक्षेत्र निश्चित केले आहे. या निर्णयामुळे सातबारा, हद्द निश्चिती, गावठाण मोजणी, शहरमापन आणि मालमत्ता नोंदीसंबंधीची रखडलेली प्रकरणे वेगाने निकाली निघण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

राज्यात उपसंचालक भूमी अभिलेख यांचे एक, जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख यांची आठ, नगर भूमापन अधिकाऱ्यांची २३ आणि विशेष भूमी अभिलेख उपअधीक्षकांची १७ नवी कार्यालये स्थापन केली जाणार आहेत.

पुणे, नागपूर, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, अमरावती, रायगड यांच्यासह वर्धा जिल्ह्याचाही या विस्तार योजनेत समावेश करण्यात आला आहे. विशेष म्हणजे वर्ध्यासारख्या वाढत्या शहरांमध्ये मालमत्ता मोजणी, सीमावाद आणि नगर भूमापनाच्या प्रकरणांमध्ये सातत्याने वाढ होत आहे. त्यामुळे नव्या कार्यालयांमुळे नागरिकांची धावपळ कमी होऊन कामकाज अधिक जलद आणि पारदर्शक होणार असल्याची प्रतिक्रिया व्यक्त होत आहे.

गावठाण विस्तार आणि वाढती बांधकामे लक्षात घेता शासनाने संबंधित भागांमध्ये अतिरिक्त कर्मचारी नियुक्तीचे आदेशही दिले आहेत. त्यामुळे अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या मोजणी आणि चौकशी प्रकरणांना आता गती मिळणार असल्याचे चित्र आहे.

# भरधाव कारची दुचाकीला जोरदार धडक; युवक गंभीर

**सिंदी (रेल्वे) जनमाध्यम :** शहरातील सुभाष प्राथमिक शाळेजवळ बुधवारी दुपारी झालेल्या भीषण अपघाताने परिसर हादरला. भरधाव कारने दुचाकीला जोरदार धडक दिल्यानंतर कार थेट शाळेच्या संरक्षक भिंतीवर जाऊन आदळली. या अपघातात दुचाकीस्वार गंभीर जखमी झाला असून कार चालक अपघातानंतर घटनास्थळावरून फरार झाला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रशांत ऊर्फ दादू सोनुले (वय ३५) हे एमएच ३२ एयू १७१८ क्रमांकाच्या दुचाकीने बसस्थानक परिसरातून घराकडे जात होते. दुपारी साडेतीन वाजताच्या सुमारास सेलडोहकडून भरधाव वेगाने येणाऱ्या एमएच ०१ सीपी ०८७२ क्रमांकाच्या कारने सुभाष प्राथमिक शाळेजवळ त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. धडकेची तीव्रता इतकी होती की, दुचाकी रस्त्याच्या कडेला फेकली गेली आणि प्रशांत सोनुले गंभीर जखमी झाले. अपघातानंतर कार चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने कार थेट शाळेच्या संरक्षक भिंतीवर आदळली. या धडकेत भिंतीचाही काही भाग कोसळला. घटनेनंतर परिसरात नागरिकांची मोठी गर्दी झाली होती. माहिती मिळताच पोलिस कर्मचारी पंकज घोडे तातडीने घटनास्थळी दाखल झाले. जखमी प्रशांत सोनुले यांना प्रथम सिंदी येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र प्रकृती चिंताजनक असल्याने पुढील उपचारासाठी नागपूर येथे हलविण्यात आले.

# बजाज चौकात पोलिसांचा सर्जिकल स्ट्राईक; साडेतीन लाखांचा दंड

## हेल्मेट नाही, सीटबेल्ट नाही... थेट पोलिसांचा दंडाचा हातोडा

**वर्धा । जनमाध्यम :** शहरातील बेशिस्त वाहतुकीला चाप बसवण्यासाठी वर्धा वाहतूक शाखेने बुधवारी बजाज चौक परिसरात अक्षरशः 'धडाकेबाज' मोहीम राबवत नियम तोडणाऱ्या वाहनचालकांवर कारवाईचा बडगा उगारला. अवघ्या काही तासांत तब्बल ४१० केसेस दाखल करण्यात आल्या असून, ३ लाख ३४ हजार ९०० रुपयांचा दंड ठोठावण्यात आल्याने वाहनचालकांमध्ये एकच खळबळ उडाली.



वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक विलास पाटील यांच्या नेतृत्वाखाली ही विशेष मोहीम राबविण्यात आली. शहरात वाढत्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर वाहतूक नियमांचे पालन व्हावे, नागरिकांचा जीव धोक्यात येऊ नये आणि बेफाम वाहनचालकांना धडा शिकवावा, या उद्देशाने पोलिसांनी ही कारवाई केली. मोहीमेदरम्यान बिना नंबर प्लेट फिरणारी वाहने, हेल्मेटशिवाय दुचाकी चालविणारे, सीटबेल्ट न लावणारे, मोबाईलवर बोलत वाहन चालविणारे तसेच रॉंग पार्किंग करणाऱ्यांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले. नियमापेक्षा जास्त प्रवासी घेणाऱ्या वाहनांवर १५, बिना नंबर प्लेट वाहनांवर ५०, रॉंग पार्किंगवर ४२, आवश्यक कागदपत्र नसणाऱ्यांवर ५३, विना हेल्मेट ३६ आणि सीटबेल्टशिवाय वाहन चालविणाऱ्या ४० चालकांवर कारवाई करण्यात आली. याशिवाय विविध उल्लंघनांच्या आणखी १३६ केसेस नोंदविण्यात आल्या.

ही मोहीम पोलीस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल, अप्पर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी प्रमोद मकेश्वर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. कारवाईत पोलीस उपनिरीक्षक अमोल लगड, मंगेश येळणे, शब्बीर सय्यद, धिरज पांडे, जावेद शेख यांच्यासह महिला ट्राफिक कर्मचारी आणि वाहतूक शाखेचे अधिकारी-कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले.

वाहतूक पोलिसांच्या या आक्रमक मोहिमेमुळे नियम मोडणाऱ्या वाहनचालकांचे मात्र चांगलेच 'धाबे दणाणले' आहेत.

## जाहीर सुचना

याद्वारे सर्वसामान्य जनतेस जाहीर सूचित करण्यात येते की, माझे अशील श्री. दीपक देविदास उरकुडे हे मौजा – शहालंगडी ता. हिंगणघाट, जि. वर्धा येथील स्थावर मिळकतीचे मालक व कब्जेदार आहेत. सदर मिळकत मौजा क्र. १५९, पी.एच. क्र. ०६, फील्ड सर्व्हे क्र. जुना ५५/५, नवीन ९४, प्लॉट क्र. ३४/१, क्षेत्रफळ ६९.००चौ. मी. (७५०.००चौ. फूट) असून त्यावर बांधकाम केलेले घर आहे.

सदर मिळकतीच्या चतु:सीमा खालीलप्रमाणे आहेत :
पूर्वेस : श्री. गोविंदराव राजूरकर यांचा प्लॉट क्र. ३४/२,
पश्चिमेस : प्लॉट क्र. ३५,
उत्तरेस : प्लॉट क्र. ९,
दक्षिणेस : ले-आऊट रोड,

यापुढे असे नमूद करण्यात येते की, श्री. आशिष रमेशराव बोरकर यांनी सदर प्लॉट क्र. ३४/१ क्षेत्रफळ ६९.०० चौ. मी. (७५०.०० चौ. फूट) हा दि. १४/१२/२०१८रोजी दस्त नोंदणी क्र. ४९९१/२०१८ अन्वये नोंदणीकृत विक्रीखताद्वारे श्री. दीपक देविदास उरकुडे यांना विक्री केलेला आहे.

तसेच माझ्या अशील यांचे सदर मिळकतीचे मूळ लिंक विक्रीखत दि. २९/१०/२००५, दस्त नोंदणी क्र. ३२६९/२००५ हे हरवले / गहाळ झालेले आहे.

माझ्या अशील यांनी आधार हाऊसिंग फायनान्स लि. (ए.एच.एफ.लि) येथे कर्जाकरिता अर्ज केलेला असल्यामुळे ही सार्वजनिक सूचना प्रसिद्ध करण्यात येत आहे.

तरी सदर मिळकतीबाबत कोणाचा काही हक्क, अधिकार, दावा, आक्षेप, ताबा, बोजा, हितसंबंध असल्यास किंवा हरवलेले सदर विक्रीखत कोणास मिळून आल्यास त्यांनी या सूचनेच्या प्रसिद्धीपासून ७ (सात) दिवसांच्या आत आवश्यक पुराव्यासह खालील पत्त्यावर संपर्क साधावा.अन्यथा, विहित मुदतीत कोणताही दावा अथवा आक्षेप प्राप्त न झाल्यास सदर मिळकतीबाबत कोणाचाही दावा अथवा आक्षेप नाही असे गृहीत धरून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**ॲड. आर. आर. तिवारी**
**रामनगर, वर्धा. मो. नं. : ९९२२४२६१६८**

# उद्धव ठाकरे गटाला मोठे खिंडार

## प्रमुख पदाधिकाऱ्यांसह ४४ वर्षे जुन्या शाखाप्रमुखांचा भाजपमध्ये प्रवेश




**वसई-** वसई विरार शहरात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाला मोठा धक्का बसला आहे. ठाकरे गटाच्या युवासेनेचे पालघर जिल्हाप्रमुख सिद्धेश रवींद्र जोगळे यांच्यासह सलग ४४ वर्षे पक्षा एकनिष्ठ राहिलेले ज्येष्ठ शाखाप्रमुख प्रभाकर गोपाळ पाटील आणि अनेक प्रमुख पदाधिकाऱ्यांनी भाजप मध्ये प्रवेश केला आहे. मंगळवारी मुंबईतील भाजप प्रदेश कार्यालयात हा पक्ष प्रवेश पार पडला.

नुकताच पार पडलेल्या वसई विरार महापालिका निवडणुकीत भाजप सत्तेत जरी आले नसले तरी ४४ जागा जिंकत मोठे यश मिळविले आहे. या यशानंतर भाजपने संघटना बांधणी अधिक मजबूत करण्यासाठीच्या हालचाली सुद्धा सुरू केल्या आहेत. विविध राजकीय पक्षात नाराज असलेले कार्यकर्ते व प्रमुख पदाधिकारी यांना आपल्या पक्षात खेचण्याचे काम सुरू आहे.

नुकताच शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) या गटात नाराज असलेल्या प्रमुख पदाधिकाऱ्यांनी भाजप मध्ये पक्षप्रवेश केला आहे. भाजपमध्ये प्रवेश करणाऱ्यांमध्ये केवळ तरुण नेतृत्वच नव्हे, तर पक्षाचा जुना आणि विश्वासू चेहरा मानले जाणारे प्रभाकर गोपाळ पाटील यांचाही समावेश आहे. पाटील हे १९८२ पासून २०२६ पर्यंत, म्हणजेच सलग ४४ वर्षे गावराईपाडा शिवसेना शाखाप्रमुख म्हणून कार्यरत होते.

त्यांच्यासोबतच वसई-विरार महानगरपालिकेच्या प्रभाग क्र. २९ मधील उमेदवार सोनल रवींद्र जोगळे, पेल्हारचे विभागप्रमुख दिलीप कुवेसकर, वसई जमादार आळीचे विभागप्रमुख मनीष गायकवाड, उपविभागप्रमुख जितेश पवार, युवासेना शाखा अधिकारी (पापडी) आसिफ पठाण आणि शैलेंद्र गोलवणकर यांच्यासह शेकडो कार्यकर्ते व सामाजिक क्षेत्रातील प्रतिनिधींनी भाजपचा झेंडा हाती घेतला आहे.

हा पक्ष प्रवेश सोहळा भाजप नेते व राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, खासदार डॉ.हेमंत सवरा, भाजप महाराष्ट्र प्रदेश महामंत्री सुनील राणे, भाजप प्रदेश युवा मोर्चा अध्यक्ष कृष्णराज महाडिक, माजी जिल्हाध्यक्ष महेंद्र पाटील, नगरसेवक गणेश पाटील, विनीत तिवारी यासह इतर भाजपचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. या पक्षप्रवेशामुळे ठाकरे गटाच्या संघटनात्मक रचनेला मोठे खिंडार पडल्याचे मानले जात आहे.

# विधानपरिषदेसाठी अशोक चव्हाणांच्या खंद्या समर्थकाचे नाव चर्चेत



**नांदेड-** राज्यात विधानपरिषद निवडणूकीचा बिगुल वाजला असून उमेदवारी दाखल करण्याची प्रक्रिया सुरु झाली आहे. मात्र, महायुतीमध्ये अद्यापपर्यंत जागा वाटपाचा तिढा सुटलेला नाहीय. कोणत्या पक्षाला किती जागा मिळणार? हे अद्याप निश्चित झालेले नाही. अशातच उमेदवारी मिळावी यासाठी अनेक जणांनी देव पाण्यात ठेवले आहेत. तर दुसरीकडे नांदेडमध्ये अत्यंत जवळचे आणि खंदे समर्थक मानले जाणारे अमरनाथ राजूरकर यांना दुसऱ्यांदा उमेदवारी मिळावी, यासाठी माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांची धरपड सुरू असल्याचं चित्र आहे.गेले पाच ते सहा दिवस अशोक चव्हाण हे मुंबईमध्ये तळ ठोकून आहेत. अमरनाथ राजुरकर यांच्या नावाची चर्चा असली तरी, भाजप पक्षातील निष्ठावंतांना उमेदवारी देणार की आयात केलेल्या कार्यकर्त्याला? याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे.

राज्यातील रिक्त असलेल्या विधान परिषदेच्या १७ जागांसाठी यंत्या १८ जून रोजी मतदान होणार आहे. २०१६ मध्ये राजुरकर यांनी काँग्रेसकडून निवडणूक लढवली होती, त्यात त्यांनी एकूण ४७२ पैकी २५१ मतं मिळवत विजय मिळवला होता. प्रतिस्पर्धी असलेले माजी आमदार श्यामसुंदर शिंदे यांना २०८ मतं मिळाले होते. आता अमरनाथ राजुरकर यांना दुसऱ्यांदा विधान परिषद निवडणूकीच्या रिंगणात उतरणार असल्याची चर्चा रंगली आहे. अमरनाथ राजुरकर हे माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांचे निकटवर्तीय आणि खंदे समर्थक मानले जातात.

अनेक वर्ष राजुरकर यांनी चव्हाण यांच्यासोबत काँग्रेसमध्ये काम केलं, त्यानंतर अशोक चव्हाण हे भाजपावासी झाल्यानंतर त्यांनी देखील पदाचा राजीनामा देत भाजप पक्षात प्रवेश केला. सध्या राजूरकर हे भाजपचो महानगराध्यक्ष पदावर कार्यरत आहेत. विधान परिषदेची नांदेडची जागा भाजपला सुटणार असल्यानं अमर राजूरकर यांच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत. दुसरीकडे आपल्याच समर्थकाला उमेदवारी मिळण्यासाठी अशोक चव्हाण हे पूर्ण ताकदीने मैदानात उतरले आहेत. मागील आठवड्याभरापासून अशोक चव्हाण आणि अमर राजुरकर हे मुंबईत तळ ठोकून असल्याची माहिती आहे. दरम्यान, भाजप पक्षातील निष्ठावंताला उमेदवारी देणार की आयाताला? याकडे सर्वांच लक्ष आहे.

# बुलेट ट्रेन प्रकल्पाला वेग!

## मुंबई-पुणे केवळ ४८ मिनिटांत तर हैदराबाद ३ तासांत



**पुणे-** देशातील महत्त्वाकांक्षी हाय-स्पीड रेल्वे प्रकल्पांपैकी एक असलेल्या मुंबई-पुणे–हैदराबाद बुलेट ट्रेन प्रकल्पाबाबत मोठी माहिती समोर आली आहे. मुंबई–पुणे–हैदराबाद हाय-स्पीड रेल्वे कॉरिडॉरसाठी सविस्तर प्रकल्प अहवाल डीपीआर पूर्ण झाला आहे. महाराष्ट्र, कर्नाटक आणि तेलंगण राज्यातून हा मार्ग जाणार आहे. या प्रकल्पाच्या भूसंपादनासाठी तेलंगण सरकारकडे ९३ किलोमीटर क्षेत्रावरील जमीन रेल्वे विभागाने मागितली आहे. त्यामुळे या प्रकल्पाच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल पडले आहे.

या प्रस्तावित बुलेट ट्रेन मार्गामुळे पुणे ते हैदराबाद प्रवासाचा वेळ मोठ्या प्रमाणात कमी होणार असून, सध्याच्या ८ ते १० तासांच्या रेल्वे प्रवासाऐवजी हा प्रवास अवघ्या १ तास ५५ मिनिटांत पूर्ण होऊ शकतो. याचबरोबर मुंबई ते पुणे हा प्रवास केवळ ४८ मिनिटांत पूर्ण करता येणार आहे. तर मुंबई ते हैदराबाद प्रवास सुमारे ३ तासांत पूर्ण होण्याची शक्यता आहे. तेलंगण राज्यात या प्रकल्पाच्या भूसंपादनाची तयारी सुरू झाली आहे. तेलंगणचे मुख्य सचिव के. रामकृष्ण राव यांनी नुकताच याबाबत उच्चस्तरीय बैठकीत आढावा घेतला त्यानंतर त्यांनी या प्रकल्पाच्या भूसंपादनाविषयी माहिती दिली.

तेलंगणमध्ये या प्रकल्पासाठी सुमारे ९३ किलोमीटर क्षेत्रातील जमीन आवश्यक आहे. तेलंगण सरकार आणि रेल्वे मंत्रालय यांच्यात समन्वय सुरू असून, विविध विभागांना प्राथमिक प्रस्ताव तयार करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. सध्या हा प्रकल्प नियोजन आणि मंजुरीच्या टप्प्यात आहे. अद्याप प्रत्यक्ष बांधकाम सुरू झालेले नाही. मात्र सविस्तर प्रकल्प आराखडा पूर्ण झाल्यानंतर पुढील वर्षांत केंद्र सरकारची अंतिम मंजुरी मिळाल्यास २०२७-२८ दरम्यान काम सुरू होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. प्रकल्प पूर्ण होण्यासाठी ७ ते ८ वर्षांचा कालावधी लागू शकतो.

प्रस्तावित बुलेट ट्रेन मार्गामध्ये मुंबई, नवी मुंबई, लोणावळा, पुणे, दौंड, अकलूज, पंढरपूर, सोलापूर, कलबुर्गी, झहिराबाद आणि हैदराबाद या प्रमुख शहरांचा समावेश आहे. या प्रकल्पामुळे महाराष्ट्र, कर्नाटक आणि तेलंगण या तीन राज्यांतील औद्योगिक, माहिती तंत्रज्ञान (आयटी) आणि पर्यटन क्षेत्राला मोठी चालना मिळण्याची अपेक्षा आहे.या कॉरिडॉरवरील बुलेट ट्रेनचा वेग ताशी सुमारे ३२० ते ३५० किमी असेल. जपानच्या शिंकान्सेन तंत्रज्ञानाच्या धर्तीवर हा प्रकल्प विकसित करण्यात येणार आहे. देशातील पहिल्या मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पानंतर हा दक्षिण आणि पश्चिम भारताला जोडणारा मोठा हाय-स्पीड रेल्वे प्रकल्प ठरणार आहे.

# १ जूनपासून देशांतर्गत विमान फेऱ्यांमध्ये कपातीचा एअर इंडियाचा निर्णय




**मुंबई-** देशांतर्गत विमान वाहतूक बाजारपेठेवर ९० टक्क्यांपेक्षा जास्त नियंत्रण असणाऱ्या देशातील आघाडीच्या विमान कंपन्यांनी १ जूनपासून पुढील तीन महिन्यांसाठी आपल्या देशांतर्गत विमान फेऱ्या कमी करण्याचा निर्णय घेतला आहे. अमेरिका-इराण युद्धाचा भडका उडाल्यानंतर विमान इंधनाच्या किमतीत झालेली प्रचंड वाढ आणि शाळांच्या सुट्ट्या संपल्यानंतर प्रवाशांच्या संख्येत होणारी हंगामी घट, ही या निर्णयामागील मुख्य कारणे असल्याचे अनेक सूत्रांनी सांगितले.एअर इंडिया देशांतर्गत विमान फेऱ्यांमध्ये २२ टक्क्यांपर्यंत कपात करणार असल्याचे सूत्रांनी सांगितल्याचे वृत्त पीटीआयने दिले आहे. आर्थिक अडचणींचा सामना करत असलेल्या या तोट्यात चालणाऱ्या विमान कंपनीने आपल्या आंतरराष्ट्रीय विमान फेऱ्यांमध्येही सुमारे २७ टक्क्यांची कपात केली आहे, असे सूत्रांचे म्हणणे आहे.

एअर इंडिया दर आठवड्याला सुमारे ४,४०० विमान फेऱ्यांचे नियोजन करते. यापैकी साधारण ३,६०० देशांतर्गत (डोमेस्टिक) आणि ८०० आंतरराष्ट्रीय विमान सेवा आहेत.तर इंग्रजी वृत्तपत्र द न्यू इंडियन एक्सप्रेसने दिलेल्या वृत्तानुसार इंडिगोने आपल्या सेवांमध्ये ५ ते ७ टक्क्यांची कपात करण्याचे नियोजन केले आहे.विमान कंपनीच्या एकूण ऑपरेशनल कॉस्टमध्ये एकट्या विमान इंधनाचा वाटा जवळपास ४० टक्के असतो. एअर इंडियाने नुकतीच आपल्या आंतरराष्ट्रीय विमान फेऱ्यांमध्येही कपात करण्याची घोषणा केली होती.

एअर इंडियाच्या एका वरिष्ठ सूत्राने सांगितले की, 'आमच्या देशांतर्गत विमानांसाठी पूर्वी इंधनाचा खर्च प्रति किलोलीटर ८०,००० रुपये होता. राज्य सरकारांनी लावलेला व्हॅट वेगवेगळ्या शहरांमध्ये वेगवेगळा असल्यामुळे, आता हा खर्च शहरांनुसार प्रति किलोलीटर १ लाख रुपयांपेक्षा जास्त झाला आहे. इंधनाचे दर इतके जास्त असताना विमान फेऱ्या चालवणे आर्थिकदृष्ट्या परवडणारे नाही'.कमी होण्याची शक्यता असलेल्या विमानांमध्ये मुंबई ते अहमदाबाद, नागपूर, पाटणा आणि भोपाळ दरम्यानच्या सेवांचा समावेश आहे. दिल्लीवरून हैदराबाद, बेंगळुरू आणि कोलकातासाठी जाणाऱ्या विमानांच्या फेऱ्याही कमी केल्या जातील, असे सूत्राने सांगितले. 'या कपातीचा मोठा भाग मुंबई आणि दिल्ली विमानतळांवरून करण्यात येईल. तर दक्षिणेकडील राज्यांनाही याचा फटका बसेल, कारण या मार्गांवरील परतीची विमानेही रद्द केली जातील', असेही त्यांनी स्पष्ट केले.

# आसाराम बापूला हायकोर्टाचा मोठा झटका

**राजस्थान-** अल्पवयीन मुलीवरील बलात्कार प्रकरणात आसाराम बापू याला हायकोर्टाने मोठा झटका दिला आहे. आसाराम बापू याला सुनावण्यात आलेली जन्मठेपेची शिक्षा राजस्थान हायकोर्टाने कायम ठेवली आहे. आसाराम बापूचा जामीन अर्ज उच्च न्यायालयाने फेटाळून लावलय. मात्र त्याला अंशतः दिलासा देत सामूहिक बलात्कार (गँगरेप) आणि गुन्हेगारी कट रचण्याच्या आरोपातून त्याची निर्दोष मुक्तता केली आहे.

२०१३ मध्ये हे प्रकरण समोर आले. जोधपूर येथील आश्रमात अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याचे आरोप झाले. तपासाअंती पोलिसांनी आरोपपत्र दाखल केले. त्यानंतर एप्रिल २०१८ मध्ये विशेष पोक्सो न्यायालयाने आसारामला दोषी ठरवत नैसर्गिक मृत्यू येईपर्यंत (उर्वरित आयुष्यासाठी) जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती. या निकाला विरोधात आसारामने उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती.राजस्थान उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती अरुण कुमार मोंगा आणि न्यायमूर्ती योगेंद्र कुमार पुरोहित यांच्या खंडपीठासमोर आसारामच्या याचिकेवर सुनावणी झाली. यावेळी जन्मठेपेची शिक्षा रद्द करण्याची आसारामची याचिका उच्च न्यायालयाने फेटाळून लावली. याचिका फेटाळताना खंडपीठाने स्पष्ट केले की, भारतीय दंड संहितेअंतर्गत (IPC) बलात्काराचा आरोप, पोक्सो (POCSO) कायद्यांतर्गत लैंगिक छळाचा आरोप आणि बाल न्याय (pespes) कायद्यांतर्गत असलेले गुन्हे सिद्ध झाले आहेत. सामूहिक बलात्कार आणि गुन्हेगारी कटाशी संबंधित आरोप कायम ठेवण्यासाठी रेकॉर्डवरील पुरावे पुरेसे नाहीत, असे न्यायालयाने स्पष्ट केले.दोन दिवसांपूर्वीच त्याच्या अंतरिम जामिनाची मुदत ७ जुलैपर्यंत वाढवण्यात आली आहे.

# 'नवतपा'च्या पहिल्याच दिवशी महाराष्ट्रात पारा ४७ अंशापार



**मुंबई-** वाढत्या उकाड्याने नागरिकांचा जीव कासावीस होत आहे. घराबाहेर पडले तर उष्म्याने असह्य होते. घरात एसी किंवा कुलरशिवाय नकोसे वाटते. मान्सूनपूर्वी हा ताप आणखी वाढला आहे. देशभरात 'नवतपा' सुरू झाला असून पुढील काही दिवस हा उष्मा कायम राहणार आहे. या नऊ दिवसांच्या कालावधीत तापमानात सर्वाधिक वाढ झाल्याची नोंद होते. यंदा २५ मेपासून नवतपा सुरू झाला असून येत्या २ जूनपर्यंत 'नवतपा'चा प्रभाव कायम राहण्याचा अंदाज आहे.

पंचांगानुसार, सूर्य जेव्हा रोहिणी नक्षत्रात प्रवेश करतो त्या काळाला नवतपा असे म्हटले जाते. 'नव' म्हणजे नऊ आणि 'तपा' म्हणजे उष्णता. राजस्थानच्या लोककथांमधून ही संकल्पना प्रसिद्ध झाली असली तरी या प्रक्रियेला नैसर्गिक कारणे सुद्धा आहेत. एप्रिल ते मे महिन्यांदरम्यान पृथ्वीवरील जमीन अनेक आठवडे प्रखर सूर्यप्रकाश शोषून घेत असते. त्यामुळे जमीन तापलेली असते. वातावरणातील आर्द्रतेचे प्रमाण कमी राहून मग उष्ण आणि कोरडे वारे वाहण्यास सुरुवात होते. यामुळे तापमान वाढायला सुरू होऊन उष्णतेच्या तीव्र लाटा येतात.

मान्सूनपूर्वी सरींच्या आगमनापूर्वी नऊ दिवस हे वातावरण कायम राहते. भारतातील उत्तर आणि मध्य भागांतील राज्यांमध्ये 'नवतपा'चा सर्वाधिक परिणाम दिसून येतो. या काळात तापमान ४५ अंशाच्या पुढे पोहोचते आणि उष्णतेच्या लाटांचा धोका निर्माण होतो. हे नऊ दिवस संपूर्ण आकाश निरभ्र राहते. याच कारणामुळे सूर्याची किरणे थेट जमिनीवर पोहोचतात. त्यात उष्ण वारे वाहू लागते. या कारणांमुळे तापमान वाढून उष्माघाताचा धोका निर्माण होतो.

पंजाब, हरियाणा, नवी दिल्ली, उत्तर प्रदेश आणि राजस्थानसारख्या राज्यांमध्ये दिवसा तीव्र उष्ण वारे वाहणार असून रात्री काहीसा दिलासा मिळण्याची शक्यता आहे. या कालावधी अनेक राज्यांमधील शाळांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. दुपारपर्यंत रस्ते डोळ्यांसमोर तरंगू लागले आहेच तर पायाखाली भट्टी झाल्याचा अनुभव येत आहे. त्यात एल निनोच्या प्रभावामुळे नागरिकांना लवकर दिलासा मिळेल याची शक्यता कमी वाटते आहे.

नवतपा ला २५ मेपासून सुरूवात झाली आहे. सोमवारी, उत्तर प्रदेशातील बांदा आणि महाराष्ट्रातील ब्रम्हपुरी येथे तापमान ४७.६ अंश सेल्सिअसवर नोंदलं गेलं होतं. पुढील काही दिवस या परिसरांमध्ये उष्णतेची लाट कायम राहणार असून २९ मे नंतरच काहीसा दिलासा मिळण्याची शक्यता आहे. या काळात दुपारी ११ ते ५ दरम्यान नागरिकांना घराबाहेर न पडण्याचा सल्ला देण्यात आला आहे

## संक्षिप्त

### अर्थखाते अद्याप न मिळाल्याने अजितदादांच्या राष्ट्रवादीत नाराजीचा सूर



**मुंबई-** अजित पवार यांच्या निधनानंतर सुनेत्रा पवार यांना उपमुख्यमंत्री बनवण्यात आले, पण अजितदादांकडे असलेले अर्थखाते अद्याप राष्ट्रवादी काँग्रेसला दिले गेलेले नाही. त्यामुळे राष्ट्रवादीत नाराजीचा सूर उमटला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदार आणि पदाधिकाऱ्यांची आज मुंबईत बैठक झाली. त्या बैठकीत अर्थखाते अद्याप राष्ट्रवादीकडे आलेले नाही याबद्दल नाराजी व्यक्त झाली. अजितदादांच्या निधनानंतर त्यांच्याकडील अर्थखाते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे आहे. या वर्षीचा अर्थसंकल्पही त्यांनी अधिवेशनात मांडला होता. मात्र दादांच्या निधनाला दोन महिने उलटल्यानंतरही महायुतीमध्ये राष्ट्रवादीच्या कोटय़ात असलेले अर्थखाते अद्याप राष्ट्रवादीकडे आलेले नाही. यामुळेच राष्ट्रवादीमध्ये खदखद व्यक्त होत आहे. राष्ट्रवादीला अर्थखाते मिळाले तर ते कोणाकडे सोपवले जाणार याबद्दलही चर्चा रंगली आहे. अर्थखात्यासारखी महत्त्वाची जबाबदारी सांभाळण्यासाठी ज्येष्ठ सदस्याला प्राधान्य दिले जाते. परंतु सध्या राष्ट्रवादीमध्ये हे खाते सक्षमपणे सांभाळू शकेल असा नेता नसल्याचेही बोलले जात आहे.

### ताजमहाल मोफत पाहण्याची संधी



**आग्रा-** येथील 'ताजमहाल' जगातील सात आश्चर्यांपैकी एक आहे. आयुष्यात एकदा तरी ताजमहालला भेट देण्याची इच्छा देश-विदेशातील प्रत्येक पर्यटकाची इच्छा असते. एवढेच नाही विदेशातील प्रमुख नेते हिंदुस्थान दौऱ्यावर येतात तेव्हा आवर्जून ताजमहाल पाहायला जातात. आता हाच ताजमहाल फुकटात पाहण्याची संधी चालून आली आहे.ईद-उल-अजहा अर्थात बकरी ईदच्या निमित्ताने ताजमहालला भेट देणाऱ्या पर्यटकांना प्रशासनाने दिलासा दिला आहे. २८ मे रोजी सकाळी ७ ते १० या वेळेत हिंदुस्थानतील आणि विदेशातील ताजमहाल परिसरात विना तिकीट प्रवेश दिला जाणार आहे. सकाळी १० वाजेनंतर मात्र नेहमीच्या नियमांनुसार तिकीट शुल्क लागू होईल. अधीक्षक पुरातत्वशास्त्रज्ञांच्या आदेशानुसार सकाळी ७ ते १० या ३ तासांच्या कालावधीत हिंदुस्थानी पर्यटकांकडून आकारले जाणारे ५० रुपये आणि परदेशी पर्यटकांकडून आकारले जाणारे ११०० रुपये प्रवेश शुल्क पूर्णपणे माफ असेल. ही सूट फक्त ताजमहालच्या मुख्य परिसरासाठी लागू असेल. मुख्य मकबऱ्यामध्ये जाण्यासाठी नेहमीप्रमाणे २०० रुपयांचे अतिरिक्त तिकीट घ्यावेच लागेल. दरवर्षी बकरी ईदच्या दिवशी अशाच प्रकारची व्यवस्था केली जाते.दरम्यान, बकरी ईदनिमित्त ताजमहाल परिसर आणि मशिदीमध्ये नमाज पठणासाठी स्थानिक नागरिक आणि पर्यटकांची मोठी गर्दी होण्याची शक्यता आहे. ही गर्दी लक्षात घेऊन प्रशासनाने सुरक्षेचे चोख बंदोबस्त केले आहेत. प्रवेशद्वारांवर अतिरिक्त पोलिस बंदोबस्त आणि सुरक्षा रक्षक तैनात केले जातील. तसेच गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी महिला आणि पुरुषांसाठी स्वतंत्र रांगांची व्यवस्था केली जाईल.

### रविंद्रन बायजू यांना तुरुंवासाची शिक्षा



**सिंगापूर-** एकेकाळी शिक्षण क्षेत्रातील आघाडीची कंपनी असलेल्या बायजूचे संस्थापक रवींद्रन बायजू यांना सिंगापूर न्यायालयाकडून सहा महिन्याच्या तुरुंगवासाची शिक्षा सुनावण्यात आल्याचे समजते. न्यायालयाचा अवमान केल्याप्रकरणाच्या खटल्यात सिंगापूर न्यायालयाने ही शिक्षा ठोठावली आहे. इंडिया टुडेने याबाबत वृत्त दिले आहे.न्यायालयाने दिलेल्या माहितीनुसार, रवींद्रन यांनी एप्रिल २०२४ पासून त्यांच्या मालमत्तेशी संबंधित प्रकरणात न्यायालयाच्या अनेक आदेशांचे वारंवार उल्लंघन केले आहे. त्यामुळे न्यायालयाने त्यांना सहा महिन्याच्या तुरुंगवासाची शिक्षा सुनावली आहे. रवींद्रन यांना तात्काळ पोलिसांसमोर शरण येण्यास सांगण्यात आले आहे.

### ऑनलाइन बुकिंग आता सुपरफास्ट; रेल्वेची नवी प्रणाली लवकरच



**मुंबई-** भारतीय रेल्वे प्रवासी आरक्षण प्रणालीत मोठा तांत्रिक बदल करत 'नेक्स्टजेन पीआरएस' प्रणाली लवकरच सुरू करणार आहे. या नव्या प्रणालीमुळे येत्या काळामध्ये मिनिटाला तब्बल ३२ हजारांऐवजी तब्बल दीड लाख रेल्वे तिकिटे बुक होणार आहेत. सध्या ऑनलाइन तिकीट बुकिंगचे प्रमाण जास्त आहे. म्हणूनच रेल्वेने ही तांत्रिक सुधारणा केली आहे. नव्या प्रणालीमधील अपडेट ऑगस्टपासून प्रत्यक्षात लागू होणार आहेत.भारतीय रेल्वेने ४० वर्षांपूर्वी म्हणजेच १९८५ मध्ये दिल्ली येथे पीआरएस प्रणाली सुरू केली होती. १९९९ मध्ये देशव्यापी नेटवर्किंग पूर्ण झाल्यानंतर देशातील कोणत्याही जोडलेल्या आरक्षण केंद्रातून तिकीट आरक्षण, पीएनआर चौकशी आणि तिकीट रद्द करण्याची सुविधा उपलब्ध झाली. सध्या देशातील जवळपास ८० टक्के रेल्वे तिकिटे रेल्वे पर्यटन आणि आयआरसीटीसी माध्यमातून ऑनलाइन बुक केली जातात.

### भोंदू अशोक खरातचे काळे कारनामे आता सिनेमातून

**मुंबई-** भोंदू बाबा अशोक खरात प्रकरण नाशिकमध्ये समोर आले आणि संपूर्ण महाराष्ट्रात खळबळ उडाली. खरात प्रकरणाने सामाजिक काय तर राजकीय वर्तुळातही मोठ्या हालचाली घडल्या. अशोक खरातची सध्या पोलिसांकडून चौकशी सुरु आहे. अशातच आता महत्त्वाची बातमी समोर आली आहे. अख्खा महाराष्ट्र हादरवणाऱ्या भोंदू बाबा अशोक खरातच्या काळ्या कृत्यांवर लवकरच सिनेमा येणार आहेत.नुकतीच घोषणा झालेल्या 'महाराष्ट्र एपस्टीन फाईल्स' या मराठी चित्रपटातुन संपूर्ण महाराष्ट्र हादरवणाऱ्या खरात प्रकरणाचा पर्दाफाश करण्यात येणार आहे. मोशन पोस्टर प्रदर्शित करून 'महाराष्ट्र एपस्टीन फाईल्स' या चित्रपटाची घोषणा करण्यात आली आहे. २ ऑक्टोबर २०२६ रोजी हा चित्रपट संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार असल्याचे मोशन पोस्टरवर घोषित करण्यात आले आहे.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## उष्माघाताचा प्रकोप

**स**ध्या देशभरात उन्हाचा पारा सातत्याने नवनवे उच्चांक गाठत असून, उत्तर भारतासह अनेक राज्यांमध्ये भीषण उष्णतेची लाट पसरली आहे. दिल्ली-एनसीआरसह अनेक शहरांमधून समोर येणारी आकडेवारी केवळ अंगाची लाहीलाही करणारी नाही, तर मानवी आरोग्यासाठी एक गंभीर धोक्याची घंटा वाजवणारी आहे. आजवर आपल्याला उन्हाळ्यातील आजार म्हणजे केवळ अस्वस्थता, घाम येणे, थकवा किंवा जास्तीत जास्त 'सनस्ट्रोक' इतकेच माहीत आहे; मात्र यंदा उन्हाळ्याने धारण केलेले रौद्ररूप आणि वैद्यकीय तज्ज्ञांनी दिलेले इशारे पाहता, हा ऋतू आता सार्वजनिक आरोग्य आणीबाणी निर्माण करत आहे. या भीषण हवामानाचा परिणाम थेट 'मज्जासंस्था' आणि दृष्टीवर होत असल्याचे वैद्यकीय अहवालांमधून सिद्ध होत आहे. या पार्श्वभूमीवर, वाढत्या तापमानाचे मानवी शरीरावरील होणारे आघात समजून घेणे आणि त्याविरुद्ध वेळीच व्यापक पावले उचलणे ही काळाची गरज बनली आहे. या बदलत्या आणि अत्यंत आक्रमक बनलेल्या उन्हाळ्याच्या आजारांचे स्वरूप पूर्वीपेक्षा पूर्णपणे भिन्न आहे. दिल्लीच्या आघाडीच्या रुग्णालयांमधील ओपीडीमध्ये केवळ उन्हामुळे आजारी पडणाऱ्या रुग्णांच्या संख्येत तब्बल २० टक्क्यांची मोठी वाढ झाली आहे. सर्वात चिंतेची बाब म्हणजे, या रुग्णांमध्ये ताप, जुलाव किंवा उलट्या यांसारख्या पारंपरिक लक्षणांपेक्षा 'न्यूरोलॉजिकल' संबंधित गंभीर आजारांची गुंतागुंत घेऊन येणाऱ्यांचे प्रमाण सर्वाधिक आहे. देशातील ज्येष्ठ न्यूरोलॉजिस्टनी स्पष्ट केल्यानुसार, 'लू' आणि अतिउष्णतेचा थेट संबंध आपल्या मेंदूच्या कार्यप्रणालीशी आहे. मानवी शरीर अंतर्गत तापमान नियंत्रित ठेवण्यासाठी एका विशिष्ट मर्यादेपर्यंत संघर्ष करू शकते; परंतु जेव्हा बाहेरील तापमान सातत्याने ४० ते ४५ अंश सेल्सिअसच्या पार जाते आणि व्यक्ती प्रदीर्घ काळ या वातावरणाच्या संपर्कात राहते, तेव्हा शरीराचे हे अंतर्गत संतुलन कोलमडून पडते.

अतिउष्णतेमुळे शरीराला मोठ्या प्रमाणावर घाम येतो. या घामाच्या वाटे केवळ पाणीच नाही, तर शरीरातील अत्यंत महत्त्वाचे इलेक्ट्रोलाइट्स वाहून जातात. शरीरात निर्माण होणारी ही पाण्याची तीव्र कमतरता आणि इलेक्ट्रोलाइट्सचे विघडलेले संतुलन थेट मेंदूच्या रक्तप्रवाहावर परिणाम करते. मेंदूला होणारा रक्तपुरवठा मंदावल्यामुळे किंवा विस्कळीत झाल्यामुळे तंत्रिका तंत्रावर कमालीचा ताण येतो. याचे सद्यस्थितीत ओपीडीमध्ये दिसणारे परिणाम म्हणजे तीव्र डोकेदुखी, सतत चक्कर येणे, व्यक्तीला आजूबाजूच्या परिस्थितीचा अचानक विसर पडणे किंवा मानसिक भ्रम होणे हे आहेत. अनेक कमकुवत रुग्ण, वृद्ध आणि लहान मुले भर उन्हात किवा पुरेशी हवा नसलेल्या ठिकाणी अचानक बेशुद्ध पडत आहेत. इतकेच नव्हे तर, अतितापमानामुळे मेंदूतील विद्युत लहरींचे नियंत्रण सुटून रुग्णांना झटके येण्याच्या घटनांमध्येही वाढ झाली आहे. या लक्षणांकडे केवळ उन्हाळ्याचा थकवा म्हणून दुर्लक्ष करणे अत्यंत धोकादायक ठरू शकते; कारण ही न्यूरोलॉजिकल आणीबाणी असून, यामध्ये तत्काळ वैद्यकीय उपचार न मिळाल्यास रुग्णाच्या जीवाला कायमचा धोका निर्माण होऊ शकतो. या महातापमानाचा दुसरा मोठा फटका आधीपासूनच विशिष्ट आजारांनी ग्रस्त असलेल्या रुग्णांना बसत आहे. मायग्रेन, अपस्मार किंवा नसांच्या जुन्या विकारांनी ग्रस्त असलेल्या व्यक्तींसाठी हा उन्हाळा एका छळासारखा ठरत आहे. अतिउष्णतेचे दिवस आणि त्याहूनही अधिक त्रासदायक असणाऱ्या उष्ण रात्री यामुळे रुग्णांची झोप पूर्ण होत नाही. अनेक भागांत होणारी वीज कपात या त्रासात भर घालत आहे. अपुऱ्या झोपेमुळे आणि सततच्या शारीरिक ताणामुळे मायग्रेनच्या रुग्णांमध्ये डोकेदुखीची वारंवारता आणि तीव्रता कमालीची वाढली आहे. अपस्माराच्या रुग्णांमध्ये झटके येण्याचे प्रमाण उन्हाळ्यात वाढते, कारण त्यांचे शरीर अंतर्गत उष्णतेचा ताण सहन करू शकत नाही. मज्जासंस्थेइतकाच उन्हाचा थेट आणि मोठा मारा आपल्या नाजूक डोळ्यांवर होत आहे. सूर्यप्रकाशातील अतिनील किरणे, हवेतील उष्ण वारे, वाढती धूळ आणि प्रदूषण डोळ्यांच्या आरोग्यासाठी अत्यंत घातक ठरत आहेत. नेत्ररोग तज्ज्ञांच्या मते, या ऋतूत 'ड्राय आय सिंड्रोम'च्या रुग्णांमध्ये प्रचंड वाढ झाली आहे. डोळ्यांमधील पाण्याचा थर उन्हामुळे वेगाने सुकतो, ज्यामुळे डोळ्यांची जळजळ होणे, डोळे लाल होणे, सतत खाज सुटणे आणि डोळ्यांवर प्रचंड ताण येणे अशा समस्या उद्भवतात. उष्ण हवेतील धुळीच्या कणांमुळे 'अलर्जिक कंजंक्टिव्हायटिस' म्हणजेच डोळे येण्याची साथ पसरत आहे. या वाढत्या संकटाचा सामना करण्यासाठी आता केवळ शासकीय पातळीवरील आपत्ती व्यवस्थापन पुरसे ठरणार नाही, तर प्रत्येक नागरिकाला वैयक्तिक पातळीवर आरोग्याची शिस्त लावावी लागेल. वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञांनी दिलेले सल्ले आता मार्गदर्शक तत्त्वे म्हणून स्वीकारण्याची वेळ आली आहे.



# एक हंगाम घ्यायची का सुट्टी ?

**जगात सर्वत्र अस्थैर्य, अनिश्चितता व आर्थिक संकटाची स्थिती स्पष्ट दिसते आहे. भारतात परिस्थिती आणखी गंभीर आहे. शेती करून फायदा होईल का? की जास्त तोटा होईल, असा ही प्रश्न काही शेतकऱ्यांच्या मनात निर्माण होत आहे. मग एक हंगाम शेतकऱ्यांनी सुट्टीच घेतली तर...?**

**शे**ती करण्यासाठी आता ट्रॅक्टर वापरणे अपरिहार्य झाले श आहे. त्यासाठी इंधन म्हणून डिझेलची आवश्यकता आहे. डिझेलच्या पंपावर आताचा पुरेसे डिझेल मिळणे मुश्किल झाले आहे, रांगांमध्ये तासन् तास थांबावे लागते आहे. त्यात डिझेल, पेट्रोलची दरवाढ सुरूच आहे. ट्रॅक्टरमालक नांगरणी, वखरणी, रोटाव्हेटर मारणे, पेरणी करणे यासाठी जास्त पैशांची मागणी करणार. जुन्या दरानेच शेती करणे परवडत नव्हते, वाढीव दराने कशी परवडेल? मग एक वर्ष शेतीला विसावा देऊ अन् आपणही एक हंगाम आराम करूया. नाहीतरी मशागत करून तोटाच होणार आहे ना! आखातात सुरू असलेल्या युद्धामुळे हॉर्मूजची खाडी बंद आहे. खते तयार करण्यासाठी लागणारा बराच कच्चा माल या खाडीतून आणावा लागतो. तो मिळणार नाही, मिळाला तर महाग मिळेल. रासायनिक खते पदरात पडून घेण्यासाठी मारामाऱ्या कराव्या लागतील अशी परिस्थिती आहे. जैविक शेती करावी म्हटले तर शेण खताचे दर सुद्धा चौपट वाढले आहेत. इतक्या महागाची खते टाकून फायदा होईल का? तोटाच होणार असले तर कशाला खतांसाठी रांगेत उभे राहायचे? राहूदे ना जमीन एक हंगाम पडीक. त्यामुळे तरी जमिनीचा पोत सुधारेल.

### 'एल निनो'चे संकट

या वर्षी भारतातील हवामानावर 'एल निनो'चा मोठा प्रभाव होण्याची शक्यता आहे. पर्जन्यमान कमी राहण्याची शक्यता आहे. तुम्ही महागाचे डिझेल खरेदी करून मशागत केली, पहाटेपासून रांगेत उभे राहून रासायनिक खते मिळविली अन् पुरेसा पाऊसच झाला नाही तर काय उपयोग? पिके करपून जाणार किंवा उत्पादन कमी येणार. जास्त खर्च करून उत्पादन कमी झाले, तर तोटाच होणार ना! मग कशाला धोका पत्करायचा? घ्या ना एक हंगाम सुट्टी!

### युद्धामुळे निर्यातीवर मर्यादा

भारतातून काही शेतीमाल आखाती देशात, युरोप, आफ्रिकेत निर्यात होत असतात. युद्धामुळे फार निर्यात होत नाही याचा परिणाम आजच पाहात आहोत. आणखी सहा महिने तरी हे युद्ध थांबण्याची चिन्हे नाहीत असे जाणकारांचे मत आहे. भारतात नेहमीप्रमाणे शेतीमालाचे उत्पादन झाले व दर वर्षी होते तशी निर्यात झाली नाही, तर भारतात अतिरिक्त पुरवठा होऊन मालाचे दर पडतील. मग तोटाच होणार! मग कशाला पिकवायचे? एक हंगाम, करा आराम! घ्या सुट्टी!

**पूवार्ध**

बरेच शेतकरी असा विचार करतील की खूप शेतकऱ्यांनी घेतली अन् मालाचे उत्पादन कमी झाले, तर आपल्या मालाला जास्त भाव मिळेल. पण हे सरकार असे कधीच होऊ देणार नाही. देशाची आर्थिक परिस्थिती, युद्धाचे परिणाम, इंधनटंचाईमुळे वाढणारी महागाईमुळे सत्तेतील सरकार त्रस्त असणार आहेत. काहीही करून खाद्यान्नाची महागाई वाढू द्यायची नाही हे उद्दिष्ट जपले जाणार आहे. महागाई नियंत्रित ठेवायची असेल, तर फक्त शेतीमालाचे दर कमी ठेवता येतात. दुसरे कशाचेच नाही. बस स्थानकावरील सुलभ शौचालयवाला सुद्धा दहा रुपयांच्या ऐवजी पाच रुपये घेणार नाही. डिझेलचे दर वाढले, वाहतूक खर्च वाढला की सर्व गोष्टींचे दर वाढणार. शेतकऱ्याकडून घेतलेले धान्य, भाजीपाला महागच होणार म्हणून शेतकऱ्यांकडून जास्तीत जास्त स्वस्त घेण्याकडे सरकारचे लक्ष राहणार आहे. जे असा विचार करतील, की तुटवडा असल्यामुळे आपल्या मालाला जास्त दर मिळतील त्यांची निराशा होणार आहे. शेतीमालाचे दर कमी ठेवण्यासाठी सरकार निर्यातबंदी, स्टॉक लिमिट, लेव्ही लावून जबरदस्तीने तुमचा माल सरकार ताब्यात घेऊ शकते. तोटा होणे निश्चित आहे.

### सरकार कोंडीत सापडणार आहे

शेतीमालाचे दर पाडण्यासाठी वर सांगितलेले उपाय सरकार करतेच, त्या बरोबर इतर देशांतून शेतीमाल आयात करून भाव पाडण्याचे हत्यारसुद्धा सरकार वेळोवेळी वापरत असते. या वेळी मात्र परिस्थिती वेगळी आहे. भारताकडे असलेले परकीय चलन इंधन (क्रूड तेल) खरेदी साठीच खर्च होणार आहे. रुपयाची घसरण सुरूच आहे. डॉलर देऊन शेतीमाल आयात करणे सरकारला शक्य नाही. त्यामुळे भाव पाडण्यासाठी आयातीचा धोका नाही. शेतकऱ्यांनी एक हंगाम पिकवले नाही, तर जनतेला ही जरा महाग खायची सवय लागेल. सरकारच्या रेवडी कल्चरमुळे जनता स्वस्त खायला चटावलेली आहे. एका कुटुंबात मोबाइल रिचार्जवर दीड, दोन हजार रुपये महिन्याला खर्च करायला तयार असतात; पण कांद्यासाठी महिन्याला दोनशे रुपये खर्च करावे लागले तरी यांच्या डोळ्याला पाणी येते.

शेतकरी नेते शरद जोशी यांना एकदा पत्रकारांनी विचारले होते, की आपण पोटापुरते पिकविण्याचे शेतकऱ्यांना आवाहन करता, मात्र शेतकरी तसे करताना दिसत नाही, असे का? त्यावर शरद जोशींनी असे उत्तर दिले, की 'शेतकरी सहजा सहजी असे उपाय अवलंबणार नाहीत. ज्या वेळी त्यांना असे वाटेल, की आपण कोंडीत सापडलो आहोत आणि काहीही पिकवले तरी तोटाच होणार आहे तेव्हाच तो हा मार्ग अवलंबेल.' मला वाटते तशी परिस्थिती निर्माण झाली आहे. शेतकरी वैतागलेला आहे. मालाला भाव नाही, खते, इंधन, मजूर महाग झाले आहेत. मजूर तर पैसे देऊन सुद्धा मिळत नाही. जमिनी निकस होत चालल्यामुळे उत्पादन नाही, अधिक उत्पादन देणाऱ्या, खर्च कमी करणाऱ्या नवीन जाती नाहीत, पुढची पिढी शेतात थांबायला तयार नाही. अनेकांना शेती सोडायची आहे, पण हे सोडून काय करावे हे सुचत नसल्यामुळे तिथेच अडकून पडले आहेत.शेतकरी कोंडीत सापडला आहे तसे सरकारही कोंडीत सापडले आहे. शेतकऱ्यांनी एक हंगाम किंवा एक वर्ष जर सुट्टी घेतली तर नक्कीच आपल्या प्रश्नाला वाचा फुटू शकते. तुम्ही शेती पेरावी म्हणून सरकार तुमचे पाय धरेल. पाहा एकदा प्रयोग करून. घ्या सुट्टी!

**अनिल घनवट**
मो.-९९२३७०७६४६

# ट्रंपनी काय मिळवले?

**डो**नल्ड ट्रंप दोन दिवस चीनमधे राहिले, सी जिनपिंग यांच्याशी बोलले. सतत जिनपिंगची खुशामद करत होते.जिनपिंग गंभीर होते. फार तर दहा वाक्यं बोलले असतील. दोनेक तास दोघे एकांतात होते. तिथं काय ठरले ते कळायला मार्ग नाही. खाजगी चर्चेत काय बोलणें झाले ते जिनपिंग जाहीर करत नाहीत. मागे एकदा कॅनडाचे पंतप्रधान ट्रुडो यांनी खाजगी बोलण्यातल्या काही गोष्टी पत्रकारांना सांगितल्या. जिनपिंग वैतागले. त्यांनी ट्रुडोना खाजगीतच झापले, पुन्हा तुमच्याशी बोलणार नाही असे सांगून टाकले.

तैवानने स्वतंत्र होण्याच्या गोष्टी करू नयेत, दूरवर ९५०० मैलावर येऊन कोण कशाला लढेल असे ट्रंप म्हणाले. तैवानला देऊ केलेल्या शस्त्रास्त्रांबाबत पुनर्विचार करत आहोत; २०० बोईंग विमाने चीन खरीदणार आहे (५०० ची खरेदी होईल अशी अपेक्षा होती); १७ अब्ज डॉलरचा शेतमाल चीन खरीदणार आहे;असे ट्रंपनी जाहीर केले.

अमेरिकेबरोबर झालेल्या चर्चेत ठरले की दोघांनी सहकार्य करायचे; मर्यादा सांभाळून दोघांनी स्पर्धा करायची; मतभेद हाताळता येतील असे ठेवायचे; अपेक्षा करता येईल इतकी शांतता सांभाळायची. म्हणजे काय? अगदी सुळसुळीत निर्णय. अत्यंत सावध निर्णय. चीन काहीही करायला मोकळा असेल. ट्रंप यांनी सोबत दांडगे उद्योगपती नेले होते. ट्रंप यांना धंदा करायचा होता. एनाविडियाला चिप्स



विकायच्या होत्या, टेसलाला कार विकायच्या होत्या, ॲपलला त्यांची यंत्रे विकायची होती. ते जमलेले दिसत नाही. अगदीच मोकळ्या हाताने परतले असे वाटू नये यासाठी चीनने बोईंग आणि शेतमाल विकत घेतला. पण त्या बदल्यात अमेरिका १४ अब्जांची शस्त्रे तैवानला विकणार होते, ती विक्री जिनपिंगनी थांबवली. त्यासाठी इतका खटाटोप? ट्रंपांची सुरक्षा महाकाय होती. कित्येक विमाने भरून कार आणि सुरक्षा रक्षक चीनमधे नेले होते. तोच खर्च कित्येक अब्जांचा असू शकतो.त्या मानाने जिनपिंग यांची मिळकत मोठी आहे.

चीनला तैवान हवे आहे आणि दक्षिण चीन समुद्राची मालकी हवी आहे. ओबामा आणि बायडन, दोघांनीही तैवान, द. चिनी समुद्र द्यायला नकार दिला होता. ट्रंपनी तैवानला वाऱ्यावर सोडलय, तैवानसाठी अमेरिका लढणार नाही असे ट्रंप म्हणाले. चीनने राजकीय स्वातंत्र्य मिळवले तेव्हा तैवान वेगळा झाला होता. चीनचे म्हणणे असे की तैवान चीनचाच भाग आहे. ट्रंपनी ते मान्य केले आहे.

दुसरे महायुद्ध संपवल्यावर अमेरिकेने जगभर पाय पसरले होते. कधी रशियाला तर कधी चीनला मापात ठेवत अमेरिकेने जगावर राज्य केले होते. जगातली सर्वात मोठी एकमेव शक्ती अशा रूपात अमेरिका जगासमोर आले. काळाच्या ओघात सोवियेत युनियनचे विघटन होऊन रशिया कमकुवत झाला. चीनने मात्र देंग यांच्या कारकीर्दीत आर्थिक झेप घेतली, चीन ही जगातली एक मोठी शक्ती झाली. अमेरिकेला ते मान्य नव्हते. अमेरिका नेहमीच चीनला दुय्यम मानून तसा व्यवहार करत असे.

ट्रंप यांच्या दौऱ्यात जिनपिंगनी चीन जगातला एक नंबरचा देश आहे, किमान पक्षी अमेरिकेच्या बरोबरीचा आहे हे सिद्ध केले. ट्रंप चीनमधे अगदीच शामळू झाले होते. इराण युद्धात मदत करा, होरमुझ खाडी मुक्त करा अशी विनंती ट्रंपनी केली. जिनपिंगनी कोणतीही ठाम भूमिका घेतलेली नाही. ना अमेरिकेच्या बाजूने ना इराणच्या बाजूने. कोणी तरी काही तरी मागते आणि माणूस काहीही न देता नुसते बघू म्हणून गप्प रहातं याचा अर्थ काय होतो?अमेरिकेला चीनकडे मदत मागायला जावे लागते यातच सारे काही आले.

ट्रंप परत आले आणि दोनच दिवसात पुतीन चीनमधे गेले. पुतीनही याचकासारखेच गेले होते. रशियाची अवस्था बिकट आहे. युक्रेन युद्ध रशियाला महागात पडले आहे. केवळ आपली मस्ती दाखवण्यासाठी रशिया युक्रेनवर बॉंब टाकत आहे. पण युद्ध जवळजवळ थांबल्यासारखे आहे. चीन रशियाचे तेल खरेदी करते, त्यावर रशिया तग धरून आहे. गॅसची एक पाईप लाईन रशियाला चीनच्या दिशेने टाकायची आहे. तो प्रकल्प मागे पडलाय. त्याचा तगादा लावायला पुतीने चीनमधे गेले होते.

युक्रेन युद्ध पाचेक वर्षं चालल आहे. चीन रशियाला युद्ध थांबवा असंही सांगत नाही आणि चालू ठेवा असही सांगत नाही. गंमत पहा. एकीकडे चीन रशियाचे तेल विकत घेऊन रशियाला जगवत आहे, युक्रेनशी लढायला शक्ती देतोय. पण त्याच बरोबर चीन युक्रेनला ड्रोनचा पुरवठाही करत आहे. शस्त्रे विकणे हा आमचा धंदा आहे, तो आमचा व्यवसाय आहे, त्याचा राजकारण किंवा तत्वाशी संबंध नाही असे चीनचे धोरण. लढा तुम्ही दोघे, तुमचे तुम्ही पहा अशी चीनची व्यावहारिक भूमिका दिसत आहे.

युक्रेन आणि इराण युद्धाने जगाचे सारे राजकारण, अर्थकारण बदलल आहे. ते वळणावर आणण्यासाठी अमेरिका,रशिया अशा दोघांनाही चीनकडं जावे लागत आहे. यातच चीनचे स्थान स्पष्ट होत आहे.ट्रंपनी अमेरिकेची वाट लावलीय. जिनापिंगनी अमेरिकेने लादलेल्या जकातीला तोंड देत चीनची अर्थव्यवस्था सांभाळलीय, चीनने ट्रंपसमोर अजिबात पडते घेतलेले नाही. जिनपिंगनी अर्थव्यवस्थेचा काही एक विचार केला आहे. अंतर्गत मागणी वाढवून ती पूर्ण करण्याच्या दिशेने त्यांची वाटचाल आहे. निर्यात हा मुद्दा त्यांनी काहीसा दुय्यम केला आहे. उपलब्ध असलेली साधन सामग्री आणि विकासासाठी आवश्यक बाहेरून घ्याव्या लागणाऱ्या गोष्टी यांचा तोल राखून जिनपिंग चीनची अर्थव्यवस्था चालवतील असे दिसत आहे.जगाची राजकीय घडण बदलतेय. चीन केंद्रस्थानी जात आहे. चीनने बरच मिळवल आहे, ट्रंपनी काय मिळवले?

**-निळू दामले**

# १२ वर्षे सत्ता आणि देशाचे 'बारा'

**२**०१४ मध्ये देशाला स्वप्न विकले गेले. 'अच्छे दिन', 'दोन कोटी रोजगार', 'काळा पैसा परत', 'शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट', 'भ्रष्टाचारमुक्त भारत' घोषणा अशा दिल्या गेल्या. पण १२ वर्षानंतर मागे वळून पाहिल्यावर प्रश्न पडतो देश खरोखर बदलला की, फक्त प्रचाराचा भव्य सेट उभा राहिला?

आज लाखो तरुण पदव्या घेऊन फिरत आहेत, पण नोकऱ्या नाहीत. सरकारी भरती वर्षानुवर्षे रखडलेल्या आहेत. पेपरफुटी हा नवीन उद्योग झाला आहे. 'स्टार्टअप इंडिया'च्या नावाखाली तरुणाला स्वतःची बेरोजगारी स्वतःच सांभाळायला शिकवले गेले. महागाई इतकी वाढली की, सामान्य माणसाचे किचनच अर्थव्यवस्थेचे 'पोस्टमॉर्टेम' बनले. गॅस सिलेंडर, पेट्रोल, डाळ, तेल, औषधे, शिक्षण सर्व काही महाग. पण टीव्हीवर मात्र 'विश्वगुरू भारत'च्या जाहिराती झळकत राहिल्या. जनता EMI भरत राहिली आणि सरकार इव्हेंट करत राहिले.

नोटाबंदीला 'ऐतिहासिक निर्णय' म्हणत देशाला रांगेत उभे केले गेले. छोटे उद्योग बंद पडले, हजारो लोक बेरोजगार झाले. शेवटी काळा पैसा कुठे गेला? उत्तर आजही धुक्यात आहे. पण एक गोष्ट स्पष्ट झाली निर्णय मोठा असला म्हणजे तो योग्य असतोच असे नाही.

GST ने छोट्या व्यापाऱ्याला कागदपत्रांच्या दलदलीत ढकलले. मोठे उद्योगपती मात्र दिवसेंदिवस श्रीमंत होत गेले. देशात 'Ease of Doing Business'पेक्षा 'Ease of Helping Billionaires' जास्त वेगाने वाढल्याची भावना निर्माण झाली. काही मोजक्या उद्योगसमूहांच्या संपत्तीत विक्रमी वाढ होत असताना सामान्य माणूस कर्जात बुडत गेला.

शेतकऱ्यांच्या नावाने भाषणे झाली, फोटोशूट झाले, पण शेतकरी आजही आत्महत्या करतो आहे. दिल्लीच्या सीमांवर आंदोलन करणाऱ्या शेतकऱ्यांना देशद्रोही ठरवण्यापर्यंत सत्ता खाली गेली.अन्नदाता रस्त्यावर आणि सत्ता एसी हॉलमध्ये हेच या काळाचे सर्वात कटू चित्र आहे.पण या १२ वर्षांत सर्वात धोकादायक बदल कोणता झाला असेल तर तो म्हणजे 'निवडणूक जिंकणे' हाच सत्तेचा एकमेव धर्म बनला. साम, दाम, दंड, भेद वापरून विरोधकांना संपवणे, पक्ष फोडणे, जनतेने निवडून दिलेली सरकारे पाडणे आणि त्यालाच लोकशाहीचा विजय म्हणणे ही नवीन राजकीय संस्कृती देशाने पाहिली.कालपर्यंत ज्यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप केले, त्यांनाच सत्तेसाठी पक्षात घेऊन एका रात्रीत 'स्वच्छ' घोषित केले गेले. जनतेने नाकारलेल्या नेत्यांना सत्ता मिळाली आणि जनतेने निवडून दिलेल्या सरकारांना अस्थिर केले गेले. मग प्रश्न पडतो भ्रष्टाचाराविरोधातील लढाई खरी होती की फक्त सत्तेचा खेळ?

आज विरोधी पक्ष संपवून विरोधक नसलेली लोकशाही तयार करण्याचा प्रयत्न सुरू असल्याची भावना जनतेत वाढत आहे.पत्रकार प्रश्न विचारला तर देशविरोधी, विद्यार्थी आंदोलन केला तर अर्बन नक्षल, सरकारवर टीका केली तर ED-CBIची नोटीस!लोकशाहीचा चौथा स्तंभ मानली जाणारी माध्यमे मोठ्या प्रमाणावर सत्तेची जाहिरात एजन्सी बनल्याची टीका होत आहे. न्यायसंस्था, तपास यंत्रणा आणि स्वायत्त संस्थांवरही मर्जीप्रमाणे प्रभाव टाकल्याची भावना निर्माण झाली आहे. जे सत्तेच्या बाजूने बोलतात त्यांना संरक्षण, आणि जे प्रश्न विचारतात त्यांच्यावर कारवाई हा योगायोग किती वेळा घडणार?

धर्माच्या नावावर भावना पेटवल्या गेल्या, समाज विभागला गेला आणि खरे प्रश्न मागे फेकले गेले. बेरोजगारीवर चर्चा नको, महागाईवर चर्चा नको, शिक्षण-आरोग्यावर चर्चा नको फक्त भावनिक घोषणांचा धूर कायम ठेवायचा. कारण जनता प्रश्न विचारू लागली की प्रचाराचे फुगे फुटतात.हो, रस्ते झाले, डिजिटल व्यवहार वाढले, UPI आले, काही मोठे प्रकल्प उभे राहिले हेही सत्य आहे. पण प्रश्न इतकाच आहे की, विकासाचा लाभ सर्वसामान्यांच्या आयुष्यात दिसतोय का? की तो फक्त ड्रोन शॉट्स, LED स्क्रीन आणि निवडणूक भाषणांपुरताच मर्यादित आहे?१२ वर्षानंतरही जर तरुण निराश असेल, शेतकरी हतबल असेल, मध्यमवर्ग गुदमरलेला असेल आणि नागरिक भीतीत जगत असेल, तर 'देशाचे १२ वाजले' असे म्हणणे अतिशयोक्ती ठरत नाही. कारण लोकशाहीत सर्वात मोठा आरसा म्हणजे जनता. आणि आज त्या आरशात विकासापेक्षा प्रचाराचा मेकअप जास्त दिसतो आहे.इतिहासात अनेक राजे आले, त्यांनी स्वतःला अजेय समजले. पण शेवटी जनतेनेच त्यांचा अहंकार जमिनीवर आणला. सत्ता कायमची नसते; पण जनतेची स्मृती कायम राहत

**ॲड. धनंजय देशमुख**
मो.९२८४३८२१०२

# 'एपीजे अब्दुल कलाम अभ्यासिका'ची दुरवस्था..

## ग्रंथपाल गायब, वाय-फाय बंद, घाणीमुळे विद्यार्थी त्रस्त, कोट्यवधींच्या उद्देशाला व्यवस्थेचे ग्रहण जिल्हाधिकाऱ्यांनी तत्काळ लक्ष देण्याची विद्यार्थ्यांची मागणी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

✦ विवेक वानखडे




**यवतमाळ, दि. २७ :** विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी आणि स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या युवकांना सक्षम व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने उभारण्यात आलेली यवतमाळ शहरातील डॉ. एपीजे अब्दुल कलाम अभ्यासिका आज व्यवस्थेच्या दुर्लक्षामुळे अक्षरशः दुरवस्थेच्या गर्तेत सापडली आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उभारण्यात आलेल्या या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाची अवस्था पाहता प्रशासनाच्या उदासीनतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

माजी आमदार मदन येरावार यांच्या संकल्पनेतून सन २०२०-२१ मध्ये उभारण्यात आलेल्या या अभ्यासिकेचा उद्देश एमपीएससी, यूपीएससी व इतर स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना सर्व सुविधा उपलब्ध करून देणे हा होता. तब्बल १२० विद्यार्थ्यांच्या क्षमतेच्या या अभ्यासिकेसाठी शासनाकडून दरवर्षी विशेष निधीची तरतूदही केली जाते. मात्र प्रत्यक्षात या निधीचा उपयोग विद्यार्थ्यांच्या सुविधांवर होत आहे की अन्यत्र, असा प्रश्न विद्यार्थ्यांकडून उपस्थित केला जात आहे. अभ्यासिकेचे व्यवस्थापन जिल्हा सेतू समितीकडे असून जिल्हाधिकारी हे त्याचे अध्यक्ष आहेत. मात्र गेल्या तीन महिन्यांपासून येथे नियुक्त ग्रंथपाल अनुपस्थित असल्याची गंभीर बाब समोर आली आहे. विशेष म्हणजे, ग्रंथपाल सुट्टीवर असताना पर्यायी व्यवस्था करणे आवश्यक असतानाही प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप होत आहे. परिणामी अभ्यासिका सुरू करणे, बंद करणे आणि देखरेखीची जबाबदारी थेट स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांवर आली आहे.

यापेक्षाही गंभीर बाब म्हणजे अभ्यासिकेच्या परिसरात मोठ्या प्रमाणात घाणीचे साम्राज्य निर्माण झाले आहे. वास्तूच्या मागील भागात डुकरांचा मुक्त वावर असून विद्यार्थ्यांना त्याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. परिसरातील अस्वच्छतेमुळे विद्यार्थ्यांना जेवणासाठी बसतानाही अडचणींचा सामना करावा लागत आहे. अभ्यासिकेच्या सौंदर्यीकरणासाठी गार्डनची व्यवस्था करण्यात आली होती. मात्र अनेक वर्षांपासून त्या परिसराकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचे चित्र दिसत आहे. आतमध्ये पीओपीचे छत तुटलेल्या अवस्थेत असून कबुतरांनी तेथे घरटी बांधली आहेत. त्यामुळे सतत होणारा त्रास विद्यार्थ्यांच्या अभ्यासात अडथळा ठरत आहे. डिजिटल युगात स्पर्धा परीक्षेच्या विद्यार्थ्यांसाठी वाय-फाय सुविधा अत्यावश्यक असताना अनेक महिन्यांपासून अभ्यासिकेतील इंटरनेट सेवा बंद आहे. ऑनलाइन क्लासेस, अभ्यास साहित्य व विविध शैक्षणिक उपक्रमांपासून विद्यार्थी वंचित राहत आहेत. तसेच २०२०-२१ मध्ये खरेदी करण्यात आलेल्या जुन्या पुस्तकांवरच विद्यार्थ्यांना अभ्यास करावा लागत असल्याने नव्या पुस्तकांसह अद्ययावत नोट्स उपलब्ध करून देण्याची मागणीही होत आहे. विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी निर्माण करण्यात आलेल्या या अभ्यासिकेचा मूळ उद्देशच हरवताना दिसत आहे. ग्रंथपाल, कर्मचारी आणि देखरेख करणाऱ्या यंत्रणेच्या निष्काळजीपणामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासावर परिणाम होत आहे.

विद्यार्थ्यांनी नाव जाहीर न करण्याच्या अटीवर जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी केली आहे की, या प्रश्नांची तातडीने दखल घेऊन कायमस्वरूपी दोन शिफ्टमध्ये दोन ग्रंथपालांची नियुक्ती करावी, वाय-फाय सेवा सुरू करावी, स्वच्छ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी आणि परिसरातील घाण व डुकरांचा त्रास कायमचा दूर करावा. यवतमाळ शहरातील प्रमुख अभ्यासिकेची झालेली ही दयनीय अवस्था विद्यार्थ्यांसाठी चिंतेचा विषय ठरत असून जिल्हाधिकारी विकास मीना यांनी संबंधितांना जाब विचारून अभ्यासिकेची स्थिती तातडीने सुधारावी, अशी अपेक्षा विद्यार्थ्यांकडून व्यक्त होत आहे.



# राजू तोडसाम यांची कृषी मंत्र्यां सोबत मंत्रालयात महत्त्वपूर्ण बैठक..

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**आर्णी, दि. २७ :** आर्णी-केळापूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार राजू तोडसाम यांनी महाराष्ट्राचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांची मंत्रालयात भेट घेऊन पेसा क्षेत्रातील कृषी सेवक व कृषी सहाय्यक पदभरती प्रक्रियेसंदर्भात महत्त्वपूर्ण चर्चा केली.

या बैठकीत पेसा क्षेत्रातील रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत आणि स्थानिक युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यावर विशेष भर देण्यात आला. बैठकीदरम्यान कृषी विभागाच्या सेवा अधिक सक्षम करण्यासह मानधन तत्त्वावर कार्यरत कृषी सेवकांच्या नियमिती करणाची प्रक्रिया गतीने पूर्ण करण्याबाबत सकारात्मक चर्चा झाल्याची माहिती देण्यात आली. तसेच पेसा क्षेत्रातील शेतकरी आणि युवकांना भेडसावणाऱ्या विविध समस्यांकडे आमदार तोडसाम यांनी कृषी मंत्र्यांचे लक्ष वेधले. यावेळी कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी संबंधित प्रश्नांवर सकारात्मक भूमिका घेत आवश्यक कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले. पेसा क्षेत्राचा विकास, शेतकऱ्यांच्या समस्या आणि स्थानिक युवकांच्या रोजगारासाठी आमदार राजू तोडसाम सातत्याने पाठपुरावा करत असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले. या बैठकीमुळे पेसा क्षेत्रातील रोजगार व कृषीविषयक प्रश्न सोडविण्यास गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

# घटना-घडामोडी

## अवैध सावकारीचा आठ वर्षांच्या लढ्यानंतर अडकिने दांपत्याला जमीन परत..!



**महागाव :** तालुक्यातील हिवरा संगम येथील अल्पभूधारक शेतकरी लक्ष्मीबाई आणि वसंत माधव अडकिने यांच्या आठ वर्षांच्या न्यायलढ्याला अखेर यश मिळाले असून अवैध सावकारीच्या माध्यमातून हडप करण्यात आलेली त्यांची एक हेक्टर जमीन परत करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय जिल्हा उपनिबंधकांनी दिला आहे. अडकिने दांपत्याने २४ जून २०१० रोजी शेती लागवडीसाठी महागाव येथील सावकार अनंत नागरगोजे यांच्याकडून कर्ज घेतले होते. कर्जाच्या बदल्यात अडीच एकर शेती गहाण ठेवण्यात आली होती. व्याजासह रक्कम परत मिळाल्यानंतर जमीन परत देण्याच्या अटीवर हा व्यवहार झाला होता. पुढील तीन वर्षांत अडकिने दांपत्याने कर्जाची संपूर्ण रक्कम व व्याज फेडले. मात्र, त्यानंतरही सावकाराने जमीन परत देण्यास टाळाटाळ केली.अखेर २०१८ मध्ये सावकारग्रस्त शेतकरी संघर्ष समितीच्या सहकार्याने अडकिने दांपत्याने सावकारी अधिनियम २०१४ अंतर्गत तक्रार दाखल केली. चौकशीनंतर जिल्हा उपनिबंधकांनी १५ मे २०२६ रोजी दिलेल्या निर्णयात संबंधित जमीन व्यवहार अवैध ठरवत मूळ मालकाला जमीन परत करण्याचे आदेश दिले. धमक्या, मानसिक त्रास आणि दीर्घ न्यायालयीन लढाईतही अडकिने दांपत्य खंबीर राहिले. "पोटाची भाकर असलेली काळी आई परत मिळाली," अशी भावना व्यक्त करत त्यांनी सावकारग्रस्त शेतकऱ्यांनी कायद्याचा आधार घेऊन न्यायासाठी पुढे यावे, असे आवाहन केले.

## बकरी ईद पूर्वी गोवंश तस्करांवर पोलिसांचा दणका..!

**कळंब मध्ये २८ जनावरे ताब्यात, अज्ञातां विरोधात गुन्हे दाखल**



**यवतमाळ :** आगामी बकरी ईद उत्सवाच्या पार्श्वभूमीवर गोवंश तस्करी व बेकायदेशीर कत्तल रोखण्यासाठी जिल्हा पोलिसांनी कारवाईची मोहीम तीव्र केली असून कळंब पोलिसांनी मोठी कारवाई करत २८ गोवंश जातीची जनावरे ताब्यात घेतली आहेत. चक्रावती नदीकाठावरील ईदगाह परिसर आणि बासुरीवाले बाबा दर्ग्याजवळ ही जनावरे उन्हात निर्दयपणे झुडपांना बांधून ठेवल्याचे आढळून आले. पोलीस स्टेशन कळंब ला मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी घटनास्थळी धाड टाकली. पाहणी दरम्यान कोणतीही चारा-पाण्याची व्यवस्था नसताना ११ जनावरे आणि दुसऱ्या ठिकाणी १७ जनावरे अशा एकूण २८ गोवंश जातीच्या जनावरांची सुटका करण्यात आली. या जनावरांची एकूण किंमत सुमारे १ लाख ५३ हजार रुपये असल्याचे सांगण्यात आले. या प्रकरणात अज्ञात व्यक्तींविरोधात महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम १९७६ तसेच प्राण्यांचा छळ प्रतिबंधक कायद्याअंतर्गत स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले असून तपास सुरू आहे. ताब्यात घेतलेली जनावरे गोसेवा संवर्धन ट्रस्ट, कळंब येथे सुरक्षित ठेवण्यात आली आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांच्या मार्गदर्शनाखाली कळंब पोलिसांच्या पथकाने यशस्वीरित्या पार पाडली.

# मुकुटबन पोलीस हद्दीत अवैध धंद्यांचा सुळसुळाट? नागरिकांकडून पोलिसांच्या भूमिकेवर गंभीर प्रश्नचिन्ह

## मटका, झेंडी-मुंडी, गुटखा, दारू, गांजा व तस्करीच्या वाढत्या प्रकारांमुळे कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**झरी जामणी, दि. २७** :तालुक्यातील मुकुटबन हे औद्योगिकदृष्ट्या महत्त्वाचे आणि तालुक्यातील मोठ्या गावांपैकी एक मानले जाते. परिसरात विविध राज्यांतील कामगार मोठ्या प्रमाणावर वास्तव्यास असल्याने गावात आर्थिक उलाढाल वाढली आहे. मात्र, याच पार्श्वभूमीवर मुकुटबन पोलीस स्टेशन हद्दीत विविध अवैध धंद्यांचे जाळे वाढल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे.

स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, मुकुटबन परिसरात मटका, झेंडी-मुंडी यांसारखे जुगार प्रकार खुलेआम सुरू असल्याचे बोलले जात आहे. काही ठिकाणी दररोज मोठ्या प्रमाणावर आर्थिक व्यवहार होत असल्याचा दावा केला जात असून, यामुळे परिसरात किरकोळ वाद, हाणामाऱ्या आणि तणावाचे प्रकार वाढल्याची चर्चा आहे. नागरिकांनी केलेल्या आरोपानुसार, काही अवैध व्यावसायिकांकडून गावात दहशतीचे वातावरण निर्माण होत असून, त्यांच्या वाढत्या प्रभावामुळे सामाजिक शांततेवर परिणाम होत आहे. यासंदर्भात स्थानिक पोलीस प्रशासनाच्या कार्यपद्धतीवरही प्रश्न उपस्थित करण्यात येत आहेत. काही ग्रामस्थांनी पोलीस यंत्रणेतील संबंधित अधिकाऱ्यांवर दुर्लक्ष केल्याचे आरोप केले आहेत.याशिवाय अडेगाव, गणेशपूर, कोसारा, डोंगरगाव, बोपापूर, सुरला, खडकडोह, निमणी, सोनेगाव, खातेरा आदी परिसरात अवैध दारू विक्री सुरू असल्याचा आरोपही नागरिकांकडून करण्यात आला आहे. तर मुकुटबन आणि घोंसा परिसरात मटका व झेंडी-मुंडीचे प्रमाण वाढल्याची चर्चा आहे. तसेच बंदी असलेल्या टीप वरील आरोप हे स्थानिक नागरिकांकडून करण्यात आलेले असून संबंधित प्रशासनाची अधिकृत भूमिका समोर येणे अपेक्षित आहे. सुगंधी गुटख्याची अवैध वाहतूक, जनावरांची तस्करी, रेती वाहतूक आणि गांजा तस्करीसारखे प्रकारही सुरू असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. गांजाच्या वाढत्या प्रभावामुळे युवक आणि अल्पवयीन मुलांमध्ये व्यसनाधीनतेची समस्या गंभीर बनत असल्याची चिंताही व्यक्त होत आहे. विशेष म्हणजे, चोरी आणि इतर गंभीर गुन्ह्यांच्या तपासा ऐवजी अवैध धंद्यांकडे अधिक लक्ष दिले जात असल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे. तसेच संबंधित यंत्रणा व पथकांकडून प्रभावी कारवाई होत नसल्याबाबतही नाराजी व्यक्त केली जात आहे. या सर्व पार्श्वभूमीवर अवैध धंद्यांची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, तसेच संबंधित अधिकाऱ्यांच्या भूमिकेची ही चौकशी व्हावी, अशी मागणी मुकुटबन ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

# ग्रामपंचायत निवडणुकांसाठी सदस्य आरक्षण सोडतीचा कार्यक्रम जाहीर

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. २७ :** राज्य निवडणूक आयोगाने राज्यातील बिगर व अंशतः अनुसूचित क्षेत्रातील सन २०२४, २०२५ मध्ये मुदत संपलेल्या तसेच सन २०२६ मध्ये मुदत संपणाऱ्या व नवनिर्मित ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी सदस्यांच्या आरक्षण सोडतीचा कार्यक्रम जाहीर केला आहे.

याबाबत राज्य निवडणूक आयोगाचे सचिव सुरेश काकाणी यांनी माहिती दिली. जाहीर कार्यक्रमानुसार ८ जून २०२६ पर्यंत आरक्षण सोडती साठी विशेष ग्रामसभेची सूचना देण्यात येणार आहे. त्यानंतर १२ जूनपर्यंत विशेष ग्रामसभा घेऊन तहसीलदारांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग, महिला आरक्षणा सह विविध प्रवर्गांची सोडत काढली जाणार आहे. तसेच १७ जूनपर्यंत प्रभाग निहाय आरक्षण प्रारूप अधिसूचनेस जिल्हाधिकाऱ्यांची मान्यता घेण्यात येईल. १९ जून रोजी प्रारूप प्रसिद्ध होणार असून त्यावर हरकती व सूचना दाखल करण्यासाठी १९ ते २५ जून हा कालावधी निश्चित करण्यात आला आहे. प्राप्त हरकतींवर विचार करून ३ जुलैपर्यंत उपविभागीय अधिकारी अभिप्राय सादर करतील. त्यानंतर ८ जुलैपर्यंत अंतिम अधिसूचनेस मान्यता दिली जाईल व १० जुलै रोजी अंतिम प्रभाग रचना जाहीर करण्यात येणार आहे. दरम्यान, राज्य निवडणूक आयोगाने बिगर व अंशतः अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायत निवडणुकांमध्ये सुधारित "ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणूक (आरक्षण निश्चिती व आरक्षण चक्रानुक्रमे फिरविणे) आदेश, २०२६" चे पालन करण्याचे निर्देश दिले आहेत.

# अतिक्रमण मोहिमेत गरीबांवरच कारवाई का?

## दुजाभाव थांबवा, हॉकर्स असोसिएशनची मागणी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी




**यवतमाळ, दि. २७ :** शहरातील रस्ते मोकळे करणे, वाहतुकीला शिस्त लावणे आणि शहराचा विकास साधणे यासाठी नगर परिषदेकडून सुरू असलेल्या अतिक्रमण हटाव मोहिमेला यवतमाळ हॉकर्स असोसिएशनने विरोध नसल्याचे स्पष्ट केले आहे. मात्र, ही मोहीम निवडक पद्धतीने आणि दुजाभावाने राबवली जात असल्याचा गंभीर आरोप असोसिएशनने केला आहे. असोसिएशनच्या मते, सध्या कारवाईचा फटका केवळ हातगाडी, ढकल गाडी आणि लहान व्यवसाय करणाऱ्या गरीब विक्रेत्यांना बसत आहे. रोजंदारीवर उदरनिर्वाह करणाऱ्या या व्यावसायिकांची दुकाने व साहित्य हटविले जात असून त्यांच्या रोजगारावरच गदा येत आहे. दुसरीकडे, मोठे व्यावसायिक, आर्थिकदृष्ट्या सक्षम घटक तसेच राजकीय पाठबळ असलेल्या अतिक्रमण धारकांवर मात्र कारवाई होत नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. "गरीबांसाठी एक कायदा आणि प्रभावशालीं साठी दुसरा कायदा का?" असा संतप्त सवाल यवतमाळ हॉकर्स असोसिएशनचे अध्यक्ष सुरज खोब्रागडे यांनी उपस्थित केला आहे. वाढत्या महागाईच्या काळात शासनाने रोजगार निर्मितीवर भर देण्याची गरज असताना, उलट गरीबांचा रोजगारच उद्ध्वस्त होत असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. हॉकर्स असोसिएशनने नगरपरिषदेला टाऊन व्हेंडिंग कमिटी स्थापन करून त्यामध्ये हॉकर्स प्रतिनिधींना सहभागी करून प्रश्न सोडवण्याची मागणी केली आहे. अन्यथा अतिक्रमण कारवाईच्या नावाखाली गरीबांवर अन्याय सुरू राहिल्यास यवतमाळ हॉकर्स असोसिएशन तीव्र आंदोलनाचा इशारा देत शांत बसणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

# आदर्श शिक्षिका रुपाताई मानकर यांच्या पुतळा अनावरणासाठी हरसुलमध्ये नेत्यांची मांदियाळी

## पुतळा अनावरणासाठी नामदार रामदास आठवले, नामदार संजय राठोड, खासदार संजय देशमुख हरसुलमध्ये येणार

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**दिग्रस, दि. २७ :** हरसुल येथील राज्य शासनाचा आदर्श शिक्षिका पुरस्कार प्राप्त माजी मुख्याध्यापिका रूपाताई नागसेन मानकर यांचं १६ मे रोजी वृद्धापकाळाने निधन झालं. त्या हरसुल येथील ऐतिहासिक आणि स्वातंत्र्यपूर्व काळात १८६९ मध्ये स्थापन झालेल्या जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेच्या माजी मुख्याध्यापिका होत्या.

उपेक्षित आणि वंचित वर्गातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मूळ प्रवाहात आणण्यासाठी त्यांनी आयुष्यभर कार्य केलं. त्यांच्या पुण्यानुमोदन कार्यक्रमाचे २८ मे रोजी हरसुल येथे आयोजन करण्यात आले आहे. हरसुल येथील नागसेनवन येथे हा कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमाला केंद्रीय सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण राज्यमंत्री रामदास आठवले यांची विशेष अतिथी म्हणून उपस्थिती असणार आहे. यासोबतच कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्राचे जलसंधारण मंत्री आणि यवतमाळचे पालकमंत्री संजय राठोड असणार आहेत. तर कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून यवतमाळ-वाशिमचे खासदार संजय देशमुख या कार्यक्रमाला प्रामुख्याने उपस्थित असणार आहे.

या कार्यक्रमांमध्ये रूपाताई मानकर यांच्या अर्धाकृती पुतळ्याचे लोकार्पण सर्व प्रमुख अतिथींच्या हस्ते होणार आहे. त्यांच्या पुण्यानुमोदनानिमित्त हरसुल येथील नागसेनवन येथे २८ मेला विविध कार्यक्रम होणार आहेत. परित्तदेसना संघदान, त्यानंतर रूपाताई मानकर यांना अभिवादन करण्यासाठी विविध मान्यवरांचे मनोगत, सहभोजन असे विविध कार्यक्रम होणार आहेत. रूपाताई मानकर यांच्या अर्धाकृती पुतळ्याचे अनावरण झाल्यानंतर प्रमुख अतिथींच्या हस्ते दिव्यांगांना विविध साहित्याचं वाटप करण्यात येणार आहे. दिवंगत रूपाताई मानकर या दिग्रस पंचायत समितीचे माजी सभापती आणि दिग्रस कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक मिलिंद मानकर आणि दिग्रस येथील रामदास आठवले मागासवर्गीय सहकारी सूतगिरणीचे अध्यक्ष आणि रिपाई, (आठवले) पक्षाचे जिल्हाध्यक्ष महेंद्र उर्फ सोना मानकर यांच्या आई होत्या.

या कार्यक्रमाला सर्वांना उपस्थित राहण्याचे आवाहन अशोक आणि वंदना मानकर, मिलिंद आणि ज्योत्स्ना मानकर, महेंद्र उर्फ सोना आणि उज्वला मानकर, अशोकराव आणि राखी पाटील, डॉ. प्रज्ञानंद मानकर, सुमेध गजानन मानकर आणि दीपाताई सुमेध मानकर यांच्यासह हरसुलच्या गावकऱ्यांनी केले आहे.

# बेकायदेशीर वृक्षतोड प्रकरणात उपोषणाला ५१ दिवस..!

## एफआयआरवर प्रशासनाची टाळाटाळ

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**पुसद, दि. २७ :** पुसद येथील उपजिल्हा रुग्णालय परिसरात झालेल्या कथित बेकायदेशीर वृक्षतोड प्रकरणाच्या निषेधार्थ सुरू असलेल्या बेमुदत उपोषणाला तब्बल ५१ दिवस पूर्ण झाले असून, अद्यापही प्रशासनाकडून ठोस कारवाई न झाल्याने संताप व्यक्त केला जात आहे.

वंचित बहुजन आघाडीच्या वतीने डॉ. अरुण राऊत, राजरत्न लोखंडे आणि जयानंद उबाळे हे कार्यकर्ते ६ एप्रिल २०२६ पासून सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यालयासमोर सकाळी १० ते सायंकाळी ६ या वेळेत उपोषण करत आहेत. उपोषणकर्त्यांनी बेकायदेशीर वृक्षतोडीची स्वतंत्र चौकशी, दोषींवर IPC कलम १६६, १६७, २१७, २१८, ४२५ व ४२६ अंतर्गत गुन्हे दाखल करणे, चुकीची माहिती देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई आणि ए.आर.टी. सेंटरच्या टिनशेड बांधकामाची चौकशी अशा विविध मागण्या केल्या आहेत. दरम्यान, उपजिल्हा रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षकांनी २ मे २०२६ रोजी शहर पोलीस ठाण्यास पत्र पाठविले होते. मात्र, त्यातील मजकूर स्पष्ट नसल्याचे नमूद करत ठाणेदारांनी अधिक तपशीलवार तक्रार मागविली. यापूर्वी १३ मे रोजीही पत्रव्यवहार करण्यात आला होता. त्यानंतर २७ मे रोजी पुन्हा स्मरणपत्र पाठवून तक्रार नोंदविण्याबाबत कळविण्यात आले. तरीही संबंधितांकडून प्रतिसाद न मिळाल्याने एफआयआर दाखल प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. उपोषणकर्त्यांनी काही अधिकारी व ठेकेदारांना वाचवण्यासाठी कागदपत्रांची हेराफेरी होत असल्याचा गंभीर आरोप केला आहे.

# अतिक्रमीत हटविलेल्या किरकोळ फळ,भाजी व इतर विक्रेत्यांना पर्यायी व्यवस्था त्वरित करावी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**महाविकास आघाडी पुसद**



**पुसद, दि. २७ :** नगरपरिषदेने पुसद येथील अतिक्रमन हटविण्यास सुरवात केली आहे ते स्वागतार्थ आहे मात्र त्यात पक्षपात पणा होता कामानये अतिक्रमण हटवीत असतांना फक्त रस्त्यारीलच अतिक्रमण हटविणे हे योग्य नाही पुसद मध्ये रस्त्याप्रमानेच बहुतांश ठिकाणी अतिक्रमण झालेले आहे त्यावरही प्रशासनाने वेळीच लक्ष देऊन त्वरित सरसगट अतिक्रमन काढण्यात यावे जेणे करून सुंदर पुसदची संकल्पना अमलात येईल.

पुसद बाजारपेठ हे मोठे बाजार पेठ आहे येथे अनेक गावातील शेतकरी आपापले शेतातील भाजीपाला, फळविक्री करिता येतात त्यांना आपला व्यवसाय करिता जागाच नाही तर ते अतिक्रमण करणार नाही तर काय करणार, रस्त्यावर किरकोळ व्यवसायिक आहे त्यांच्या कुटुंबावर आज उपासमारीची वेळ आलेली आहे या व्यवसायिका करिता प्रशासनाणे यावर त्वरित त्याच्या पुनर्वसन करिता पर्यायी जागा उपलब्ध करून देणे ही देखील प्रशासनाची जवाबदारी आहे त्यामुळे रस्त्यावरील अतिक्रमण धारकांना त्यांची पर्यायी जागा उपलब्ध करून त्वरित द्यावी अन्यथा आम्हला जन आंदोलन करावें लागेल त्यास प्रशासन जवाबदार राहील याची नोंद घ्यावी या आशयाचे निवेदन महाविकास आघाडीच्या वतीने उपविभागीय अधीकारी व मुख्याधिकारी नगरपरिषद, पुसद यांना देण्यात आले यावर नगरसेवक तथा गटनेते डॉ. अकील मेंमन, ॲड भारत जाधव, ॲड. वसीम अहेमद, गाझी खान, प्रकाश नेमायते, जब्बार लाखे, फिरोज खान, इर्शाद कुरेशी, सय्यद इस्तीयक, तहेसीन खान,कॉंग्रेस अध्यक्ष झिया शेख,विजय बाबर,प्रवीण कदम,ज्ञानदीप कांबळे,ॲड. पद्माकर विघ्ने,सुजित मानकामे, पाशा खान इत्यादी उपस्थित कार्यकर्ते यांच्या स्वाक्षऱ्या आहे.

# पेट्रोल पंपांची जिल्हाधिकाऱ्यांकडून पाहणी

## शेतकऱ्यांना प्राधान्याने डिझेल देण्याच्या सूचना

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. २७ :** जिल्हाधिकारी विकास मीना यांनी आज शहरातील विविध पेट्रोल पंपांची पाहणी करून इंधन पुरवठा व साठा व्यवस्थेचा आढावा घेतला. यामध्ये दर्डा नगर येथील जैस्वाल पेट्रोल पंप तसेच पांढरकवडा रोडवरील धनगंगा पेट्रोल पंप येथे भेट देऊन त्यांनी तपासणी केली. पाहणीदरम्यान जिल्हाधिकाऱ्यांनी पेट्रोल पंप कार्यालयातील नोंदवही, वर्षनिहाय इंधन पुरवठ्याची माहिती, संबंधित दस्तावेज तसेच सीसीटीव्ही यंत्रणेची तपासणी केली. इंधन वितरण प्रक्रियेत पारदर्शकता राखण्याबरोबरच नागरिकांना कोणतीही अडचण निर्माण होऊ नये, यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. यावेळी शेतकऱ्यांना प्राधान्याने डिझेल उपलब्ध करून द्यावे, पेट्रोल पंपांवर होणारी गर्दी टाळण्यासाठी योग्य नियोजन करावे, सीसीटीव्हीचा डेटा सुरक्षित ठेवावा तसेच इंधन साठ्याबाबतची माहिती दर्शनी भागात स्पष्टपणे प्रदर्शित करावी, अशा सूचना जिल्हाधिकारी विकास मीना यांनी पेट्रोल पंप चालकांना दिल्या. या पाहणीवेळी जिल्हा पुरवठा अधिकारी तसेच संबंधित पेट्रोल पंप चालक उपस्थित होते.




# सावधान! सावधान!! सावधान!!!

✍ भैय्यासाहेब उमेकर

ह्या भुतलावरील सर्वच नैसर्गिक वस्तूंचा (जल, वायु, फळें, भाजी, अन्नधान्य, इत्यादींचा) आपण पिढ्यान पिढ्या उपभोग घेतो आहोत. पुढे ही आपल्या भावी पिढ्या ते सर्व उपभोगणारच आहेत. हे आपण सर्व जाणुन आहात. परंतु आपल्या संकुचित तथा आळशी मीच कां हे करावे ह्या मनोवृत्तीमुळे, ह्या धरित्री मातेच्या उपकाराचा विसर पडल्याने, आपण आपल्या स्व केंद्रीत मनोवृत्तीत गुरफटून गेलो आहोत, हे विसरून चालणार नाही. त्या मुळे आपण आपल्याच भवितव्याचा गळा घोटत आहोत.तेंव्हा आपल्याच भविष्या वर घोंगावणा-या, गिळंकृत करु पाहणा-या संकटांपासून आपली सुटका होणें शक्य नाहीं! ह्या पासून आपण सावध होणे ही आता काळाची गरज झालेली आहे.

ह्या वर्षी आपण ४५° ते ४७° डिग्री पर्यंत चे तापमानाची दाहकता अनुभवत आहोत, पुढिल वर्षी हेच तापमान जर ५०° ते ५५° डिग्री पर्यंत अथवा त्या वर गेले तर काय होईल? ह्याची कल्पना ही करणे अशक्य झाले आहे. कारण ह्या वर्षी कुलर आणि वातानुकूलित यंत्रे सुध्दा ही दाहकता कमी करण्यात अपयशी ठरल्याचे अनुभवत आहोत. अशा अवस्थेत जर आपण 'हाताची घडी आणि तोंडावर बोट' ठेवून भविष्यातील तमाशा पाहणार आहोत की प्रत्यक्ष योगदान नोंदविण्यात अग्रेसर होणार आहोत.की पुन्हा तेच आमचे ग्रामीण भागात असे म्हणतात 'तुका म्हणे उगे रहा, जे जे होईल ते ते पाहा' मला काय त्याचे म्हणून फक्त बघ्याची भूमिका घेणार आहात. की कर्तव्य समजून सहभागी होऊन प्रत्येकी पाच सहा वृक्ष लागवड करून ह्या धरती मातेचे आणि समाजाचे ॠण फेडणार आहात.वृक्ष लागवड करताना शोभेची नव्हे तर देशी घनदाट वाढणारी देशी वृक्ष लागवड आवश्यक आहे. जे वृक्ष झाडें ही दाहकता कमी करुन त्या छायेत प्रत्येक प्राणीमात्रांना दिलासा उपभोगता येईल आणि पर्यावरणपूरक ठरतील असे वृक्ष झाडें आवर्जून लावल्या जातील ह्या वर प्रत्येकाने भर देणें आवश्यक आहे. उदा. आंबा, चिंच, वटवृक्ष (वड), पिंपळ, औदुंबर(उंबर), कडुनिंब, कवठ, बेल, आवळा इत्यादी अशी झाडे आपल्या अंगणात अथवा परिसरात अथवा शेतात, शेताच्या धु-यावर अथवा रस्त्यांचे कडेला लावली जाऊन त्याला जगविण्यासाठी ही सर्वोतोपरी सहभाग नोंदवावा लागेल. कारण हा पुर्णपणे आपल्या आणि आपल्या भावी पिढ्यांसाठी उपयुक्त ठरणारा अविरतपणे चालू राहणारा हा महत्वपूर्ण कार्यक्रम आहे, तो व्यक्तीशः तथा संस्था अथवा संघटनेच्या माध्यमातून सुध्दा राबविला जाऊ शकतो परंतु फक्त ध्येय प्राप्ती चे प्रखर इच्छा शक्ती ची आवश्यकता आहे! महत्वाचा मुद्दा म्हणून नोंद करु इच्छितो की वृक्षारोपण करतांना ते रोप कमीतकमी दोन अडीच फुटांचे वर असावे कारण दोनतीन वर्षात त्याचे रूपांतर वृक्षात होऊन त्याचा फायदा दिसून येऊ शकतो.

आज आपण पाहतो आहोत, अनेक कारणांमुळे राजरोसपणे अथवा गुपचूपपणे धुमधडाक्यात होणारी वृक्षतोड ही ह्या परिस्थितीला कारणीभूत ठरली आहे. हे आपण जाणून असताना सुद्धा आणि हे माझे काम नाही सरकारचे काम आहे, आणि आपण मुग गिळून सदर तमाशा पहात असतो. कारण भविष्यातील संभाव्य धोक्याची आपण स्वप्नात ही कल्पना करणार नाही कारण ते आपल्या मानसिकते पलिकडे आहे. 'मी आणि माझा परिवार' ह्या पलीकडे सृष्टी आहे, आपण ही त्या सृष्टीचे एक घटक असून उपभोगते आहोत, हे सर्व आपल्या करीता सुध्दा आवश्यक आहे. आपल्या सुखी जीवनासाठी हे अत्याआवश्यक आहे.हे आपण पुर्णतः विसरून गेलो आहोत. हेच आता आपल्या भावी जीवनासाठी आणि भावी पिढ्यांसाठी घातक सिद्ध होत आहे.हा निसर्गाचा दोष नसुन आपण ही त्या दोषात काही थोड्या प्रमाणात कां होईना दोंषी आहोत हे कदापिही विसरून चालणार नाही. कारण ह्या धरणीमातेचे ह्या समाजाचे आपण ही काही देणे लागतो हे आपण पुर्णतः विसरलो आहोत. आता वेळीच सावध होऊन, उपाययोजना करणे अत्यावश्यक आहे.हे तर सरकारचे काम आहे. आपण कां करावे ह्या भुमिकेला तिलांजली देऊन कंबर कसून सहभाग नोंदविणे आवश्यक झाले आहे. सरकार म्हणजे आपणच ना! आणि सरकारी यंत्रणा राबविण्यासाठी सज्ज यंत्रणेला आपण जवळुन ओळखुन आहात! हजारो झाडे लावतील, फोटोसेशन करून घेतील, परंतु त्यातील जगतील किती किंवा जगविली किती अथवा जगलीत किती ह्याचा आढावा कोण घेणार? हजारो झाडे लावतील परंतु जागविली किती? ह्याचा हिशोब आजतागायत कोणत्याही फोटोशसन करून स्वतः चाच उदोउदो करण्यात पटाईत यंत्रणेने दिला, असे ना माझे वाचण्यात आले ना ऐकिवात आले! कारण त्या यंत्रणेचे 'बांट के खाओं, इस दुनिया में' तथा 'तेरी भी चुप मेरी भी चुप' हेच ब्रिद वाक्य झाले आहे. तेंव्हा 'चोर चोर मौसेरे भाई' ह्या भुमिकेमुळे अशा वेळी ओरडणार कोण? त्यामुळे सुज्ञ नागरिकांनी सजगता बाळगून संघटना संस्था ह्यांचे माध्यमातून हे वृक्ष लागवडीचे कार्य तडिस नेऊन, आपल्या भवितव्याचा विचार करून आपला स्व स्वार्थ बाजूला ठेवून आपला सहभाग नोंदविणे अत्यावश्यक झाले आहे.सुज्ञ तथा सुजाण नागरिकांनी सजगता बाळगून फुल नाही फुलांची पाकळी समजून शक्य तितका जास्त सहभाग नोंदवून इतरांना मानवतेच्या दृष्टिकोनातून, भावनेतून सहभागी होण्यासाठी प्रवृत्त करणे अत्यावश्यक झाले आहे.शेवटाला नम्र आवाहन!! धोका ओळखा जागे व्हा! भावी जीवनासाठी साठी सजग व्हा!

इस बार ४५° से ४७° डिग्री पार

अगली बार ५०° से ५५° डिग्री पार

वनार्शी, अमरावती

# मान्सूनपूर्व काळातील 'नवतपा'

✍ शशिकांत म. तोटे

विद्यमान परिस्थितीत देशात 'नवतपा' सुरू आहे. नवतपा हा केवळ पारंपारिक समजूतीचा भाग नसून नैऋत्य मान्सूनपूर्व काळातील तीव्र उष्णतेचा महत्त्वाचा टप्पा मानला जातो. या काळात समुद्रात कमी दाबाचा पट्टा होण्यास सुरुवात होते. ज्यामुळे मान्सूनच्या आगमना साठी पोषक वातावरण निर्माण होण्यास मदत मिळते.नवतपाच्या काळात जितकी जास्त उष्णता तेवढा अधिक पाऊस; अशी लोकमान्यता विज्ञान मानत नसले तरी, नवतपाचे पर्व मान्सूनपूर्व प्रक्रियेतील महत्त्वाचा अध्याय म्हणून मान्य करतात.

पारंपारिक पंचांगानुसार, सूर्य जेव्हा रोहिणी नक्षत्रात प्रवेश करतो, त्या काळालाच नवतपा असे म्हटले जाते. जो २५ मे पासून सुरू झाला असून.२ जून पर्यंत नवतपाचा प्रभाव कायम राहणार आहे.'नव' म्हणजे (नऊ संख्या) आणि 'तपा' म्हणजे उष्णता. मार्च महिन्यापासून उन्हाळा गृहीत धरला जातो.जो जून महिन्यात येणाऱ्या मृग नक्षत्रापर्यंत.तर एप्रिल ते मे महिन्या दरम्यान जमीन काही आठवडे तीव्र सूर्यकिरणे शोषून घेत असते.त्यामुळे उष्मा अधिक वाढतो.परिणामी वातावरणातील आद्रतेचे प्रमाण कमी राहून उष्ण आणि कोरडे वारे वाहण्यास सुरुवात होते. त्यामुळे तापमानवाढ होऊन तीव्र उष्णतेच्या लाटा येण्यास सुरुवात होते. नवतपा ही नैसर्गिक गतीविधी आहे. ज्याचा सर्वाधिक परिणाम देशातील उत्तर आणि मध्य भागातील राज्यांवर प्रतिवर्षी आढळून येतो. सध्या या नवतपाचा ताप विदर्भातील सहा जिल्ह्यावर अधिक आढळून येत आहे. या काळात तापमान हे ४५°अंशाहून पुढे पोचले आहे. या काळात तीव्र उष्णतेच्या लाटांचा धोका अधिक असतो.परिणामी उष्माघाताचा ही धोका प्रामुख्याने आढळून येतो.

यंदा राज्यात मार्च महिन्यापासून वेळेपूर्वी अधिक ऊन तापायला सुरुवात झाली. राज्यातील २९ जिल्ह्यात तापमान विद्यमान परिस्थितीत चाळीशी पार आहे.

गेल्या काही दिवसांपासून विदर्भातील जिल्हे ४५ अंशांच्या पुढे आहे. यंदा अकोला शहराची नोंद सर्वात देशात सर्वात उष्ण शहरांमध्ये करण्यात आली होती. नवतपाला २५ मे पासून सुरुवात झाली असून, पहिल्याच दिवशी उत्तर प्रदेशातील बांधा आणि महाराष्ट्राच्या चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रह्मपुरी येथे ४७.६° तापमान नोंद करण्यात आली आहे. या कालावधीत अनेक राज्यांमध्ये शाळांना सुट्टी जाहीर करण्यात आलेली असते. दुपारी रस्त्यावर मृगजळासारखे चित्र बघायला मिळते. रस्ते ओसाड, बाजार निर्मनुष्य असतात, तर पशु प्राणी सुद्धा सावलीचा आधार घेण्याचा प्रयत्न करतात. यादरम्यान जलाशय मोठ्या झपाट्याने कोरडी पडतात. उष्णता विकाराचे प्रमाण अधिक असते. लहान बालके व वृद्धांकडे विशेष लक्ष केंद्रित करण्याचे वैद्यक सांगतात. नवतपा ही नैसर्गिक स्थिती आहे,जी केवळ उष्ण लहरीशी संबंधित नसून जलसंकट, जनजीवन, शेती,जलवायू आणि ग्रामीण जीवनाशी दाट संबंध दर्शवितात.म्हणून कृषी संस्कृतीशी निगडित लोकमान्यतेनुसार, असे मानतात की,'अधिक ऊन तापल्याने भरपूर पर्जन्यमानाची शक्यता असते'याशिवाय जमिनीतील कीटक, विषाणूचा नाश होतो.

परिणामी शेत पिकांच्या नुकसानीचा धोका कमी असतो.अशाप्रकारे नवतपाचे सामाजिक व भौगोलीक महत्त्व आहे.

दारव्हा,जि.यवतमाळ
मो-९१३०८३५४५८

# स्वातंत्र्यवीर वि.दा.सावरकर

✍ प्रियंका वाणी

आपले संपूर्ण जीवन केवळ देश, मातृभूमी आणि स्वातंत्र्यासाठी झोकून देणाऱ्या स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांची जयंती २८ मे रोजी आहे. सावरकरांच्या जयंतीनिमित्त अनेक ठिकाणी व्याख्यान आणि उपक्रम असतात. सावरकरांनी आपल्या साहित्यातून, लिखाणातून हिंदू धर्माबाबतचे त्यांचे विचार वेळोवेळी प्रतिपादित केले आहेत. स्वातंत्र्यावीर सावरकरांच्या जयंतीनिमित्त त्यांची थोडक्यात माहिती



स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचा जन्म २८ मे, इ.स. १८८३ मध्ये झाला. जन्मगाव भगूर(जिल्हा नाशिक ) होय. मृत्यू - २६ फेब्रुवारी, इ.स. १९६६ साली. हे थोर क्रांतिकारक,मराठी भाषेचे कवी व लेखक होते. हिंदुत्वाचे संघटक तसेच आग्रही, भाषाशुद्धी तसेच लिपीशुद्धीचे प्रणेते. प्रखर विज्ञानवादी संस्कृत प्रचुर साहित्यिक ,कवी ,नाटककार लेखक, जातीभेदाचे तीव्र विरोधक स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळातील महत्वाचे राजकारणी व हिंदुसंघटक. सावरकर लहानपणापासून बुद्धिमान होते,आपली कुल देवता भगवती हिच्यापुढे 'देशाच्या स्वातंत्र्यासाठी सशस्त्र क्रांतीचा केतू उभारून मारिता मारिता मरेतो झुंजेन' अशी शपथ त्यांनी घेतली. सावकार हे 'यमुनाबाई'यांच्याशी मार्च, इ.स. १९०१ मध्ये विवाहबद्ध झाले. लग्नानंतर इ.स. १९०२ साली फर्ग्युसन महाविद्यालयात प्रवेश घेतला व इ.स. १९०६ साली उच्च शिक्षणासाठी लंडनला गेले सावरकरांनी पागे आणि म्हसकर ह्या आपल्या साथीदारांच्या साहाय्याने एक गुप्त संघटना स्थापन केली त्याचे नाव 'मित्रमेळा' असे होते.

अंदमानात एक महिना नारळाच्या काथ्या कुटल्यावर सावरकरांना 'कोलू' ला म्हणजे तेलाच्या घाण्याला जुंपण्यात आले. सकाळी १० ते सायंकाळी ५ पर्यंत सतत घाणा फिरवीत राहायचं. अंग ठणके, चक्कर येई, अन जरा थांबले, तर वॉर्डरचा सोटा पाठीत हाणला जाई!का? तर तेलाच्या घाण्यात काम करीत असता इतके शारीरिक नि मानसिक श्रम होत असूनही, त्यांची किंचित भरपाई करणारी एक संधी तिथे सापडत असे. ती म्हणजे त्या घाण्यात काम करीत असलेल्या काही राजकीय बंद्यांशी काही क्षण तरी बोलण्या-बसण्याची संधी मिळे.

ज्या कार्याचा ध्यास लागल्याने, मनाने संसाराच्या सर्व सुखांवर लाथ मारली, त्या उदांत्त कार्याची त्यांच्याशी चर्चा करता आल्याने, मन पुन्हा चैतन्यमय होई! भोगलेल्या यातना काहीच नाहीत, अजून भोगायच्या आहेत; त्याही कर्तव्य होत, हा निर्धार पुन्हा सबळ होई. त्या कर्तव्या साठीच कोलूचा 'शाप' ही सावरकर एक 'वर'च समजत असत.

# ऊर्जा संकटःकारणे आणि शाश्वत भविष्याकडे वाटचाल

✍ प्रा.पी.आर.एस.राव

आज आपण २१ व्या शतकाच्या अशा टप्प्यावर उभे आहोत जिथे तंत्रज्ञान आणि प्रगती शिगेला पोहोचली आहे, परंतु या संपूर्ण विकासाचा कणा असलेली 'ऊर्जा' आज एका गंभीर संकटाच्या उंबरठ्यावर उभी आहे. ऊर्जा संकट म्हणजे केवळ विजेचा तुटवडा किंवा इंधनाचे वाढते दर नव्हे, तर ही एक अशी परिस्थिती आहे जिथे ऊर्जेची मागणी तिच्या पुरवठ्यापेक्षा कैक पटीने वाढली आहे. मानवी संस्कृतीचा इतिहास पाहिला तर अग्नीच्या शोधापासून ते आजच्या अणुऊर्जेपर्यंतचा प्रवास हा ऊर्जेच्या वापराशी जोडलेला आहे. मात्र, नैसर्गिक संसाधनांचा अमर्याद वापर आणि भविष्यातील नियोजनाचा अभाव यामुळे आज जगासमोर अंधाराचे सावट निर्माण झाले आहे. या संकटाचा सामना करण्यासाठी आपल्याला केवळ वैज्ञानिक दृष्टिकोनच नाही, तर वैयक्तिक स्तरावर जीवनशैलीत बदल करण्याचीही गरज आहे.

ऊर्जा संकटाच्या मुळाशी गेल्यास सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे आपली अश्मीभूत इंधनांवरील अतिनिर्भरता. कोळसा, खनिज तेल आणि नैसर्गिक वायू हे ऊर्जेचे पारंपारिक स्त्रोत मर्यादित आहेत. शास्त्रज्ञांच्या मते, ज्या वेगाने आपण या साठ्यांचा वापर करत आहोत, त्या वेगाने पुढच्या काही दशकांत हे साठे संपुष्टात येतील. वाढती लोकसंख्या हे दुसरे महत्त्वाचे कारण आहे. जगाची लोकसंख्या जशी वाढते आहे, तशीच ऊर्जेची भूकही वाढत आहे. शहरांचे होणारे विस्तारीकरण, औद्योगिकीकरण आणि बदलत्या जीवनशैलीमुळे प्रत्येक व्यक्तीचा ऊर्जेचा वापर वाढला आहे. आज फ्रिज, एसी, ओव्हन आणि इलेक्ट्रिक वाहने यांसारख्या साधनांमुळे विजेची गरज पूर्वीपेक्षा कित्येक पटीने वाढली आहे. याव्यतिरिक्त, जागतिक राजकारण आणि युद्धाचाही ऊर्जा पुरवठ्यावर मोठा परिणाम होतो. रशिया-युक्रेन संघर्ष किंवा मध्य पूर्वेतील तणावामुळे कच्च्या तेलाच्या किमतीत होणारी वाढ हे त्याचे उत्तम उदाहरण आहे. जेव्हा इंधनाचे दर वाढतात, तेव्हा त्याचा थेट परिणाम वाहतूक, अन्नधान्य आणि एकूणच अर्थव्यवस्थेवर होतो, ज्याला आपण महागाई म्हणतो.



हे ऊर्जा संकट केवळ जागतिक अर्थव्यवस्थेलाच धोक्यात आणत नाही, तर त्याचे आपल्या पर्यावरणावर विनाशकारी परिणाम होत आहेत. अश्मीभूत इंधनांच्या अमर्याद ज्वलनामुळे पृथ्वीच्या वातावरणात कार्बन डायऑक्साइड, सल्फर डायऑक्साइड आणि नायट्रोजन ऑक्साईड यांसारख्या हरितगृह वायूंचे प्रमाण प्रचंड वाढले आहे. हे वायू सूर्याच्या उष्मेला वातावरणात पकडून ठेवतात, ज्यामुळे 'हरितगृह परिणाम'तीव्र होतो. याचा थेट परिणाम म्हणून जागतिक तापमान वाढ होत आहे, ज्यामुळे ध्रुवीय प्रदेशातील हिमनद्या वितळत आहेत आणि समुद्राच्या पाण्याची पातळी धोकादायकपणे वाढत आहे. अनेक बेटांवरील देश आणि किनारी शहरे पाण्याखाली जाण्याच्या धोक्यात आहेत. तापमान वाढीमुळे हवामानाचे चक्र पूर्णपणे विस्कळीत झाले आहे; अतिवृष्टी, दुष्काळ, उष्णतेच्या लाटा आणि चक्रीवादळे यांसारख्या नैसर्गिक आपत्तींचे प्रमाण आणि तीव्रता वाढली आहे. ही विस्कळीत हवामान परिस्थिती शेतीवर परिणाम



करत असून अन्न सुरक्षेला मोठा धोका निर्माण करत आहे. कोळसा आधारित उर्जा निर्मितीमुळे होणाऱ्या हवेच्या प्रदूषणामुळे श्वसनाचे आजार आणि इतर गंभीर आरोग्य समस्या उद्भवत आहेत. जमिनीखालून अश्मीभूत इंधने बाहेर काढण्यासाठी केल्या जाणाऱ्या उत्खननामुळे परिसंस्थेचा नाश होत आहे आणि जैवविविधतेला गंभीर धोका निर्माण झाला आहे. तेल गळतीमुळे महासागरातील परिसंस्थेवर अपरिमित परिणाम होत असून सागरी जीवांचे मोठे नुकसान होत आहे.

केवळ साठे संपणे हेच संकट नाही, तर या ऊर्जेच्या निर्मितीततून होणारे पर्यावरणाचे हे नुकसान हे त्याहूनही मोठे संकट आहे. कोळसा आणि तेलाच्या ज्वलनातून बाहेर पडणारा कार्बन डायऑक्साइड हा हरितगृह परिणामास कारणीभूत ठरतो ज्यामुळे पृथ्वीचे तापमान वाढत आहे. जागतिक तापमान वाढ आणि हवामानातील बदल हे ऊर्जेच्या अयोग्य वापराचेच दुष्परिणाम आहेत. म्हणूनच, ऊर्जा संकटातून बाहेर पडण्यासाठी आपल्याला 'ऊर्जा सुरक्षा' आणि 'शाश्वत ऊर्जा' या दोन गोष्टींवर लक्ष केंद्रित करणे अनिवार्य आहे. या संकटावर मात करण्याचा सर्वात प्रभावी मार्ग म्हणजे अक्षय ऊर्जेचा स्वीकार. निसर्गाने आपल्याला सूर्यप्रकाश,वारा, पाणी आणि जैवभाराच्या स्वरूपात ऊर्जेचा अक्षय साठा दिला आहे. भारत हा उष्णकटिबंधीय देश असल्याने येथे सौर ऊर्जेची प्रचंड क्षमता आहे. सरकारने सुरू केलेली 'प्रधानमंत्री सूर्यघर योजना' या दिशेने टाकलेले एक महत्त्वाचे पाऊल आहे. जर प्रत्येक घराच्या छतावर सौर पॅनेल बसवले गेले, तर आपण केवळ वीज निर्मितीत स्वयंपूर्ण होणार नाही, तर पर्यावरणाचेही रक्षण करू शकू. सौर ऊर्जेसोबतच पवन ऊर्जा आणि जलविद्युत प्रकल्पांना गती देणे गरजेचे आहे.

ऊर्जा निर्मिती वाढवणे जितके महत्त्वाचे आहे, तितकेच 'ऊर्जा बचत' करणे हेही तितकेच प्रभावी आहे.युवा पिढीने जर ऊर्जा बचतीचा संकल्प केला, तर त्याचे दूरगामी परिणाम दिसून येतील.वाहतूक क्षेत्र हे इंधनाचा सर्वात मोठा ग्राहक आहे. या क्षेत्रातील ऊर्जा संकट टाळण्यासाठी इलेक्ट्रिक वाहनांचा वापर वाढवणे हा एक उत्तम पर्याय आहे. पेट्रोल आणि डिझेलवरील अवलंबित्व कमी केल्यामुळे विदेशी चलनाचा साठाही वाचतो आणि प्रदूषणही कमी होते. सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा वापर करणे, कारपूलिंग करणे किंवा जवळच्या अंतरासाठी सायकलचा वापर करणे या सवयी आपल्याला लावून घ्याव्या लागतील.

ऊर्जेच्या या अमर्याद वापराचा सर्वात मोठा फटका आपल्या पर्यावरणाला बसत आहे. अश्मीभूत इंधनांच्या ज्वलनामुळे उत्सर्जित होणारे वायू ओझोनचा थर कमकुवत करत आहेत आणि जागतिक तापमान वाढीला निमंत्रण देत आहेत. जर मानवी मानसिकतेत बदल झाला आणि प्रत्येकाने ऊर्जेचा वापर 'गरज' म्हणून न करता 'जबाबदारी' म्हणून केला, तरच आपण कार्बन उत्सर्जनाचे प्रमाण कमी करू शकू. ही जाणीव जेव्हा लोकचळवळ बनेल, तेव्हाच तंत्रज्ञानाचा खऱ्या अर्थाने फायदा होईल. शाश्वत विकासासाठी निसर्गाचे शोषण थांबवून त्याच्या संवर्धनासाठी वचनबद्ध होणे, हेच या ऊर्जा संकटातून बाहेर पडण्याचे खरे सूत्र आहे. भविष्यातील पिढ्यांना अंधारातून वाचवण्यासाठी आज आपल्याला आपल्या विचारसरणीत प्रकाश आणावा लागेल.

ऊर्जा संकट हे केवळ सरकार किंवा शास्त्रज्ञांचे मर्यादित संकट नसून ते संपूर्ण मानवजातीचे अस्तित्व टिकवण्यासाठीचे एक मोठे आव्हान आहे. या भीषण संकटातून बाहेर पडण्यासाठी आपल्याला केवळ पारंपारिक ऊर्जा स्त्रोतांवर अवलंबून राहून चालणार नाही.भारतासारख्या देशात सौर ऊर्जेची प्रचंड उपलब्धता असल्याने, ती आत्मनिर्भरतेच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल ठरू शकते. तांत्रिक उपायांसोबतच, वैयक्तिक स्तरावर 'ऊर्जा बचत' ही आपली सामाजिक संस्कृती आणि जीवनशैलीचा अविभाज्य भाग बनवणे आवश्यक आहे.

अमरावती.
मो. ९८२३४९६९१४

# एल निनो आणि ग्रामीण भाग बदलत्या हवामानासमोरील नवे आव्हान

✍ दिनेश गाडगे

गेल्या काही वर्षांत ग्रामीण भागातील शेतकरी पावसाच्या अनिश्चिततेचा अनुभव घेत आहेत. कधी अतिवृष्टी, तर कधी दीर्घ पावसाचा खंड बदलत्या हवामानामुळे शेतीचे गणित अधिकच अवघड होत आहे. वाढते तापमान, उष्णतेच्या लाटा आणि कमी होत चाललेले जलस्त्रोत यामुळे ग्रामीण जीवनावर मोठा परिणाम होताना दिसत आहे. अशा परिस्थितीत 'एल निनो' हा शब्द पुन्हा चर्चेत आला असून, तो आता केवळ वैज्ञानिक संकल्पना न राहता ग्रामीण भागासाठी गंभीर चिंतेचा विषय बनत आहे.

भारतासारख्या कृषिप्रधान देशात मान्सूनला अत्यंत महत्त्व आहे. शेतकऱ्यांच्या आशा, खरीप हंगामाची सुरुवात आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेची गती मोठ्या प्रमाणात पावसावर अवलंबून असते. त्यामुळे एल निनोमुळे कमी पावसाची शक्यता व्यक्त होताच ग्रामीण भागात चिंता वाढणे स्वाभाविक आहे. विशेषतः विदर्भ आणि अमरावतीसारख्या पावसावर आधारित शेती असलेल्या जिल्ह्यांसाठी हा विषय अधिक महत्त्वाचा ठरतो. 'एल निनो' ही प्रशांत महासागरातील समुद्राच्या पाण्याच्या तापमानाशी संबंधित नैसर्गिक हवामान प्रक्रिया आहे. समुद्राचे तापमान सरासरीपेक्षा वाढल्यावर जागतिक हवामानात बदल होतात आणि त्याचा परिणाम विविध देशांच्या पर्जन्यमानावर दिसून येतो. भारतात अनेकदा एल निनोच्या काळात पाऊस कमी होणे, पावसाचा असमतोल किंवा दुष्काळसदृश्य परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता वाढते.हवामान तज्ज्ञांनी २०२६ मध्येही एल निनो सक्रिय होण्याची शक्यता व्यक्त केली आहे. भारतीय हवामान विभागाने सरासरीपेक्षा कमी पावसाचे संकेत दिल्याने खरीप हंगामाबाबत चिंता व्यक्त होत आहे. पेरणी उशिरा होणे, पिकांवर ताण येणे आणि उत्पादन घटणे यासारख्या अडचणी निर्माण होऊ शकतात.



अमरावती जिल्ह्यातील बहुतांश शेती अजूनही पावसावर आधारित आहे. सोयाबीन, कापूस, तूर आणि हरभरा यांसारख्या पिकांचे उत्पादन चांगल्या पावसावर ठरते. पावसात खंड पडल्यास त्याचा थेट परिणाम शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर होतो. वाढत्या तापमानामुळे जमिनीतील ओलावा कमी होतो आणि पिकांच्या वाढीवर परिणाम होतो. अलीकडील काळात विदर्भात जाणवणाऱ्या उष्णतेच्या लाटा हीदेखील बदलत्या हवामानाची गंभीर चिन्हे मानली जात आहेत.

एल निनोचा परिणाम केवळ शेतीपुरता मर्यादित राहत नाही. ग्रामीण भागातील पिण्याचे पाणी, पशुधन, रोजगार आणि आरोग्य व्यवस्थेवरही त्याचा परिणाम होतो. विहिरी आणि बोअरवेलमधील पाणीपातळी कमी होण्याची शक्यता वाढते. जनावरांसाठी चाऱ्याची समस्या निर्माण होऊ शकते. शेतमजुरी कमी झाल्यास रोजगारावर परिणाम होतो आणि काही ठिकाणी स्थलांतराची वेळही येऊ शकते. त्यामुळे हवामान बदलाचा प्रश्न हा आता फक्त पर्यावरणाचा विषय न राहता ग्रामीण जीवनाशी थेट जोडलेला सामाजिक आणि आर्थिक प्रश्न बनला आहे.या संभाव्य परिस्थितीचा सामना करण्यासाठी स्थानिक स्तरावर प्रभावी नियोजन करणे अत्यावश्यक आहे. जलसंधारण, पाणी साठवण आणि मृदसंधारणाच्या कामांना गती देणे ही काळाची गरज आहे. शेततळी, नाला खोलीकरण, पावसाचे पाणी अडविणे आणि 'वॉटर बजेट' तयार करणे यामुळे भविष्यातील संकटाची तीव्रता कमी करता येऊ शकते.हवामान बदलाच्या या नव्या वास्तवात एल निनो हे ग्रामीण भागासाठी मोठे आव्हान बनत असले, तरी योग्य नियोजन, पाणी संवर्धन आणि लोकसहभागाच्या बळावर त्याचे दुष्परिणाम मोठ्या प्रमाणात कमी करता येऊ शकतात. निसर्गातील बदल थांबविणे कदाचित शक्य नसले, तरी त्या बदलांना सामोरे जाण्याची तयारी मात्र नक्कीच आपल्या हातात आहे. आजची सजगता आणि पूर्वतयारीच उद्याच्या सुरक्षित ग्रामीण भविष्यासाठी महत्त्वाची ठरणार आहे

जनसंपर्क अधिकारी,
जि.प.अमरावती
मो.९८५०३३६५९२

# ...थोडक्यात...

## सरपंच शरद नहाटे पुरस्काराने सन्मानित



**अकोला :** प्रगत शेती आणि वैज्ञानिक पीक पोषण पद्धतींमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शेतकऱ्यांचा गौरव करण्याच्या उद्देशाने अकोला, जिल्ह्यातील अकोट तालुक्यातील सरपंच शरद नहाटे यांना सोयाबीन लागवडीतील उत्कृष्ट कामगिरीबद्दल प्रतिष्ठेचा महाधन योद्धा पुरस्कार – २०२६' प्रदान करण्यात आला.खंडेलवाल भवन, गोरक्षण रोड, अकोला येथे आयोजित सत्कार समारंभात शेतकरी, ग्रामस्थ, कृषी क्षेत्रातील मान्यवर आणि कंपनीचे प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

## भारताची आर्थिक महासत्ता बनण्याच्या दिशेने वेगाने वाटचाल

**अकोला :** देशाचा स्वाभिमान जागा करून परिवर्तन घडवलं जाऊ शकते, हे पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांनी त्यांच्या १२ वर्षांच्या कार्यकाळात केलेल्या कार्याने दाखवून दिले आहे. फक्त अनुदान घेणे ही वृत्ती न बाळगता देशाला जगामध्ये स्वाभिमानाने उभा असलेला भारत देश बनवण्याचे काम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले आहे.देशाचे लाडके पंतप्रधान श्री नरेंद्र मोदीजी २६ मे २०२६ रोजी पंतप्रधान पदाच्या कारकिर्दीची १२ वर्षे पूर्ण करत आहेत. मोदीजींच्या यशस्वी, दूरदर्शी आणि परिवर्तनकारी राष्ट्रसेवेचे एक तप हे भारतासाठी आणि समस्त भारतीयांसाठी वरदान ठरले आहे. या ऐतिहासिक पर्वानिमित्त 'राष्ट्र निर्माणाची तपपूर्ती' या विशेष संग्राह्य अंकाचे प्रकाशन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते रविंद्र नाट्यमंदिर येथे करण्यात आले, या प्रसंगी ते बोलत होते.

**Change In Name**
I have change My name FROM
**JAINABBI DALLA CHAUDHARY**
-TO-
**ZAINAB BI SHAIKH IBRAHIM**
Address- Janta Marg,Mankarna Plot, Gawlipura,
Akola Dist. AKOLA-444001

**Change In Name**
I have Changed
My Name Form
**SAMINA ANJUM MOHD AASHIQUE**
-TO-
**SAMEENA ANJUM MOHAMMAD JAVED**
My residential Address in Attar gali, Mominpura, Akola 444001.

**Change In Name**
I have Changed
My Name Form
**JAWERIYA ALMAS MOHAMMAD JAVED KASAB**
-TO-
**JAWERIYA ALMAS MOHAMMAD JAVED**
My residential Address in Attar gali, Mominpura, Akola 444001.

**Change In Name**
I have Changed
My Name Form
**SHAZIYA NAZ MOHAMMAD FAZLUL HAQUE**
-TO-
**SHAZIYA NAAZ MOHAMMAD SABIR QURESHI**
My residential Address in Subhash road, Near Fish Market Kagzipura, Akola 444001.

**Change In Name**
I have Changed
My Name Form
**KHWAJA NASIM BANO MOHAMMAD YASIN**
-TO-
**KHWAJA BI MOHAMMAD SHAFI QUREESHI**
My residential Address in Subhash road, Near Fish Market Kagzipura, Akola 444001.

**Change In Name**
I have change my name form
**Old Name :- Mohammed Rafique Mohammed Anis**
New name is changed as per Adhar and Pan card
**Mohammad Anis Mohammad Rafik**
Address : Raushan Nagar old city Near Rahbar Function Hall Murtizapur Dist-AKOLA
Pin-444107 (M.S.)
Passport Number - E 8065080
File number-NG4077519338626

## तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी बार्शिटाकळी यांचे कार्यालय, बार्शिटाकळी

क्र. कक्ष प्रस्तु.-१/कावि/ २४/४/२०२६ दिनांक :- १५/०५/२०२६

**जाहीरनामा**

या जाहिरनाम्याव्दारे सर्वत्र लोकांना सुचीत करण्यात येते की, प्रस्तुत प्रकरण अर्जदार श्री रियाजोददीन सिराजोददीन रा.खडकपुरा बार्शिटाकळी ता. बार्शिटाकळी जि. अकोला यांनी मौजे वानखेडपुर बार्शिटाकळी भाग-२ येथील गट नं./स.नं. २४ क्षेत्रफळ १.१० हे. आर भो. वर्ग-१ असुन मालकीचे व नावे असलेले शेतीचे ७/१२ चे ईतर अधिकार सदरी असलेले म. हनीफ म. अजीज यांचा सन १९५८-५९ स.प. (१) अशी नोंद असुन सदरची नोंद कमी करुन देण्याकरिता प्रकरण प्राप्त झाले आहे. प्रकरणात अर्जदार यांनी हस्तलिखीत ७/१२ व खरेदी, फेरफार, हस्तलिखीत ७/१२ ईत्यादी अभिलेख सहपत्रीत केले आहे.

गट नं.२४ चे इतर अधिकार सदरामधुन म. हनीफ म. अजीज यांचा सन १९५८-५९ स.प.(१) अशी नोंद कमी करण्याबाबत कोणाचे काही आक्षेप किंवा हरकती असल्यास त्यांनी आपले लेखी आक्षेप / हरकती हा जाहिरनामा प्रसिध्दीच्या दिनांकापासुन १५ दिवसाचे आत या कार्यालयास प्रकरणात प्रत्यक्षरित्या सादर करावा. विहीत मुदतीनंतर प्राप्त झालेल्या हरकती किंवा आक्षेपाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

शिक्का

**अध्यक्ष, जमीन न्यायाधीकरण**
**तथा तहसिलदार बार्शिटाकळी**

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक १७२**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# लाडकी बहीण योजनेतील वंचित महिलांसाठी महिला काँग्रेसचे आंदोलन

## आमदार साजिद खान पठाण यांचा प्रशासनाला इशारा ; पात्र महिलांना तातडीने न्याय देण्याची मागणी

■ प्रतिनिधी | अकोला ■

*राज्य शासनाच्या 'लाडकी बहीण' योजनेतून कथितपणे वंचित राहिलेल्या पात्र महिलांना पुन्हा योजनेत समाविष्ट करण्याच्या मागणीसाठी महिला काँग्रेसतर्फे मंगळवारी जिल्हाधिकारी कार्यालयावर जोरदार आंदोलन करण्यात आले. अकोला पश्चिमचे आमदार साजिद खान पठाण यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन पार पडले.*



अकोला शहर महिला काँग्रेसच्या अध्यक्षा कशीश खान यांच्या आयोजनाखाली झालेल्या या आंदोलनात शेकडो महिलांनी सहभाग घेत प्रशासनाविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. 'लाडकी बहीण' योजनेतून अनेक पात्र महिलांची नावे चुकीच्या पद्धतीने वगळण्यात आल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला.

यावेळी आमदार साजिद खान पठाण यांनी जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन योजनेतील त्रुटी आणि प्रशासनाच्या कथित भोंगळ कारभाराबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली. संबंधित विभागाला आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्याची माहिती आंदोलनकर्त्यांनी दिली. प्रशासनातील काही कर्मचाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे अनेक पात्र महिलांना योजनेचा लाभ मिळत नसल्याचा आरोप महिला काँग्रेसने केला. त्यामुळे महिलांना आर्थिक नुकसानासोबत मानसिक त्रासही सहन करावा लागत असल्याचे आंदोलनकर्त्यांनी सांगितले.

'महिलांवर अन्याय सहन केला जाणार नाही. यापुढे महिलांना त्रास झाल्यास महिला काँग्रेस अधिक तीव्र आंदोलन छेडेल. गरज पडल्यास अकोला जिल्हा बंदचा इशाराही देण्यात येईल,' असा कडक इशारा आमदार पठाण यांनी प्रशासनाला दिला.

दरम्यान, कशीश खान यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना निवेदन पाठवून योजनेतील त्रुटींना जबाबदार असलेल्या कर्मचाऱ्यांची चौकशी करून त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्याची मागणी केली. तसेच सर्व पात्र वंचित महिलांची नावे तातडीने पुन्हा योजनेत समाविष्ट करण्याची मागणीही करण्यात आली. आंदोलनामुळे जिल्हाधिकारी कार्यालय परिसर काही काळ घोषणाबाजीने दणाणून गेला. आंदोलन शांततेत पार पडले असले तरी महिलांच्या मागण्यांमधील तीव्रता स्पष्टपणे जाणवत होती. या आंदोलनात ज्येष्ठ नेत्या डॉ. संजीवनी बिहाडे, जिल्हा काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष प्रकाश तायडे, महानगराध्यक्ष महेंद्र गवई, माजी नगरसेवक मो. इरफान, विजय जामनिक, मंजूर खान, रेखा डोंगरे, इंगळे, शहाना शेख, रंजना चवरे, कल्पना वासनिक, ज्योती डोंगरे, मंजू चवरे, सुचिता चवरे, अश्विनी चवरे, कुसूम चव्हाण, सीमा जपसरे, कल्पना सोनोने, जुबेदा बी यांच्यासह महिला काँग्रेसच्या कार्यकर्त्या आणि मोठ्या संख्येने लाभार्थी महिला उपस्थित होत्या.

## जिल्हाधिकारी कार्यालयात रस्ते सुरक्षा समितीची बैठक

■ प्रतिनिधी | अकोला ■

शहरात अपघात टाळण्यासाठी महत्वाच्या अपघात प्रवणस्थळी 'इंटलिजंट ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टम' (आयटीएमएस) बसविण्यासाठी जलद कार्यवाही करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी आज येथे दिले. जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हा रस्ते सुरक्षा समितीच्या बैठकीत त्या बोलत होत्या. पोलीस अधिक्षक अर्चित चांडक, उपजिल्हाधिकारी जोगेंद्र कट्यारे, सा. बां. विभागाचे कार्यकारी अभियंता प्रसाद पाटील, निमंत्रित सदस्य प्रदीप गुरूखुद्दे, मनपा उपायुक्त गीता वंजारी, मोटार वाहन निरीक्षक मनोज शेळके आदी उपस्थित होते. 'इंटलिजंट ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टम'मध्ये ॲटोमॅटिक नंबरप्लेट रेकग्निशन, ट्रॅफिक व्हायोलेशन डिटेक्शन, सीसीटीव्ही ॲनालिटिक्स, व्हेईकल ट्रॅकिंग आदी सुविधांचा समावेश आहे.

## बेलखेड शिवारात अस्वलाचा मुक्त संचार; ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण

### वनविभागाच्या पथकाने केले जेरबंद



■ प्रतिनिधी | तेल्हारा ■

तेल्हारा तालुक्यातील गोर्धा-बेलखेड परिसरात अस्वलाच्या मुक्त संचारामुळे ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. बेलखेड शिवारातील पाण्याच्या टाकीजवळ तसेच शेतमळ्यांमध्ये अस्वल फिरताना दिसल्याने शेतकरी व नागरिकांमध्ये दहशत पसरली आहे. या घटनेचे काही व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर वनविभागाचे पथक घटनास्थळी दाखल झाले.

मिळालेल्या माहितीनुसार, गेल्या काही दिवसांपासून बेलखेड ते हिवरखेड मार्गावरील शेत परिसर, वान धरण परिसर तसेच पाण्याच्या टाकीजवळ अस्वलाचा वावर दिसून येत होता. त्यामुळे अनेक शेतकरी व मजुरांनी शेतातील कामे अर्धवट सोडून घरी परतण्याचा निर्णय घेतला. रात्रीच्या वेळी नागरिकांनी घराबाहेर पडणेही टाळले असून महिलांमध्ये व लहान मुलांमध्ये विशेष भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

दरम्यान, काही नागरिकांनी अस्वलाचे व्हिडीओ मोबाईलमध्ये चित्रित करून सोशल मीडियावर प्रसारित केले. त्यानंतर वनविभागाला माहिती मिळाल्याचे सांगितले जात आहे. यामुळे 'घटना व्हायरल झाल्यानंतरच प्रशासन जागे होते का?' असा सवाल ग्रामस्थांकडून उपस्थित करण्यात येत आहे.

वनविभागाच्या पथकाने घटनास्थळी धाव घेत अखेर अस्वलाला जेरबंद केल्याची माहिती मिळाली आहे. मात्र, वन्यप्राणी गावाच्या हद्दीत इतक्या काळ मुक्तपणे कसा फिरत होता, तसेच वन्यजीव नियंत्रणाच्या उपाययोजना प्रभावीपणे राबवल्या जात आहेत का, याबाबत नागरिकांकडून प्रश्न उपस्थित होत आहेत. ग्रामस्थांनी प्रशासनाकडे परिसरात कायमस्वरूपी वनपथक तैनात करण्याची, रात्री गस्त वाढविण्याची तसेच शेतकऱ्यांना सुरक्षेसाठी आवश्यक साहित्य उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे. या घटनेमुळे ग्रामीण भागातील वन्यजीव व नागरिक सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

## मी विदर्भ नेता असलो तरी शिवसैनिकच - आमदार बच्चू कडू



### अमरावती विभागीय मेळाव्यात पक्षबांधणीचा निर्धार; लवकरच अकोला दौऱ्याची घोषणा

■ प्रतिनिधी | अकोला ■

'शिवसेना पक्षप्रमुख तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी माझ्यावर सोपविलेली विदर्भ नेत्याची जबाबदारी मी समर्थपणे पार पाडणार आहे. मी विदर्भाचा नेता असलो तरी सर्वप्रथम एक शिवसैनिक आहे,' असे प्रतिपादन आमदार बच्चू कडू यांनी केले. तसेच 'गाव तिथे शाखा, घर तेथे शिवसैनिक' ही मोहीम लवकरच राबविण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

अमरावती येथे मंगळवारी (दि. २६ मे) हॉटेल गौरी इन येथे आयोजित शिवसेनेच्या अमरावती विभागीय पदाधिकारी मेळाव्यात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बच्चू कडू होते. प्रमुख अतिथी म्हणून अमरावती शिवसेना संपर्कमंत्री आमदार किशोर अप्पा पाटील उपस्थित होते. यावेळी उपनेते ज्ञानेश्वर धने पाटील, माजी आमदार नारायणराव गव्हाणकर, श्याम देशमुख तसेच युवती सेना संपर्कप्रमुख व अन्य मान्यवर मंचावर उपस्थित होते.

मेळाव्यात अकोला जिल्ह्याच्या वतीने शिवसेना जिल्हाप्रमुख चंद्रशेखर पांडे गुरुजी, जिल्हा प्रभारी ललित वानखडे, जिल्हाप्रमुख अश्विन नवले, महानगरप्रमुख राजेश मिश्रा, महिला आघाडी प्रमुख तथा नगरसेविका उषाताई विरक, नगरसेविका सोनाली सरोदे, नगरसेवक मनोज पाटील, नगरसेवक सागर भारुका, कुलदीप वसु, मंगेश काळे यांच्यासह अनेक पदाधिकाऱ्यांनी बच्चू कडू यांचा सत्कार केला. यावेळी संतोष अनासने, डॉ. अशोक ओळंबे, प्रा. प्रकाश डावले, योगेश अग्रवाल, ज्ञानदेव परनाटे, प्रणव तायडे पाटील, माजी महानगरप्रमुख तरुण तसेच अनिल मालगे आदी उपस्थित होते. पक्षबांधणीसाठी सर्वांनी एकजुटीने काम करण्याचे आवाहन करत बच्चू कडू यांनी लवकरच अकोला जिल्हा दौरा करणार असल्याची घोषणा केली. कार्यक्रमाची माहिती अनिल मालगे यांनी दिली.

## अकोला पोलीस दलातील बदल्यांची प्रक्रिया पूर्ण

### २१३ प्रशासकीय तर १४९ विनंती बदल्या; डिजिटल मॉनिटरिंगमुळे पारदर्शकतेला बळ

■ प्रतिनिधी | अकोला ■

पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या मार्गदर्शनाखाली अकोला जिल्हा पोलीस दलातील पोलीस शिपाई ते सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक संवर्गातील अंमलदारांच्या सर्वसाधारण, प्रशासकीय तसेच विनंती बदल्यांची प्रक्रिया यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आली. संपूर्ण प्रक्रिया नियमबद्ध, पारदर्शक आणि डिजिटल पद्धतीने राबविण्यात आल्याने पोलीस दलातील प्रशासकीय संतुलन राखण्यास मदत होणार असल्याचे सांगण्यात आले.



प्रशासकीय बदली प्रक्रिया २० ते २१ मे २०२६ दरम्यान, तर विनंती बदली प्रक्रिया २६ ते २७ मे २०२६ दरम्यान पार पडली. या प्रक्रियेसाठी विशेष आस्थापना मंडळाची स्थापना करण्यात आली होती. मंडळात अपर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी, सहाय्यक पोलीस अधीक्षक निखिल पाटील, उपविभागीय पोलीस अधिकारी गजानन पडघन, एऽझ्ध वैशाली मुळे, प्र. सहाय्यक अधीक्षक इशानी आनंद, प्रभारी पोलीस अधीक्षक गृह उलेमाले, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शंकर शेळके, पोलीस निरीक्षक गजानन धंदर तसेच आस्थापना शाखेतील सचिन सांगळे यांचा समावेश होता.

विहित कालावधी पूर्ण झालेल्या २१३ अंमलदारांच्या प्रशासकीय बदल्या करण्यात आल्या. तसेच विनंती बदल्यांसाठी प्राप्त झालेल्या ३०५ अर्जांपैकी १४९ अंमलदारांच्या बदल्यांना मंजुरी देण्यात आली. बदल्यांच्या प्रक्रियेत कोणत्याही पोलीस ठाण्यावर मनुष्यबळाचा ताण निर्माण होऊ नये किंवा अतिरिक्त कर्मचारी संख्या वाढू नये, यासाठी 'लाईव्ह डेटा मॉनिटरिंग टूल'चा वापर करण्यात आला. प्रोजेक्टरवर एक्सेल आधारित डिजिटल माहितीच्या साहाय्याने प्रत्येक निर्णयाची शहानिशा करण्यात आली.बदली प्रक्रियेदरम्यान संबंधित कर्मचाऱ्यांकडून निर्धारित नमुन्यात अर्ज मागविण्यात आले होते. संबंधित प्रभारी अधिकाऱ्यांच्या अभिप्रायासह अर्जांची पडताळणी करण्यात आली. पती-पत्नी एकत्रीकरण, गंभीर आजार, सेवा कालावधी, प्रशासकीय गरज, स्वग्राम व तालुका मर्यादा यांसारख्या निकषांचा विचार करून प्रत्यक्ष मुलाखतीनंतर अंतिम निर्णय घेण्यात आला.

ही प्रक्रिया महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन अधिनियम-२००५, गृह विभागाचे शासन निर्णय तसेच महाराष्ट्र पोलीस सुधारणा अधिनियम-२०१५ मधील तरतुदींनुसार राबविण्यात आली. लवकरच संबंधित बदल्यांचे अधिकृत आदेश पोलीस अधीक्षकांच्या स्वाक्षरीने निर्गमित होणार असल्याची माहिती देण्यात आली.

अकोला जिल्हा पोलीस दलाने या प्रक्रियेस सहकार्य करणाऱ्या सर्व अधिकारी व अंमलदारांचे आभार मानले असून, या बदल्यांमुळे पोलीस दलातील कार्यक्षमता व प्रशासकीय समतोल अधिक मजबूत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

## आर्ट ऑफ लिव्हिंगच्या कार्यक्रमांना उत्स्फूर्त प्रतिसाद

**अकोला :** अकोला जिल्ह्याला 'आनंदी जिल्हा' बनविण्याच्या उद्देशाने कार्यरत असलेल्या आर्ट ऑफ लिव्हिंग शाखा अकोल्याच्या वतीने गुरुदेव श्री श्री रविशंकर यांच्या ७० व्या जयंतीनिमित्त तसेच आर्ट ऑफ लिव्हिंगच्या ४५ व्या वर्धापनदिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या सर्व कार्यक्रमांना गुरुदेव भक्त व नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या उत्सवांतर्गत गुरुदेवांचा जन्मदिन सोहळा तसेच 'आनंद उत्सव' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. गुरुदेवांचा जन्मदिन विविध संकल्प घेऊन साजरा करण्यात आला. अनेक साधकांनी गुरुदेवांच्या प्रतिमेसमोर ध्यानधारणा करून त्यांचे चिंतन व स्मरण केले.दरम्यान, स्थानिक माहेश्वरी भवन येथे भजन संध्या कार्यक्रम उत्साहात पार पडला.

## पीसीपीएनडीटी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करावी- जिल्हाधिकारी

### जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेत आरोग्य विभागाच्या विविध बैठका

**अकोला :** 'गर्भधारणापूर्व आणि प्रसूतीपूर्व निदान तंत्र (लिंग निवड प्रतिबंध) कायद्यानुसार कार्यवाहीसाठी सोनोग्राफी सेंटरच्या अचानक तपासण्या, धाडी यांची संख्या वाढवावी, तसेच 'ट्रॅकिंग सिस्टीम' राबवावी. त्याचप्रमाणे, कायद्याची व संबंधित उपक्रमांची प्रभावी जनजागृती करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी आज येथे दिले.



जिल्हा एड्स नियंत्रण समिती, तंबाखूविरोधी अभियान, 'गर्भधारणापूर्व आणि प्रसूतीपूर्व निदान तंत्र (लिंग निवड प्रतिबंध) कायद्यांतर्गत स्थापित समिती आदी विविध बैठका जिल्हाधिका-यांच्या अध्यक्षतेत झाल्या, त्यावेळी त्या बोलत होत्या. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बळीराम गाढवे, डॉ. आशा मिरगे, मोहन खडसे, डॉ. सीमा तायडे, प्रतिभा अवचार, डॉ. विनोद करंजीकर, समितीच्या विधी समुपदेशक ॲड. शुभांगी ठाकरे, डॉ. मनीष शर्मा, जिल्हा कार्यक्रम अधिकारी दर्शन जनईकर आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्रीमती मीना म्हणाल्या की, पीसीपीएनडीटी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी जिल्ह्यात करावी. बेकायदेशीर गर्भलिंग निदानाबाबत माहिती देणा-यास १ लक्ष रू. बक्षीस देण्याची तरतूद आहे. या तरतुदीबद्दल, तसेच कायद्याबद्दल प्रभावी जनजागृती करण्याचे निर्देश त्यांनी दिले. कोटपा कायद्यांतर्गत तंबाखूजन्य पदार्थ प्रतिबंधासाठी प्रत्येक शाळेत नोडल अधिकारी, तसेच कोटपा कायद्याच्या अंमलबजावणीचे अधिकार सर्व विभागप्रमुखांना देण्यात आले आहेत. जागतिक तंबाखूविरोधी दिनानिमित्त पोस्टर स्पर्धा, रील स्पर्धा असे उपक्रम आयोजिण्यात आले असल्याचे आरोग्य विभागातर्फे सांगण्यात आले.

एचआयव्ही प्रतिबंधासाठी जिल्ह्यात ६७ तपासणी व उपचार केंद्रे आहेत. कार्यक्रमांतर्गत ४ हजार ६०० रूग्णांना औषधोपचार दिला जात आहे. जिल्ह्यात एचआयव्हीबाधितांची संख्या घटल्याचे आकडेवारीवरून दिसते. २०१५-१६ मध्ये तपासण्यांत आढळलेले बाधित ४३० होते. २०२५-२६ मध्ये तपासण्यांत १७३ बाधित आढळले. गर्भवती महिलांमधील बाधितांचे प्रमाणही घटले आहे. त्यात २०१५ मध्ये २१ बाधित होते. २०२५-२६ मध्ये हे प्रमाण ३ इतके आहे, अशी माहिती श्री. जनईकर यांनी दिली.

एचआयव्ही नियंत्रण कार्यक्रमांतर्गत २१० शिबिरे घेण्यात आली व ११८ महाविद्यालयात रेड रिबन क्लब स्थापण्यात आले. सायक्लोथॉन उपक्रम घेण्यात आला. हा उपक्रम यावर्षीही घेण्याची सूचना जिल्हाधिका-यांनी केली. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील एआरटी (अँटी रिट्रोव्हायरल थेरपी) सेंटर राज्यात उत्कृष्ट ठरल्याबद्दल या केंद्रातील सहका-यांना जिल्हाधिका-यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले.

# हमदापुरात ऑनलाइन लॉटरीच्या आड जुगार अड्डा

## पोलिसांची धडक कारवाई

**सेलू/ जनमाध्यम**

तालुक्यातील हमदापुर येथे ऑनलाइन लॉटरी सेंटरच्या नावाखाली सुरू असलेल्या अवैध जुगार अड्ड्यावर दहेगाव (गोसावी) पोलिसांनी धाड टाकून मोठी कारवाई केली. या कारवाईत जुगारासाठी वापरण्यात येणारे संगणक साहित्य, रोख रक्कम तसेच देशी-विदेशी दारूचा साठा असा एकूण ९२ हजार १६० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी चार आरोपींविरुद्ध महाराष्ट्र जुगार कायदा व महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, २६ मे २०२५ रोजी दहेगाव (गोसावी) पोलिसांना हमदापुर बसस्टॉप परिसरातील शंकर ऑनलाइन लॉटरी सेंटर येथे जुगार व अवैध दारू व्यवसाय सुरू असल्याची गुप्त माहिती मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी तत्काळ छापा टाकला.छाप्यात आरोपी अर्सालन उर्फ सोनू अश्नुर शहा (रा. सिंदी रेल्वे) व शंकर गेंदलाल अमनेरकर (रा. हमदापुर) हे दोन स्वतंत्र संगणकांवर 'राजश्री' आणि 'गोल्डन चॉन्स' नावाचे ऑनलाइन जुगार खेळ चालविताना रंगेहात आढळले. दुकानाची झडती घेतली असता घटनास्थळी देशी व विदेशी दारूचा साठादेखील सापडला. कारवाईदरम्यान पोलिसांनी दोन डेल मॉनिटर, दोन एचपी सीपीयू,




प्रिंटर, स्कॅनर, की-बोर्ड, माउस, इंटरनेट डोंगल, प्लास्टिक स्टूल-खुर्च्या, कुलर तसेच रोख रक्कम जप्त केली. याशिवाय लावणी कंपनीच्या देशी दारूच्या सहा बाटल्या आणि रॉयल स्टॅग विदेशी दारूच्या सहा बाटल्याही जप्त करण्यात आल्या.या प्रकरणी आरोपी अर्सालन उर्फ सोनू शहा, शंकर अमनेरकर, मूळ मालक प्रफुल मेश्राम (रा. हिंगणघाट) तसेच जागा उपलब्ध करून देणारा विक्की नारायण विचोरे (रा. हमदापुर) यांच्याविरुद्ध अपराध क्रमांक १०४/२०२६ अन्वये महाराष्ट्र जुगार कायदा कलम १२ (अ), महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५ (ई), ७७ (अ), ८३ तसेच भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ४९ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सुरू आहे.ही कारवाई पोलीस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल, अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी प्रमोद मकेश्वर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक यशवंत कदम यांच्या नेतृत्वात करण्यात आली. या मोहिमेत पोलीस हवालदार आनंद भस्मे, ब्रम्हानंद मून, गजानन बाटे तसेच पोलीस अंमलदार अनिल चिलगर, रूरतम मुंगल आणि भारत सातपुते यांनी सहभाग घेतला.

# बसस्टॉप चौकातील 'मौत का खड्डा'; मांडगावकरांचा संताप अनावर

**मांडगाव/ जनमाध्यम**

गावाच्या मध्यवर्ती बसस्टॉप चौकात पडलेल्या भल्यामोठ्या खड्ड्याने नागरिकांच्या जीवाला अक्षरशः धोका निर्माण झाला असून बांधकाम विभागाच्या दुर्लक्षामुळे अपघातांची मालिका सुरूच असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. राष्ट्रीय महामार्गावरील हा खड्डा आता 'मौत का खड्डा' ठरत असल्याने वाहनचालकांत तीव्र संताप व्यक्त होत आहे. वर्धा-सेवाग्राम ते समुद्रपूर मार्गावरील या मुख्य चौकात मध्यभागी मोठा खड्डा पडला आहे. भरधाव वेगाने येणाऱ्या वाहनचालकांना हा खड्डा अचानक समोर येत असल्याने वाहनांचे नियंत्रण सुटत आहे. परिणामी अनेक दुचाकीस्वार या खड्ड्यात पडून किरकोळ जखमी झाले असून काहींना उपचारासाठी प्राथमिक आरोग्य केंद्रात, तर गंभीर जखमींना सेवाग्राम रुग्णालय येथे हलविण्यात आल्याची माहिती स्थानिकांनी दिली.विशेष म्हणजे, चौकाच्या दोन्ही बाजूंना दुकानदारी असल्याने अपघात होताच दुकानदार मदतीला धाव घेतात. मात्र रोजच्या या घटनांनी व्यापाऱ्यांसह ग्रामस्थही त्रस्त झाले आहेत. चौकात दुभाजक असल्याने वाहनचालकांना अचानक साईड



बदलावी लागते. त्यातच खड्डा चुकवताना वाहन थेट दुभाजकावर आदळण्याची भीती निर्माण होत आहे.या चौकात गतिरोधक नसल्याने वाहने भरधाव वेगाने धावत असतात. त्यामुळे येथे मोठा अपघात होण्याची दाट शक्यता नाकारता येत नाही. काही दिवसांपूर्वी रस्त्यावरील इतर खड्डे तात्पुरते बुजविण्यात आले, मात्र मुख्य चौकातील जीवघेणा खड्डा प्रशासनाच्या नजरेस पडत नसल्याने नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे.सफेद कपडे घालणारे पुढारी आणि बांधकाम विभागाचे अधिकारी नेमके कुठे आहेत? नागरिकांचा जीव गेल्यानंतरच प्रशासन जागे होणार का असा प्रश्न ग्रामस्थ उपस्थित करीत आहेत.दरम्यान, या चौकातील खड्डा तातडीने बुजवून गतिरोधक उभारावेत, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही ग्रामस्थांनी दिला आहे.

# संत भोजाजींच्या चरणी टेकले राज्य तंत्र शिक्षण संचालक

**आजनसरा/ जनमाध्यम**

श्री संत भोजाजी महाराज देवस्थान येथे भक्ती, सेवा आणि समर्पणाचा भावस्पर्शी सोहळा अनुभवायला मिळाला. महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण संचालनालयाचे संचालक डॉ. विनोद मोहितकर यांनी सहपरिवार संत भोजाजी महाराजांच्या पावन समाधीचे दर्शन घेत चरणी नतमस्तक होत आशीर्वाद घेतले.

देवस्थान परिसरातील सात्त्विक वातावरण, सेवाभावी कार्य आणि भाविकांसाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांनी डॉ. मोहितकर भारावून गेले. दर्शनानंतर त्यांनी देवस्थानतर्फे चालविण्यात येणाऱ्या अन्नछत्रातील प्रसादालयाला भेट दिली. हजारो भाविकांसाठी प्रेमाने तयार होणाऱ्या गरमागरम पुरणपोळीच्या महाप्रसादाची व्यवस्था, परिसरातील स्वच्छता आणि सेवाधाऱ्यांचा नम्र स्वभाव पाहून त्यांनी समाधान व्यक्त केले.



या प्रसंगी देवस्थानचे अध्यक्ष डॉ. विजय पर्बत, डॉ. धनंजय पर्बत, डॉ. संदीप लोंढे तसेच डॉ. ऋषिकेश जहागीरदार यांच्या हस्ते डॉ. मोहितकर यांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ आणि संतांची प्रतिमा देऊन सत्कार करण्यात आला.निस्वार्थ सेवा आणि भक्तीचा असा संगम दुर्मिळ आहे. संत भोजाजी महाराजांची कृपा आणि संस्थानची सेवायात्रा अशीच अखंड सुरू राहो, अशा शब्दांत त्यांनी संस्थानाला शुभेच्छा दिल्या. या भेटीमुळे देवस्थान परिसर भक्तीमय वातावरणाने भारून गेला होता.

# जुन्या बुटांतून पुन्हा धावली तरुणाई

## विदर्भाच्या इतिहासात प्रथमच रंगली सिनिअर सिटीजन फुटबॉल स्पर्धा; अमरावती संघ विजेता

**वर्धा/ जनमाध्यम**

खेळाला वयाची मर्यादा नसते, याचा प्रत्यय देणारी विदर्भातील पहिलीवहिली सिनिअर सिटीजन फुटबॉल स्पर्धा वर्धा शहरात मोठ्या उत्साहात पार पडली. स्व. प्रकाश अग्रवाल स्मृतीप्रित्यर्थ आयोजित करण्यात आलेल्या या रात्रकालीन फुटबॉल स्पर्धेने वर्धेच्या क्रीडाइतिहासात नवा अध्याय लिहिला. न्यू इंग्लिश फुटबॉल मैदानावर रंगलेल्या या तीन दिवसीय स्पर्धेत विदर्भातील सहा संघांनी सहभाग घेतला होता.

दारव्हा, अमरावती, अकोला, नागपूर, हिंगणघाट आणि वर्धा येथील ज्येष्ठ खेळाडूंनी मैदानावर उतरून आपल्या अनुभव, कौशल्य आणि जिद्दीचे अप्रतिम दर्शन घडविले. वयाच्या उत्तरार्धातही चपळ हालचाली, अचूक पासिंग आणि गोल



करण्याची जिद्द पाहून उपस्थित क्रीडाप्रेमींनी टाळ्यांचा कडकडाट करत खेळाडूंना दाद दिली. तिसऱ्या क्रमांकासाठी झालेल्या सामन्यात हिंगणघाट संघाने अकोला संघावर मात करत तृतीय स्थान पटकावले. विजेत्या संघाला दादाशाह (रॉयल ट्रॅव्हल्स) यांच्या वतीने ११ हजार रुपयांचे नगद पारितोषिक प्रदान करण्यात आले.रात्री ९ वाजता रंगलेल्या अंतिम सामन्यात अमरावती आणि वर्धा संघ आमनेसामने आले. अत्यंत चुरशीच्या या सामन्यात अमरावती संघाने शानदार खेळाचे प्रदर्शन करत ४ गोलांनी विजय मिळविला आणि स्पर्धेचे विजेतेपद पटकावले. विजेत्या अमरावती संघाला सिनिअर सिटीजन फुटबॉल खेळाडू संतोष यादव यांच्या तर्फे २१ हजार रुपयांचे नगद पारितोषिक देण्यात आले. उपविजेता ठरलेल्या वर्धा संघाला रामूभाऊ लष्कर (पूजा कन्स्ट्रक्शन) यांच्या तर्फे १५ हजार रुपयांचे पारितोषिक प्रदान करण्यात आले.स्पर्धेच्या अध्यक्षस्थानी आनंद कालोकर होते. प्रमुख पाहुणे म्हणून वर्धा नगर परिषदचे नगराध्यक्ष सुधीर पांगुळ उपस्थित होते. तसेच रामभाऊ लष्कर, बंटी गोस्वामी, किशोर पोपळी सर आदी मान्यवरांची उपस्थिती लाभली.

ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी रियाज खान आणि सईद भाईजान यांनी विशेष परिश्रम घेतले. वर्ध्यातील सिनिअर सिटीजन फुटबॉल व हॉकी खेळाडू तसेच क्रीडाप्रेमींच्या प्रेम आणि प्रोत्साहनामुळेच ही स्पर्धा यशस्वी झाली, अशा भावना रियाज खान यांनी व्यक्त करत सर्वांचे आभार मानले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आशिष बाभुळकर यांनी केले. तर किशोर खैरकर, मोहन उमाटे, संतोष यादव आदींनी स्पर्धेच्या आयोजनात मोलाचे योगदान दिले.

# अर्धवट पांदण रस्त्यांमुळे शेतकरी अडचणीत

## बेलोरा (खुर्द) व महादापूर येथील ग्रामस्थांची काम पूर्ण करण्याची मागणी

**तळेगाव (श्या. पं.)/ जनमाध्यम**

बेलोरा (खुर्द) व महादापूर येथील शेतशिवारातील पांदण रस्त्यांची कामे गेल्या दोन वर्षांपासून अर्धवट अवस्थेत असल्याने शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. पावसाळा तोंडावर आला असतानाही संबंधित कामे पूर्ण न झाल्याने ग्रामस्थांनी नाराजी व्यक्त केली आहे.

शेतकऱ्यांना शेतीमाल वाहतूक, मशागत, पेरणी तसेच दैनंदिन शेतीकामांसाठी या रस्त्यांचा उपयोग होतो. मात्र अनेक ठिकाणी रस्ते अपूर्ण असल्याने वाहनांची ये-जा कठीण झाली आहे.

काही भागात पायदळ चालणेही अवघड बनले असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले.

पावसाळ्यात या रस्त्यांवर चिखल साचत असल्याने शेतात जाणे आणि शेतीमाल बाहेर काढणे अधिकच कठीण होते. त्यामुळे शेतीच्या कामांवर परिणाम होत असल्याची तक्रार शेतकऱ्यांनी केली आहे. या पार्श्वभूमीवर बेलोरा (खुर्द) व महादापूर येथील शेतकऱ्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद वर्धा तसेच गटविकास अधिकारी, आष्टी यांना निवेदन देऊन पावसाळ्यापूर्वी अर्धवट पांदण रस्त्यांची कामे पूर्ण करण्याची मागणी केली आहे.या निवेदनावर दिनेश वानखडे, चंद्रकला वानखडे, राजेंद्र वानखडे, मुरलीधर व्यास, विठ्ठल चौधरी, महादेव आमझरे, पुरुषोत्तम फाटकर, कमला ढवळे, मोरेश्वर रानोटकर, सुभाष दाऊतपुरे, सचिन कोंडे, नितीन नांदुरकर आदी शेतकऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### शिल्पेश काळपांडे यांचे निधन

**वर्धा-** नेरी पुनर्वसन-सालोड येथील रहिवासी शिल्पेश प्रल्हाद काळपांडे (वय २८) यांचे अपघातात दुर्दैवी निधन झाले. त्यांच्या अकाली



जाण्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.शिल्पेश काळपांडे हे स्वभावाने मनमिळावू व कुटुंबवत्सल होते. त्यांच्या निधनाची वार्ता समजताच नातेवाईक, मित्रपरिवार व गावकऱ्यांनी दुःख व्यक्त केले.त्यांच्या पश्चात आई, वडील व लहान भाऊ असा परिवार आहे. त्यांच्या निधनामुळे काळपांडे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून परिसरात शोककळा पसरली आहे.

### अस्तित्व लपवून वावरणाऱ्यावर पोलिसांची कारवाई

**वर्धा-** शहरातील कोचर मैदान, गणेशनगर परिसरात संशयास्पदरीत्या वावरणाऱ्या एका युवकावर पोलिसांनी कारवाई केली. रात्रीच्या सुमारास गस्तीदरम्यान पोलिसांना एक युवक संशयास्पद हालचाली करताना दिसला. त्याची चौकशी केली असता त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली. नीरज विक्रमसिंग चौधरी रा. आनंदनगर असे ताब्यात घेतलेल्या युवकाचे नाव आहे. पोलिसांनी त्याच्याकडे ओळख आणि वास्तव्याबाबत विचारणा केली असता तो समाधानकारक माहिती देऊ शकला नाही. त्यामुळे त्याला ताब्यात घेण्यात आले. या कारवाईमुळे परिसरातील नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. याप्रकरणी वर्धा शहर पोलिसांनी संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल केला असून पुढील चौकशी सुरू आहे. शहरात संशयित व्यक्तींवर पोलिसांकडून विशेष लक्ष ठेवण्यात येत असल्याची माहिती पोलिस सूत्रांनी दिली.

# रस्ता नाही... जीव धोक्यात घालून शेती

## गांगापूर-खापरी पांदण रस्त्याची दुरवस्था; शेतकऱ्यांचा प्रशासनावर संताप

**वडनेर/ जनमाध्यम**

हिंगणघाट तालुक्यातील गांगापूर ते खापरी दरम्यानच्या पांदण रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था झाल्याने शेतकरी आणि शेतमजुरांना मोठ्या हालअपेष्टा सहन कराव्या लागत आहेत. पावसाळ्यात या रस्त्यावरून जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत असल्याने प्रशासनाने तातडीने लक्ष देण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

गांगापूर गावाजवळ गजानन हाते यांच्या शेतालगत तलाव असल्याने पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात पाणी साचते. त्या ठिकाणी नाल्यावर उड्डाण पूल अथवा पर्यायी व्यवस्था नसल्याने शेतकऱ्यांना वाहत्या पाण्यातूनच



शेतात जावे लागते. बैलबंडी, ट्रॅक्टर तसेच शेतीसाठी लागणारी वाहने नेणे अत्यंत धोकादायक बनले आहे.हा रस्ता गांगापूर, खापरी आणि बामर्डा या तीन गावांसाठी महत्त्वाचा असून नागोबा मंदिराकडे जाण्यासाठीही याच मार्गाचा वापर केला जातो. दरवर्षी येथे भाविक मोठ्या संख्येने येत असतात. मात्र रस्त्यावर चिखल, खोल खड्डे आणि मोठ्या भेगा पडल्याने भाविकांनाही त्रास सहन करावा लागत आहे.शेतकऱ्यांच्या मते, रस्त्यावर चार-चार फुटांचे खड्डे पडले असून अनेक वेळा बैलबंडी पलटी झाल्याच्या घटना घडल्या आहेत. काही बैल जखमीही झाले आहेत. पावसाळ्यात रस्त्यावर गाळ साचत असल्याने वाहने फसतात. रस्त्याच्या बाजूला नाली नसल्याने पाणी थेट रस्त्यावर साचते आणि परिस्थिती आणखी बिकट बनते.एकदा माझी बैलबंडी पलटी झाली होती. जीव वाचला, पण प्रशासनाकडून कुणीही पाहणीसाठी आले नाही, अशी खंत शेतकरी अंबादास हाते यांनी व्यक्त केली. रस्त्याचे काम तातडीने न झाल्यास उपोषण करू, असा इशाराही त्यांनी दिला.खापरी, गांगापूर आणि बामर्डा परिसरातील शेतकऱ्यांना अद्याप पांदण रस्ता योजनेचा लाभ मिळालेला नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. प्रशासनाने तातडीने रस्त्याची दुरुस्ती करून शेतकऱ्यांची समस्या दूर करावी, अशी मागणी रंजित हाते, रवी कवडे, बुद्धभूषण जारोंडे, भैय्याजी मुन, गजू साटोणे, किशोर राऊत, गजू हाते यांच्यासह ग्रामस्थांनी केली आहे.

# राजकारणाचा 'दादा'

## वर्धेमधील राजकारणातील एक काळीज हेलावून टाकणारे वास्तव...

**व**र्धा जिल्ह्यातील राजकारणात एकेकाळी एका कुटुंबाचा मोठा दबदबा होता. गावोगावी सभा, चौकाचौकात झेंडे आणि कार्यकर्त्यांच्या घोषणांनी तो परिवार काँग्रेसचा चेहरा बनला होता. त्या घरातली 'ताई' म्हणजे कार्यकर्त्यांसाठी आधारवड. लोकसभेपासून जिल्हा परिषदपर्यंत तिचा शब्द अंतिम मानला जायचा. कार्यकर्त्यांच्या सुख-दुःखात धावून जाणारी ही ताई अनेकांसाठी नेता नव्हे तर कुटुंबातील व्यक्ती होती.

पण राजकारणात रक्ताची नाती किती दिवस टिकतात, हा प्रश्न त्या वेळी कुणालाही पडला नव्हता. ताईने एक दिवस आपल्या नात्यातील एका तरुणाला जिल्ह्यात आणलं. बाहेरच्या शहरातून आलेला तो तरुण हुशार होता, बोलका होता आणि चेहऱ्यावर कायम निरागसपणाचा मुखवटा ठेवायचा. ताईने त्याला पक्षात संधी दिली. कार्यकर्त्यांशी ओळखी करून दिल्या. बैठकीत पुढे बसवलं. हा आपला माणूस आहे, असं सांगत त्याच्यावर विश्वास ठेवला.त्या तरुणाची आते बहीणही त्याच्यावर जीवापाड प्रेम करायची. निवडणुकीत दादासाठी रात्रंदिवस प्रचार केला. गावोगावी फिरली. विरोधकांच्या टीकेसमोर दादाची ढाल बनून उभी राहिली. माझा दादा एक दिवस मोठा नेता होईल, असं ती अभिमानाने सांगायची.पण राजकारणाच्या खेळात चेहऱ्यावरचं हसू आणि मनातली तलवार दोन्ही वेगळी असतात.

काळ गेलाष्ठ आणि तो दादा जिल्ह्यात मजबूत होत गेला. कार्यकर्त्यांवर पकड बसवू लागला. ताईच्या जवळच्या लोकांना दूर करू लागला. बैठकीत स्वतःचे लोक बसवू लागला. आणि एक दिवस असा आला की, ज्यांनी त्याला हात धरून चालायला शिकवलं, त्यांनाच तो राजकीयदृष्ट्या अडथळा समजू लागला.लोकसभा निवडणूक आली.ताईला उमेदवारी मिळाली. घरात आनंदाचं वातावरण होतं. पण पडद्यामागे वेगळाच खेळ सुरू होता. सभांमध्ये टाळ्या वाजवणारे काही चेहरे रात्री विरोधकांच्या गाठीभेटी घेत होते. प्रचारात पुढे दिसणारेच आतून काटे पेरत होते. आणि या सगळ्याचं सूत्र हलवत होता तोच 'दादा' बहिणीला काहीच समजलं नाही. ती शेवटपर्यंत दादावर विश्वास ठेवत राहिली. पण निकालाच्या दिवशी मतमोजणी केंद्राबाहेर तिचे डोळे पाणावले. पराभव झाला होता. विरोधकांनी नाहीष्ठ तर घरातील राजकारणाने तिला हरवलं होतं.काही वर्षांनी पुन्हा तीच वेळ आली. पुन्हा उमेदवारीष्ठ पुन्हा आश्वासनेष्ठ पुन्हा दादाचं गोड बोलणं आणि पुन्हा पराभव,त्या रात्री वर्ध्यातील एका जुन्या काँग्रेस कार्यकर्त्याने हळूच म्हटलं राजकारणात विरोधकांनी हरवलं तर दुःख कमी होतंष्ठ पण आपल्याच माणसांनी पाय खेचले की माणूस आतून संपतो.आजही वर्ध्यातल्या राजकीय गल्लीबोळात ही कथा कुजबुजली जाते. लोक म्हणतात,बाहेरून आला जिल्ह्यावर भारी झाला पण नात्यांच्या राखेवर उभं राहिलेलं राजकारण किती दिवस टिकणार?कारण शेवटी सत्ता मिळवता येते पण विश्वास हरवला की माणूस जिंकूनही हरतो.

**रवींद्र लाखे,** वर्धा
९८८१५९०२३१

# पूरसंरक्षक भिंतींच्या नावाखाली निविदांचा महाघोटाळा

## एकाच कंत्राटदारांचे वेगवेगळे मुखवटे; वर्धा येथे 'टेंडर मॅनेज'चा काळाबाजार

**वर्धा/ जनमाध्यम**

वर्धा जिल्ह्यात पूरसंरक्षक भिंतींच्या कामांच्या नावाखाली मोठा निविदा घोटाळा रचला जात असल्याचा गंभीर आरोप पुढे आला असून जिल्ह्यातील सार्वजनिक बांधकाम व्यवस्थेवरच प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. आपत्ती व्यवस्थापन विभागाकडून मंजूर झालेल्या तब्बल २८ पूरसंरक्षक भिंतींच्या कामांमध्ये निविदा प्रक्रियाच 'फिक्स' करण्यात आल्याचा संशय खा.अमर काळे यांनी व्यक्त करत प्रशासनाच्या कारभारावर जोरदार हल्लाबोल केला आहे.

कामे वेगवेगळ्या कंपन्यांच्या नावानेष्ठ पण कंत्राटदार मात्र तोच असा धक्कादायक प्रकार समोर आल्याचा दावा खासदार काळे यांनी केला. जलसंपदा विभागाच्या विविध विभागांमार्फत कामे वाटण्यात आली असली तरी निविदा प्रक्रियेत काही ठराविक कंत्राटदारांनाच लाभ मिळावा, यासाठी संपूर्ण यंत्रणा राबविण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला आहे.निविदेतच सावळा गोंधळ असेल तर कामांचा दर्जा काय असणार असा प्रश्न करत खासदार काळे यांनी अंदाजपत्रक, निविदा मंजुरी, गुणवत्ता तपासणी आणि कामांची अंमलबजावणी या सर्व प्रक्रियेची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी प्रधान सचिवांकडे केली आहे. तसेच या गैरव्यवहारात सहभागी अधिकारी, अभियंते आणि कंत्राटदारांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणीही त्यांनी केली.वर्धा जिल्ह्यात निविदा 'मॅनेज' करण्याचा प्रकार आता उघड गुपित बनला असून कंत्राटदारांना फायदा करून देण्यासाठी अंदाजपत्रकात अवास्तव बाबींचा समावेश केला जात असल्याची चर्चा



सर्वसामान्यांमध्ये सुरू आहे. परिणामी निकृष्ट दर्जाची कामे होत असून काही महिन्यांतच रस्त्यांना भेगा पडणे, बांधकामे कोसळणे आणि अपघात वाढणे असे प्रकार वारंवार घडत असल्याचा आरोप खासदारांनी केला.

वर्धा शहर परिसरातील सिमेंट रस्त्यांवर पडलेल्या भेगा आणि त्यामुळे होत असलेले अपघात हे भ्रष्ट कारभाराचे जिवंत उदाहरण असल्याचेही त्यांनी ठणकावून सांगितले. जनतेच्या कराच्या पैशावर डल्ला मारून निकृष्ट कामे करणाऱ्यांना माफी नाही, असा इशाराही त्यांनी दिला.दरम्यान, या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी झाल्यास मोठे मासे गळाला लागतील, अशी चर्चा आता जिल्हाभर रंगू लागली आहे. वर्ध्यातील निविदा प्रक्रियेभोवतीचे संशयाचे ढग अधिक गडद होत असताना प्रशासन आता कोणती भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक १८०
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३

मुख्य कार्यालय– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# मुख्यमंत्री सहाय्यता निधी जिल्हा कक्षामुळे वाचले चिमुकलीचे प्राण

## -नवजात बाळावर जन्मजात हृदयविकार असल्याचे निदान

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती येथील आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबातील अवघ्या तीन दिवसांच्या नवजात बाळावर जन्मजात हृदयविकार असल्याचे निदान झाले. बाळाच्या हृदयामध्ये छिद्र असल्याचे आढळल्याने गंभीरता लक्षात घेता तातडीच्या उपचारांची आवश्यकता निर्माण झाली होती. मुख्यमंत्री सहायता निधी जिल्हा कक्ष, अमरावती आणि नागपूर यांच्या तत्पर समन्वयामुळे बाळाला वेळेत वैद्यकीय मदत उपलब्ध झाली असून उपचारासाठी मोफत व्यवस्था करण्यात आल्याने कुटुंबाला मोठा दिलासा मिळाला आहे.

अचलपूर येथील मूळ रहिवासी असलेले हे कुटुंब मागील काही वर्षांपासून उदरनिर्वाहासाठी अमरावती येथे वास्तव्यास आहे. कुटुंबातील कर्ते पुरुष भाड्याने घेतलेली ऑटो रिक्षा चालवून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. तीन दिवसांपूर्वी त्यांच्या घरी मुलीचा जन्म झाला. मात्र जन्मानंतर लगेचच नवजात बाळाला हृदयाशी संबंधित गंभीर आजाराचे निदान डॉक्टरांनी केले. प्रकृती चिंताजनक असल्याने पुढील उपचारासाठी बाळाला अमरावतीहून नागपूर येथील नेल्सन हॉस्पिटलमध्ये रेफर करण्यात आले.

त्यावेळी नवजात बाळ ऑक्सिजन सपोर्टवर होते. मात्र, आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची असल्याने ऑक्सिजनयुक्त रुग्णवाहिकेचा खर्च परवडत नसल्यामुळे पालकांनी असमर्थता दर्शवली. त्याचवेळी रुग्णालयाकडून शस्त्रक्रिया तीन महिन्यांनंतरच होऊ शकणार असल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे कुटुंबासमोर मोठे संकट निर्माण झाले



होते.

या परिस्थितीत मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष, अमरावतीचे डॉ. श्याम गावंडे यांनी मुख्यमंत्री सहायता निधी, विदर्भ व नागपूर विभागाचे सदस्य सचिव तथा प्रभारी अधिकारी डॉ. सागर पांडे यांच्याशी संपर्क साधून मदतीची विनंती केली.परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेत डॉ. सागर पांडे यांनी तात्काळ रुग्णालय प्रशासनाशी समन्वय साधत नवजात बाळाला रात्रभर उपचारासाठी दाखल ठेवण्याची व्यवस्था केली. तसेच पुढील उपचारासाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर येथे ऑक्सिजनयुक्त रुग्णवाहिकेद्वारे सुरक्षितपणे हलविण्याची व्यवस्था करण्यात आली. विशेष म्हणजे उपचार, दाखल प्रक्रिया तसेच रुग्णवाहिकेचा संपूर्ण खर्च मोफत करण्यात आला.

यासोबतच तीन महिन्यांनंतर आवश्यक असणारी शस्त्रक्रिया व पुढील उपचार मुख्यमंत्री सहायता निधी अंतर्गत उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहितीही डॉ. पांडे यांनी दिली आहे. मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाच्या तातडीच्या समन्वयामुळे नवजात बाळाला वेळेत उपचार मिळाल्याने कुटुंबाला मोठा दिलासा मिळाला असून या कार्याबद्दल डॉ. सागर पांडे यांनी मुख्यमंत्री महोदयांची प्रेरणा डोळ्यांपुढे ठेवूनच गरजू रुग्णांना मदत करण्याचा प्रयत्न केला जात आहे, अशी भावना व्यक्त केली.

दरम्यान, मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांनी जिल्हा कक्षाच्या वतीने करण्यात आलेल्या कार्याचे कौतुक केले असून गरजू नागरिकांनी मदतीसाठी मुख्यमंत्री सहायता निधीच्या १८०० १२३ २२११ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन केले आहे.

# घरासमोर उभी असलेली कार पेटवली

## सीसीटीव्हीत थरार कैद, सुदर्शन नगरमधील धक्कादायक प्रकार

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील फ्रेजरपुरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सुदर्शन नगर परिसरात घरासमोर उभी असलेली चारचाकी कार अज्ञात कारणातून पेटवून दिल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून, पोलिसांनी गुड्डू गाडेकर याच्यासह तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करून तपासाला सुरुवात केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सुदर्शन नगर येथील रहिवासी वैष्णवी पछेल (वय २०) यांच्या घरासमोर एमएच-२२/एक्स-८०५५ क्रमांकाची कार नेहमीप्रमाणे उभी करण्यात आली होती. दरम्यान, मध्यरात्रीच्या सुमारास गुड्डू गाडेकर व त्याच्या दोन साथीदारांनी कारजवळ येत वाहनाला आग लावली आणि घटनास्थळावरून पळ काढला. आगीने काही क्षणांतच भीषण रूप धारण केल्याने परिसरातील नागरिकांमध्ये घबराट पसरली. स्थानिकांनी तत्काळ आग विझविण्याचा प्रयत्न केला. मात्र तोपर्यंत वाहनाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. ही संपूर्ण घटना परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली असून, त्यामध्ये संशयितांची हालचाल स्पष्टपणे दिसून येत असल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली. सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे फ्रेजरपुरा पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवत आरोपींचा शोध सुरू केला आहे. कार पेटवून दिल्यामुळे पछेल कुटुंबाचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले आहे. अचानक घडलेल्या या प्रकारामुळे कुटुंबीयांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून परिसरातील नागरिकांनीही संताप व्यक्त केला आहे. या प्रकरणी वैष्णवी पछेल यांनी दिलेल्या तक्रारीवरून फ्रेजरपुरा पोलिसांनी गुड्डू गाडेकर व त्याच्या दोन साथीदारांविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३२६ अंतर्गत गुन्हा नोंदविला आहे.

# स्केटिंग प्रशिक्षक संदीप सोलंकी यांचा अपघाती मृत्यू

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील स्केटिंग आणि जलतरण क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण करणारे प्रशिक्षक संदीपसिंह सोलंकी यांचे रविवारी पहाटे उपचारादरम्यान दुर्दैवी निधन झाले. नवसारी रिंगरोड परिसरात शनिवारी उशिरा रात्री झालेल्या अपघातात ते गंभीर जखमी झाले होते. त्यांच्या अकाली निधनाने अमरावतीच्या क्रीडा क्षेत्रावर शोककळा पसरली असून प्रशिक्षक, खेळाडू आणि नागरिकांकडून हळहळ व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, हेमंत विहार येथील हरिचंद्र रेसिडेन्सीमध्ये वास्तव्यास असलेले संदीप सोलंकी शनिवारी रात्री सुमारे ११.३० वाजताच्या सुमारास कुटुंबासाठी आईस्क्रीम आणण्यासाठी घराबाहेर पडले होते. नाना-नानी पार्क परिसरातील आईस्क्रीम पार्लरकडे जात असताना कठोरा ते नवसारी रिंगरोड दरम्यान युटर्न घेताना त्यांच्या दुचाकीचा ताबा सुटला आणि वाहन घसरले.

यावेळी रस्त्यालगत असलेल्या दगडावर त्यांचे डोके जोरात आपटल्याने गंभीर दुखापत झाली. अपघातानंतर परिसरातील नागरिकांनी तत्काळ मदतीसाठी धाव घेत त्यांना खासगी रुग्णालयात दाखल केले. मात्र डॉक्टरांच्या प्रयत्नांनंतरही रविवारी पहाटे ५.५५ वाजता त्यांची प्राणज्योत मालवली. या प्रकरणी गाडगेनगर पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. शवविच्छेदनानंतर मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला. सायंकाळी शहरातील स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी क्रीडा क्षेत्रातील प्रशिक्षक, खेळाडू, मित्रपरिवार आणि नागरिक मोठ्या



संख्येने उपस्थित होते. मूळचे वरूड तालुक्यातील जरूड येथील असलेले संदीप सोलंकी २०१९ मध्ये अमरावतीत स्थायिक झाले होते. अल्पावधीतच त्यांनी स्केटिंग प्रशिक्षक म्हणून शहरात स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. स्वतःची स्केटिंग अकादमी चालविण्यासोबतच विविध क्रीडा अकादम्यांमध्ये ते विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देत होते. स्केटिंगसोबतच ते उत्कृष्ट जलतरणपटू आणि लाईफसेव्हर म्हणूनही परिचित होते. स्विमिंग कोच म्हणून त्यांनी अनेक विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक खेळाडूंनी जिल्हा आणि राज्यस्तरावर यश संपादन केले होते. संदीप सोलंकी यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा आणि एक मुलगी असा परिवार आहे.


## राहुल व्यायाम प्रसारक मंडळ, भुमिपुत्र कॉलनी, अमरावती

### पाहिजेत

भारतीय संविधानातील कलम ३०(१) व महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रिडा विभागाच्या दिनांक १३ जुलै, २०१६ व दिनांक १० जून २०२२ च्या शासन निर्णयानुसार **राहुल व्यायाम प्रसारक मंडळ,** भुमिपुत्र कॉलनी, अमरावती (रजि.नं.एफ-११४१/महा १०१४) धार्मिक अल्पसंख्यांक दर्जाप्राप्त संस्थेद्वारा संचालित **सिध्दार्थ विद्यालय, परतवाडा, ता.अचलपूर, जि.अमरावती** १०० टक्के अनुदानित या विद्यालयात व कनिष्ठ महाविद्यालयात सेवानिवृत्ती व वाढीव पटसंख्येमुळे व संच मान्यतेनुसार रिक्त असलेले खालील नमुद पदे भरावयाची आहेत.

| अ. क्र. | पदाचे नांव | शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता | पद संख्या | अध्यापनाचे ठिकाण | रिक्त होण्याचे कारण |
|---|---|---|---|---|---|
| १. | क.म.वि. शिक्षण सेवक | एम.कॉम (सहकार) ५० टक्के बी.एड. | ०१ | परतवाडा ता.अचलपूर जि.अमरावती | सेवानिवृत्तीमुळे |
| २. | शिक्षण सेवक (वर्ग ६ ते ८) | बी.ए., बी.एड. एम.ए.इंग्रजी सी.टी.ई.टी.२ (६० टक्के) | ०१ | परतवाडा ता.अचलपूर जि.अमरावती | संच मान्यतेतील वाढीव पटसंख्येमुळे |

वरील शैक्षणिक पात्रता धारक उमेदवारांनी अर्ज व शैक्षणिक पात्रतेचे मूळ कागदपत्र व सत्यप्रतीसह प्रत्यक्ष मुलाखतीस शुकवार दिनांक **१२.०६.२०२६** रोजी सकाळी १२.३० ते ४.०० पर्यंत स्वखर्चाने सिध्दार्थ विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, परतवाडा, ता.अचलपूर, जि.अमरावती येथे उपस्थित रहावे.

**टिप -**
१. संस्था बौध्द धार्मिक अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त असल्यामुळे बिंदु नामावलीची अट लागू नाही.
२. वरील पदांच्या नियुक्तीस मा.शिक्षणाधिकारी माध्य. जि.प.अमरावती व मा.शिक्षण उपसंचालक, अमरावती विभाग, अमरावती यांच्या मान्यतेची अट राहील.
३. वयोमर्यादा शासन नियमानुसार शासनाने वेळोवेळी निश्चित केल्याप्रमाणे राहील.

**(क्षीतिज मधुकरराव अभ्यंकर,)**
**अध्यक्ष,**
**राहुल व्यायाम प्रसारक मंडळ, अमरावती**

## MAHAVITARAN Quotation/Enquiry Notice

Separate sealed quotation in prescribe forms are invited for execution of enquiry for 1) work contract for providing and fixing of CCTV camera at various section offices, S/Stn & sub division premises under Urban Division, MSEDCL, Amravati. (EE/U/Amt/T/1861 Dt. 26.05.2026).

**Last date for submission of quotation – 02.06.2026.**

**PRO 123/2026** **EXECUTIVE ENGINEER, URBAN DIVISION, MSEDCL, AMRAVATI**

## जाहीर सुचना

आम जनतेस सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार **सौ.तिलोत्तमा पांडुरंगजी खोब्रागडे** यांच्या सुचनेनुसार पुढील वर्णनाच्या मालमत्ते संदर्भात सुचना देण्यात येते की, याचे मालकी संबंधित असलेले खरेदीखत दिनांक ११.०८.२००५ अ.क्र.१९०८ दुय्यम निबंधक, चांदूर बाजार यांच्या कार्यालयात **सौ.तिलोत्तमा पांडुरंगजी खोब्रागडे** *यांच्या* नावे नोंदणी झालेले खरेदीखत हे चांदूर बाजार बस डेपो दि.१९.०५.२०२६ ला रात्री ८.०० वा. च्या दरम्यान हरविले / गहाळ झाले आहे. जर कुठल्याही व्यक्तिला ते सापडल्यास / आढळल्यास मला खालील पत्त्यावर कळवावे. किंवा कुठल्याही व्यक्तिला / वित्तीय संस्थेला या मालमत्ते संदर्भात खरेदी, बक्षीस, अदलाबदल, गहाण व इतर कुठल्याही स्वरुपाचा हक्क, अधिकार, आक्षेप असल्यास लेखी स्वरुपात या जाहीर सुचनेपासून ७ (सात) दिवसांचे आत मला खालील पत्त्यावर कळवावे. जर ७ (सात) दिवसाचे आत कुणाचाही अथवा कुठल्याही स्वरुपाचा हक्क, अधिकार, आक्षेप स्विकारण्यात येणार नाही अथवा माझ्या पक्षकाराला बंधनकारक राहणार नाही.

**स्थळ - अमरावती**
**दिनांक २७.०५.२०२६**

(ॲड.रमेश एस.भोयर)
नोटरी (भारत सरकार)
पत्ता- ४४, महात्मा फुले नगर,
राठी नगर जवळ, अमरावती-४४४६०३
मो.९८२२२३६८४४

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती
२ रा मजला, मालटेकडी समोर, टोपेनगर, गृहनिर्माण भवन अमरावती, अमरावती

## चौकशीची जाहीर नोटीस

फेरफार अहवाल/अर्ज क्र. 278/2026 कलम २२
सार्वजनिक न्यासाचे नांव व **श्री.जनकल्याण सेवा संस्था, अमरावती, ता.जि.अमरावती**
नोंदणी क्रमांक **एफ-१२७७३/अमरावती**
बाबत अर्जदार - **गोविंद जनार्दन जोग, रा.हेडगेवार हॉस्पीटल, अमरावती**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, धर्मादाय उपआयुक्त, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९/२२ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत--

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?
**(अ) जंगम मिळकत (वर्णन)** - **निरंक**
**(ब) स्थावर मिळकत (वर्णन)** - अमरावती शहर येथील नझुल शिट नं.६५, प्लॉट नं.५/१, एकुण क्षेत्रफळ २७,५५२.९० चौ.मीटर पैकी ६६९ चौ.मीटर जागा, ह्याचा प्लॉट नं.५/१-ब, त्यावर असलेल्या बांधकामासहीत, ज्याची चतुःसिमा--
पुर्वेस - आदित्य अपार्टमेंट व त्यामागे रेल्वे लाईन
पश्चिमेस - अमरावती-बडनेरा रस्ता
उत्तरेस - प्लॉट नं.५/१-अ
दक्षिणेस - श्री.पाटील यांचे घर

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती यांचे कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक **२४.०४.२०२६** रोजी दिली.

शिक्का

**अधीक्षक,(न्याय शाखा)**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अमरावती

## जाहीरनामा

**तहसीलदार, चांदूर बाजार यांचे कार्यालय**
**(जन्म मृत्यू प्रमाणपत्र शाखा)**

नं.स.म.अ./कावि-४१४/२०२६ दिनांक २७.०५.२०२६

**अर्जदार -** १. अनवार फातेमा मीनहजोद्दीन
रा.खराळा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार-** **निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत कार्यालय खराळा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती**

या नोटीसद्वारे सर्वत्र लोकांना कळविण्यात येते की, **अनवार फातेमा मीनहजोद्दीन इनामदार** रा.खराळा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती यांनी स्वतःचे जन्म दिनांक **०२.०५.१९९१** चा राहत्या घरी झाला. परंतु त्यांचे जन्माची नोंद कार्यालय ग्रामपंचायत खराळा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे नोंद करण्यात आली नाही. जन्माची नोद जन्म मृत्यू कार्यालय ग्रामपंचायत खराळा, पंचायत समिती चांदूर बाजार, जि.अमरावती हद्दीमध्ये झालेला असल्यामुळे जन्म नोंदणी करण्याबाबतचा अर्ज व ग्रामपंचायत खराळा यांचा प्रस्ताव या कार्यालयात दाखल केलेला आहे.

वरील जन्माची नोंद करुन देण्यास कोणत्याही व्यक्तीस अगर संस्थेस कोणाला काही आक्षेप अथवा हरकती असतील तर त्यांनी जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून १० दिवसांचे आत आपला आक्षेप अथवा हरकती लेखी स्वरुपात या कार्यालयामध्ये दाखल कराव्यात. मुदतीनंतर प्राप्त झालेला आक्षेप अथवा हरकती ग्राह्य धरण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

सदर जाहीरनामा आज दि.२७.०५.२०२६ रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी प्रसिध्द करण्यात येत आहे.

शिक्का

तहसीलदार तथा
तालुका दंडाधिकारी,
चांदूर बाजार

## तहसिलदार मोर्शी यांचे कार्यालय

**क्र. रामाक्र/५९(२९)/नेरपिंगळाई भाग-२/२०२५-२०२६**

## जाहीरनामा

ज्याअर्थी प्रकरणात अर्जदार **दादाराव लहूरामजी माहोरे**, रा.नेर पिंगळाई, ता.मोर्शी, जि.अमरावती यांनी मौजा नेर पिंगळाई भाग-२ येथील सर्व्हे नं.५९१/१, क्षेत्र ०.२९ आर, आकार रु.१.२५ या शेताचे ७/१२ वरील इतर अधिकारात **गोविंद गणपत तिखीले** व २९२/१ क्षेत्र ०.४६ हे.आर व पो.ख.०.०३ आकार रु.३.१५ या शेताचे इतर अधिकारातील **गुणपंत नारायण बारी** यांचे नांव कमी करुन मिळण्याबाबत.

त्याअर्थी या प्रकरणात ज्या कोणास आक्षेप वा हरकती घ्यावयाच्या असेल त्यांनी सदर जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत लेखी स्वरुपात आक्षेप वा हरकती दाखल कराव्या. दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा वा हरकतीचा विचार करण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

दिनांक २६.०५.२०२६

शिक्का

**स्वा/-**
**तहसीलदार, मोर्शी**

## स्थानिक चौकशी व पडताळणी पंचनामा

दिनांक

आज दि.................. रोजी आम्ही खालील सह्या करणारे पंच राहणार **घाटलाडकी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती** निबंधक, जन्म व मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत **घाटलाडकी** यांनी बोलाविल्यानुसार ग्रामपंचायत कार्यालय **घाटलाडकी** येथे हजर झालो. जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी ग्रामपंचायतीला प्राप्त अर्ज नांव **आसीया परवीन मो.साबीर** अर्जात नमूद जन्म दिनांक **०२.०२.१९८५** च्या बाबतीत आम्ही खालील माहिती देत आहोत.

१) जन्म नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेला अर्जदार हे **घाटलाडकी,** येथील स्थानिक रहिवासी आहेत.

२) सदरील अर्जदार व ज्यांच्या नावाने जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे, त्या दोघांनाही आम्ही व्यक्तिशः ओळखतो. तसेच त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती जसे आई, वडील, आजोबा इत्यादीबद्दल आम्हाला माहिती आहे.

३) सदरील जन्म/मृत्यू नोंद निबंधकाकडे विहीत वेळेत न होण्याचे कारण **जन्म नोंदीबाबत अज्ञानता व माहिती नसणे** हे आहे. (नोंदणीबाबत माहिती नसणे/अज्ञान/नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता न पडणे, दिर्घकालीन आजारपण,इतर योग्य ते नमुद करा).

४)
करीता पंचनामा लिहून देत आहोत व वाचून सही करत आहोत.

| पंचाचे नांव | सही |
|---|---|
| १) शिवानंद ए.मदने (सरपंच) | १) शिवानंद ए.मदने (सरपंच) |
| २) श्री.अब्दुल हाफिज शे.रसूल (उपसरपंच) | २) श्री.अब्दुल हाफिज शे.रसूल (उपसरपंच) |
| ३) श्री.सागर रविंद्र शिरभाते (तं.मु.अ.) | ३) श्री.सागर रविंद्र शिरभाते (तं.मु.अ.) |
| ४) श्री.गजानन अरविंद देशमुख (पो.पा.) | ४) श्री.गजानन अरविंद देशमुख (पो.पा.) |
| ५) खालीक अ.मजीद (ग्रा.स.) | ५) खालीक अ.मजीद (ग्रा.स.) |

शिक्का

**निबंधक,**
**जन्म मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत घाटलाडकी**

## जाहीर सुचना

आम जनतेस सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार **नयन श्याम छाबडा** यांच्या सुचनेनुसार पुढील वर्णनाच्या मालमत्ते संदर्भात सुचना देण्यात येते की, याचे मालकी संबंधित असलेले खरेदीखत दिनांक २८.०६.२०१७ अ.क्र.१९५६ सह दुय्यम निबंधक, अमरावती ग्रामीण यांच्या कार्यालयात **नयन श्याम छाबडा** *यांच्या* नावे नोंदणी झालेले खरेदीखत हरविले / गहाळ झाले आहे. जर कुठल्याही व्यक्तिला ते सापडल्यास / आढळल्यास मला खालील पत्त्यावर कळवावे. किंवा कुठल्याही व्यक्तिला / वित्तीय संस्थेला या मालमत्ते संदर्भात खरेदी, बक्षीस, अदला-बदल, गहाण व इतर कुठल्याही स्वरुपाचा हक्क, अधिकार, आक्षेप असल्यास लेखी स्वरुपात या जाहीर सुचनेपासून ७ (सात) दिवसांचे आत मला खालील पत्त्यावर कळवावे. जर ७ (सात) दिवसाचे आत कुणाचाही अथवा कुठल्याही स्वरुपाचा हक्क, अधिकार, आक्षेप स्विकारण्यात येणार नाही अथवा माझ्या पक्षकाराला बंधनकारक राहणार नाही.

**स्थळ - अमरावती**
**दिनांक २७.०५.२०२६**

**(ॲड.रमेश एस.भोयर)**
नोटरी (भारत सरकार)
पत्ता- ४४, महात्मा फुले नगर,
राठी नगर जवळ,
अमरावती-४४४६०३
मो.९८२२२३६८४४

## जाहीर सुचना

सर्व लोकांना सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार **नामे सुरुची गंगाधर चांदले,** रा.पन्नालाल नगर, अमरावती यांनी खालील वर्णनातील स्थावर मिळकतीचे दिनांक १२७.०१.२०१९ रोजीच्या सर्वसाधारण सभा ठराव क्र.३ नुसार सभासदत्व धारण केले आहे. त्याचे वर्णन येणेप्रमाणे--

मौजे-नवसारी, प्रगणे-नांदगांव पेठ, ता.जि.अमरावती, शेत सर्व्हे क्र.४४/१, मधील लेआऊट मंजूर प्लॉट क्र.४०/४१/डी, क्षेत्रफळ १४७६ चौ.फुट (१३७.१७ चौ.मी.) याची चतुःसिमा--

पुर्वेस - ९ मी.रुंद रस्ता
पश्चिमेस - प्लॉट क्र.३९ चा भाग
उत्तरेस - प्लॉट क्र.४०/४१/सी
दक्षिणेस - ९ मी.रुंद रस्ता

येणेप्रमाणे वर्णन असलेली स्थावर मिळकत वर कोणाचाही ताबा, हक्क, गहाण, बोजा, वारसाची भानगड, हितसंबंध, न्यायालयीन वाद इत्यादी असल्यास जाहीर सुचना प्रकाशित झाल्यापासून ७ दिवसांचे आत लेखी पुराव्यासह खाली दिलेल्या पत्त्यावर संपर्क साधावा. विहीत मुदतीनंतर कोणाचाही उजर ऐकल्या जाणार नाही. माझे पक्षकार उपरोक्त स्थावर मिळकतीचे हस्तांतरण लेख सक्षम नोंदणी अधिकाऱ्यामार्फत नोंदवून घेण्यास मोकळे राहतील, याची कृपया नोंद घ्यावी.

**दिनांक २३.०५.२०२६**
**अमरावती**

पक्षकारातर्फे अधिवक्ता
**(ॲड.वैभव वि.देशमुख)**
लक्ष्मीनारायण चौक,
अमरावती.
मो.८७८८३१२७०८

## जाहीर सुचना

सर्व लोकांना सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार **नामे अशोक गोपालराव पाटील,** रा.नागपूर यांनी खालील वर्णनातील स्थावर मिळकतीचे दिनांक १५.०७.२०१८ रोजीच्या सर्वसाधारण सभा ठराव क्र.३ नुसार सभासदत्व धारण केले आहे. त्याचे वर्णन येणेप्रमाणे--

मौजे-नवसारी, प्रगणे-नांदगांव पेठ, ता.जि.अमरावती, शेत सर्व्हे क्र.४४/१, मधील लेआऊट मंजूर प्लॉट क्र.४०/४१/बी, क्षेत्रफळ १६९९.८६ चौ.फुट (१५७.९२ चौ.मी.) याची चतुःसिमा--

पुर्वेस - ९ मी.रुंद रस्ता
पश्चिमेस - खुली जागा
उत्तरेस - प्लॉट क्र.४०/४१/ए
दक्षिणेस - प्लॉट क्र.४०/४१/सी

येणेप्रमाणे वर्णन असलेली स्थावर मिळकत वर कोणाचाही ताबा, हक्क, गहाण, बोजा, वारसाची भानगड, हितसंबंध, न्यायालयीन वाद इत्यादी असल्यास जाहीर सुचना प्रकाशित झाल्यापासून ७ दिवसांचे आत लेखी पुराव्यासह खाली दिलेल्या पत्त्यावर संपर्क साधावा. विहीत मुदतीनंतर कोणाचाही उजर ऐकल्या जाणार नाही. माझे पक्षकार उपरोक्त स्थावर मिळकतीचे हस्तांतरण लेख सक्षम नोंदणी अधिकाऱ्यामार्फत नोंदवून घेण्यास मोकळे राहतील, याची कृपया नोंद घ्यावी.

**दिनांक २३.०५.२०२६**
**अमरावती**

पक्षकारातर्फे अधिवक्ता
(ॲड.वैभव वि.देशमुख)
लक्ष्मीनारायण चौक,
अमरावती.
मो.८७८८३१२७०८

## जाहीर सुचना

सर्व लोकांना सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार **नामे अशोक गोपालराव पाटील,** रा.नागपूर यांनी खालील वर्णनातील स्थावर मिळकतीचे दिनांक १५.०७.२०१८ रोजीच्या सर्वसाधारण सभा ठराव क्र.३ नुसार सभासदत्व धारण केले आहे. त्याचे वर्णन येणेप्रमाणे--

मौजे-नवसारी, प्रगणे-नांदगांव पेठ, ता.जि.अमरावती, शेत सर्व्हे क्र.४४/१, मधील लेआऊट मंजूर प्लॉट क्र.४०/४१/ए, क्षेत्रफळ १८०१.४६ चौ.फुट (१६७.३६ चौ.मी.) याची चतुःसिमा--

पुर्वेस - ९ मी.रुंद रस्ता
पश्चिमेस - खुली जागा
उत्तरेस - ७.५ मी. रुंद रस्ता
दक्षिणेस - प्लॉट क्र.४०/४१/बी

येणेप्रमाणे वर्णन असलेली स्थावर मिळकत वर कोणाचाही ताबा, हक्क, गहाण, बोजा, वारसाची भानगड, हितसंबंध, न्यायालयीन वाद इत्यादी असल्यास जाहीर सुचना प्रकाशित झाल्यापासून ७ दिवसांचे आत लेखी पुराव्यासह खाली दिलेल्या पत्त्यावर संपर्क साधावा. विहीत मुदतीनंतर कोणाचाही उजर ऐकल्या जाणार नाही. माझे पक्षकार उपरोक्त स्थावर मिळकतीचे हस्तांतरण लेख सक्षम नोंदणी अधिकाऱ्यामार्फत नोंदवून घेण्यास मोकळे राहतील, याची कृपया नोंद घ्यावी.

**दिनांक २३.०५.२०२६**
**अमरावती**

पक्षकारातर्फे अधिवक्ता
(ॲड.वैभव वि.देशमुख)
लक्ष्मीनारायण चौक,
अमरावती.
मो.८७८८३१२७०८

प्रो.क्र.४२५/२०२६

## वारसाचे प्रमाणपत्राबद्दल जाहीरनामा/सायटेशन नोटीस

**विजय जी.परवरे, दिवाणी न्यायाधीश क.स्तर, भातकुली, जि.अमरावती यांच्या न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्रमांक १३४/२०२६ ने.ता.१०.०६.२०२६

**अर्जदार :**
1. Ashok Janrao Chakre, Age 59 Yrs. Occu.: Agriculturist R/o Chakripada Kholapur, Po.Kholapur, Tq.Bhatkuli, D.Amt.
2. Shobha Panjab Lahumachang, Age 60 Yrs. Occu.:Household R/o Shelu Bazar, Po.Shelu Bzr. Tq.Murtizapur, Dist.Akola
3. Lata Ganesh Wakode, Age 55 Yrs. Occu.: Household R/o Sakhri, Po.Chincholi Shingane, Tq.Anjangaon Surji, Dist.Amravati.
4. Rekha Sahebrao Dandage, Age 53 Yrs. Occu.: Household R/o Ward No.4, Chakri Pada, Kholapur, Tq.Bhatkuli, D.Amt.

**-- विरध्द --**

**गैरअर्जदारः** निरंक

ज्यापेक्षा Janrao Bhagaji Chakre हे दि.**१८.०६.२०२१** रोजी मयत झाले. अर्जदार Ashok Janrao Chakre, Age 59 Yrs. Occu.: Agriculturist, R/o Chakripada Kholapur, Po.Kholapur, Tq. Bhatkuli, Dist. Amravati व इतर यांनी **बॉम्बे रेग्युलेशन कायदा, १८२७ चे कलम २** प्रमाणे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता या न्यायालयामध्ये दि.**२९.०७.२०२५** रोजी अर्ज केला आहे. या अर्जाप्रमाणे वरील अर्जदार हे मयत Janrao Bhagaji Chakre यांचे वारस आहेत. ते सदरहू अर्जदार फक्त मयत Janrao Bhagaji Chakre यांचे वारस नाहीत असे कोणास सांगावयाचे असेल तर या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत दाखल करावी.

तसेच या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती दाखल न केल्यास सदरहु न्यायालय अर्जदारांना वारसा प्रमाणपत्र बाबत पुरावा घेऊन त्यांना सदरहू अर्जदारांना मयताचे वारस म्हणून घोषित करण्यात येईल आणि त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दिनांक **०७.०४.२०२६** रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले असे.

शिक्का

आदेशान्वये,
सहायक अधीक्षक,
दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर
भातकुली

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,

**वि.श्रीमती एन.सी.सोरटे, ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.९३१/२०२६
**श्रीमती वसुंधरा अधिक दोन -वि- निरंक**
पुढील ता.२४.०६२०२६

### जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार :**
1. Smt.Vasundara Ganeshrao Kadu, Age 64 Yrs. Occu.: Housewife R/o Pusada, Amravati. Tq. Dist. amravati
2. Siddhant Ganeshrao Kadu, Age 36 Yrs. Occu.: Agriculturist R/o Pusada, Amravati. Tq. Dist. amravati
3. Sau.Kalyani Vivek Bhetalu, Age 40 Yrs. Occu.: Housewife R/o Behind Surabh Colony, Vijay Colony, V.M.V. Amravati.

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **गणेश उत्तमराव कडू** हे दिनांक 10.10.2018 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **वसुंधरा अधिक दोन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **वसुंधरा अधिक दोन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१२.०५.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती


जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**

**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक २५९**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८

**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# संक्षिप्त

## ५ जूनला पत्रकार संघाचा वर्धापन दिन

**अमरावती-**निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघाच्या वर्धापन दिनानिमित्त विविध क्षेत्रात नाविन्यपूर्ण कामगिरी करणाऱ्या मान्यवरांसह उत्कृष्ट पत्रकारिता करणाऱ्या पत्रकार बांधवांचा सन्मान सोहळा श्रीक्षेत्र माहूर येथे आयोजित करण्यात आला आहे.सामान्य नागरिकांच्या न्याय हक्कासाठी लढताना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. या पार्श्वभूमीवर शहर व ग्रामीण पत्रकारांना एक व्यासपीठ मिळावे, त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहता यावे, या उद्देशाने राष्ट्रीय अध्यक्ष गणेश कचकलवार यांच्या संकल्पनेतून 'निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघ' या संघटनेची स्थापना करण्यात आली.या संघाचा वर्धापन दिन येत्या ५ जून रोजी आहे. उत्कृष्ट पत्रकार, सामाजिक, क्रीडा, शैक्षणिक, कृषी, आरोग्य, उद्योग, अध्यात्म, कायदेविषयक व इतर क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा तसेच निर्भयपणे व निःपक्षपातीपणे पत्रकारिता करणाऱ्या शहरी व ग्रामीण पत्रकारांचा यावेळी सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात येणार आहे.या वर्धापन दिन व सन्मान सोहळ्याला महाराष्ट्रातील सर्व पत्रकार बांधवांनी,तसेच महाराष्ट्रातील निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघाच्या पदाधिकाऱ्यांनी व सभासदांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे,असे आवाहन राष्ट्रीय अध्यक्ष गणेश कचकलवार यांनी केले आहे.



## माता रमाई यांचा स्मृतिदिन साजरा

**शिराळा-**येथील गुरुचंद्रमणी बुद्ध विहार व बुध्द मुर्ती जवळ माता रमाई यांचा स्मृतिदिन साजरा करण्यात आला. सर्व प्रथम भगवान बुद्धा मुर्तीचे पुजन व माल्यार्पण रंगारी यांनी केले. ध्वजारोहण शिल्पा चिंचखेडे व सुनिता सुखदान, रेखा मोहोड यांनी केले.तद्नंतर बुद्ध वंदना विशाल तायडे यांनी सामुहिक घेतली. रमाईमाता यांना दोन मिनिटे मौन श्रद्धांजली आदरांजली वाहण्यात आली.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुर्णाकृती पुतळ्याला पुष्पहार अर्पण करण्यात आला.यावेळी नंदकुमार चिंचखेडे, मोहन तायडे, पत्रकार डीआर वानखडे, दिनेश तायडे, विशाल तायडे, गोपीचंद मेश्राम, नामदेव मेश्राम, तरुण सिरसाट, प्रकाश मेश्राम, रजनिश चिंचखेडे, भाऊराव मेश्राम ,मंगेश वाहणे साऊर, रामकृष्ण मोढे, वनराज मोहोड, मधुकर खेडकर, संतोष डोंगरे, तसेच उपासिका ममता रामटेके, शितल चिंचखेडे, जयश्री चिंचखेडे शिल्पा मेश्राम कुसुम गोंडाने,आरती महाजन, सुमन रंगारी ,सुनीता सुखदान, रेखाताई मोहोड, वनमाला वानखडे, कुसुम महाजन, शोभा गजभिये आदी उपस्थित होते.



## निकृष्ठ धान्य पुरवठ्याचा भाकप कडून तीव्र निषेध

**कुऱ्हा-**केंद्र व राज्य सरकार,गरीब व निराधार जनतेला,अन्ना वाचून कोणी राहु नये प्रत्येकास उपजिवीका करता आली पाहिजे या उदात्त हेतूने प्रत्येकी मानसी तिन किलो तांदूळ व दोन किलो गहु स्वस्त धान्य वितरण यंत्रनेच्या माध्यमातून पुरवठा केला जातो या वेळेस मे,जून, जुलै २६ या सलग तिन महिण्याचे धान्य देण्यात आले.कुठे अजुनही वाटप करणे सूरू आहे. या सलग तिन महिन्यांचा मिळालेल्या धान्य इतका हिन दर्जाचे असुन लाभार्थ्यांना तो खाणे महा कठीण झाले आहे. गहु हा खाण्यास चांगला नसुन तांदुळ मध्ये बारीक चुरी व भुकटी मिश्रीत आहे.सदर पुरवठा करणारा ठेकेदार,व त्यावर नियंत्रण करणारे पुरवठा अधिकारी यांची मिली भगत मधुन हे घडत असावे असे ग्राहकात चर्चा आहे. तसेच गेल्या चार दिवसात पेट्रोल व डिझेलच्या किमती मध्ये होत असलेली दर वाढ व मिळण्यास होत असलेली चणचण या मधुन जनतेस मुक्त करण्याचे आवाहन मा.तहशीलदार मार्फत जिल्हा धिकारी अमरावती यांना देण्यात आले त्या प्रसंगी भाकप चे तिवसा तालुका सचिव कॉ.प्रकाश सोनोने यांचे नेत्वृवात ,राजाभाऊ बाभुळकर,दिलीप गोहत्रे, देवेंद्र बावणे,श्रीकृष्ण लांजेवार,अनिकेत खुळे जितेंद्र कोरडे, सुरेश कळसकर,नवाज पठाण,सदाशिव महिंगे सुनिल मुळे,नितीन काळकर,गणेश ठोंबरे, आरूफ जमीर,सलीम इत्यादी तहसीलदार याचे कडे निवेदनाद्वारे निषेध व्यक्त केला.

## महागाईमुळे कॅटरिंग व्यवसाय अडचणीत

**अंजनगाव बारी-** सध्या महागाईने सर्वसामान्यांसह कॅटरिंग व्यवसायालाही जबरदस्त फटका बसला आहे. भाज्या, तांदूळ, डाळी, गहू, मसाले, खाद्यतेल, गॅस सिलिंडर आणि पॅकिंग साहित्य यांच्या प्रचंड दरवाढीमुळे कॅटरिंग सेवा पुरवणे पूर्वीसारखे शक्य होत नाही. कार्यक्रम वाढले, मागणी आहे; पण खर्चाने अशी बिकट स्थिती निर्माण केली आहे की कॅटरर्सना दर वाढवण्याशिवाय पर्याय उरलेला नाही.ग्राहक मात्र जुन्याच दरात दर्जेदार सेवा हवी अशी अपेक्षा ठेवत असल्याने कॅटरिंग व्यावसायिकांचे आर्थिक गणित कोलमडून गेले आहे. लग्न, वाढदिवस, जत्रा, समाजभोजन कोणताही कार्यक्रम असो खर्चाच्या विळख्यात हा व्यवसाय अडकलेला आहे.दरवाढीचा थेट परिणाम म्हणजे कार्यक्रमांचे कोटेशन वाढत आहेत, नफा मोठ्या प्रमाणात कमी होत आहे, कामगारांना पगार देणे कठीण झाले असून लहान कॅटरिंग व्यावसायिक व्यवसाय बंद करण्याच्या स्थितीत पोहोचले आहेत. महागाईचा ताण वाढत असताना या क्षेत्राला तातडीने सरकारी मदतीची गरज असल्याचे मत सर्व कॅटरिंग व्यावसायिकांनी व्यक्त केले.

# राहाटगांव व तपोवन मुख्य चौकातील वाईन व बियर शॉपीमुळे शांतता व सुव्यवस्था भंग

## राष्ट्रवादी युवक काँग्रेसची पोलीस आयुक्तालय व राज्य उत्पादन शुल्क कार्यालयावर धडक

**अमरावती/का.प्र.**

शहरातील राहाटगांव चौक, विद्युत नगर चौक व तपोवन चौक अशा मुख्य चौकात सुरु झालेल्या वाईन व बियर शॉपी मुळे शांतता व सुव्यस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे.या संदर्भात सर्व नियम व अटींना धाब्यावर बांधून शहराच्या गजबजलेल्या व वर्दळीच्या चौकात वाईन व बियर शॉपी सुरु झाल्याने राष्ट्रवादी युवक काँग्रेस पार्टी आक्रमक झाली असून सदर भागात कायदेशीर कार्यवाही व उपद्रवी प्रकारांना प्रतिबंध घालण्याच्या मागणीसाठी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे शहराध्यक्ष ऋतुराज राऊत यांच्या नेतृत्वात पोलीस आयुक्तालय अमरावती शहर कार्यालय तसेच राज्य उत्पादन शुल्क विभाग अमरावती कार्यालय येथे निवेदन देण्यात आले.

निवेदनात सांगण्यात आले कि,शहरातील राहाटगांव चौक, विद्युत नगर चौक व तपोवन चौक वाईन व बियर शॉपी मुख्य चौकात असल्याने स्थानिक भागातील महिला, युवक, विद्यार्थी तसेच सर्वसामान्य नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. सदर वाईन व बियर शॉपीमध्ये येणारे ग्राहक सुद्धा याच ठिकाणी ठिय्या मांडून उपद्रव करत असून त्या परिसरात नेहमीच वाद - विवाद व भांडणे सुरु राहतात. शिवीगाळ व अश्लील संभाषण तसेच छेडखानी सारखे प्रकार सुद्धा होत असल्याने स्थानिक भागात शांतता व सुरक्षेला धोका निर्माण झाला आहे. वाईन व बियर शॉपी मुख्य चौकात सुरु करण्यात आल्याने युवा पिढी



सुद्धा व्यसनाधिनतेचा अधीन जात असून त्यांचे भविष्य व महिलांचे संसार सुद्धा उद्धवस्त होणार असून समाजावर सुद्धा प्रतिकूल परिणाम होणार आहे,सर्व सर्व बाबींना कारणीभूत ठरणाऱ्या शहरातील मुख्य चौकातील वाईन व बियर शॉपीमुळे शांतता व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्याने यावर कायदेशीर कारवाई करण्यात यावी. व अशा प्रकाराला टाळा घालण्यासाठी वाईन व बिअर शॉपी संचालकांना स्पष्ट शब्दात ताकीद देण्यात अशी.

अशी मागणी राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या वतीने पोलीस आयुक्तालय अमरावती शहर कार्यालय तसेच राज्य उत्पादन शुल्क विभाग अमरावती कार्यालय येथे दिलेल्या निवेदनातून करण्यात आली. निवेदन देतेवेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे मनपा नगरसेवक चंद्रकांत उर्फ चंदू खेडकर,गुडू उर्फ प्रशांत धर्माळे, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे शहराध्यक्ष ऋतुराज राऊत, सागर देशमुख, राष्ट्रवादी युवक काँग्रेस प्रदेश उपाध्यक्ष - आकाश हिवसे, प्रदेश सरचिटणीस -अभिषेक हजारे, अभिमन्यू तायवाडे, प्रतीक डुकरे, राष्ट्रवादी युवक काँग्रेस अमरावती विधानसभा अध्यक्ष - प्रमोद धनाडे, बादल काळे, राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे शहराध्यक्ष- संकेत बोके, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अमरावती शहर प्रसिद्धी प्रमुख -अमित तायडे, रायुकॉचे शहर उपाध्यक्ष मनीष पाटील, उज्वल पांडे, जयेश सोनोने, पंकज शर्मा, शिवराज पाटील, सुजल तेलखडे, सागर महल्ले, अमोल गुल्हाने, राहुल इंगोले, सागर देशमुख, रोहण तायडे, शिवकुमार कैथवास, आदित्य गुप्ता, तेजस पोटे,अभिजित लोयटे, अमन गुडधे, प्रणव हिवसे, पंकज खंडाळकर, तुषार पडोळे, प्रतीक पाटेकर, प्रतीक भोकरे, ऋषी गाडगे, आदींसह राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# 'फार्मर कप २०२६'साठी वाकीतील नारीशक्ती सज्ज

## महिला बचत गटांचा उत्स्फूर्त सहभाग

**टाकरखेडा संभू/ वार्ताहर**

भातकुली तालुक्यातील वाकी शेती विकास, सेंद्रिय शेतीचा प्रसार आणि गावाला राज्यस्तरावर ओळख मिळवून देण्याच्या उद्देशाने आयोजित 'फार्मर कप २०२६' स्पर्धेसाठी वाकी गावातील महिला बचत गटांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला आहे. गावात आयोजित मार्गदर्शन शिबिरात नारीशक्तीचा अभूतपूर्व प्रतिसाद पाहायला मिळाला.

कार्यक्रमाला कृषी विभागाच्या मेंटार रूपाली ठाकरे यांनी प्रमुख मार्गदर्शन केले. यावेळी पाणी फाउंडेशन अभियानाचे प्रशांत ठेवले, सहाय्यक कृषी अधिकारी कविता तायडे तसेच गावातील नारीशक्ती बचत गटांच्या महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.'फार्मर कप'मध्ये वाकी गाव बाजी मारणार रूपाली ठाकरे यांनी



'फार्मर कप २०२६' स्पर्धेचे नियम, गुणांकन पद्धती आणि गटबांधणीचे महत्त्व याविषयी सविस्तर माहिती दिली. महिलांनी एकत्रित येऊन नियोजनबद्ध पद्धतीने काम केल्यास वाकी गाव राज्यस्तरीय स्पर्धेत निश्चित यश मिळवेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.पीएमएफएमई योजनेंतर्गत महिलांना संधी सहाय्यक कृषी अधिकारी कविता तायडे यांनी महिलांना 'प्रधानमंत्री सूक्ष्म अन्नद्रव्य प्रक्रिया उद्योग' (PMFME) योजनेची माहिती दिली. या योजनेअंतर्गत ३५ टक्के अनुदान आणि ९० टक्क्यांपर्यंत बँक फायनान्स उपलब्ध असल्याचे सांगत, चांगला सिबिल स्कोअर असलेल्या महिला व बचत गटांनी योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

सेंद्रिय शेती आणि दशपर्णी अर्कावर भर प्रशांत ठेवले यांनी महिलांना शाश्वत आणि कमी खर्चिक शेतीबाबत मार्गदर्शन केले. 'इर्जीक पद्धत', दशपर्णी अर्क, जीवामृत आणि एसओपीच्या वापरामुळे शेतीचा खर्च कमी होऊन जमिनीची सुपीकता वाढते, असे त्यांनी सांगितले. यावेळी महिलांकडून प्रत्यक्ष दशपर्णी अर्क तयार करून घेण्यात आला. रासायनिक फवारण्यांवरील खर्च कमी करून विषमुक्त शेतीकडे वाटचाल करण्याचा आत्मविश्वास महिलांनी व्यक्त केला.

# समाज कल्याणच्या शासकीय वसतिगृह प्रवेश प्रक्रियेला सुरुवात

**अमरावती/का.प्र.**

सामाजिक न्याय विभागाच्या जिल्ह्यातील मागासवर्गीय मुला-मुलींच्या शासकीय वसतिगृहांमध्ये शैक्षणिक सत्र २०२६-२७ साठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. गरजू विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विजाभज, इतर मागासवर्ग आणि आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील उत्तीर्ण विद्यार्थ्यांना या वसतिगृहांमध्ये प्रवेश दिला जाणार आहे. प्रवेशित विद्यार्थ्यांना शासनातर्फे सर्व सोयी-सुविधा पूर्णपणे मोफत पुरविल्या जातील.शैक्षणिक सत्र २०२६-२७ मध्ये इयत्ता आठवी ते दहावी (शालेय), कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयीन अभ्यासक्रमात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना mahait.org या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज भरता येणार आहे. ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर त्याची प्रिंट डाऊनलोड करावी. डाऊनलोड केलेली प्रिंट घेऊन संबंधित वसतिगृहामध्ये ऑफलाइन पद्धतीने अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

मुलांसाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय वसतिगृह (युनिट क्र. १, २, ३ आणि निंभोरा), संत गाडगे महाराज मुलांचे शासकीय वसतिगृह (निंभोरा), तसेच मुलींसाठी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले शासकीय वसतिगृह (कॅम्प, जेल रोड युनिट क्र. ४, आणि १२५वी जयंती वसतिगृह) प्रवेशासाठी उपलब्ध आहेत. तसेच तालुकास्तरावरही आठवी ते दहावी आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह उपलब्ध आहे. विद्यार्थ्यांसाठी अर्ज संबंधित वसतिगृहात सादर करण्याचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. शालेय अभ्यासक्रम आठवी ते दहावीसाठी ३० जून, कनिष्ठ महाविद्यालयासाठी १५ जुलै, अव्यावसायिक अभ्यासक्रमासाठी १५ जुलै, व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी स्वतंत्रपणे वेळापत्रक प्रसिद्ध केले जाणार आहे.अधिक माहितीसाठी ०७२१-२६६१२६१ या दूरध्वनी क्रमांकावर किंवा समाज कल्याण आयुक्त कार्यालयात संपर्क साधावे, असे आवाहन सहाय्यक आयुक्त राजेंद्र जाधवर यांनी केले आहे.

## 'बी.एस्सी. बायोटेक्नॉलॉजी' प्रवेश प्रक्रिया सुरू

**अमरावती/का.प्र.**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या बायोटेक्नॉलॉजी (जैवतंत्रज्ञान) विभागामार्फत शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी बी.एस्सी. बायोटेक्नॉलॉजी या पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया जाहीर करण्यात आली आहे. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणावर आधारित हा अभ्यासक्रम 'ॲप्रेंटिसशिप एम्बेडेड डिग्री प्रोग्राम' अंतर्गत चालविला जाणार असून, यामध्ये विद्यार्थ्यांना उद्योगांमध्ये प्रत्यक्ष कामाचा अनुभव घेता येणार आहे.

अभ्यासक्रमाची मुख्य वैशिष्ट थेट इंडस्ट्रीमध्ये ॲप्रेंटिसशिप-या अभ्यासक्रमाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे विद्यार्थ्यांना एक संपूर्ण सेमिस्टर उद्योगांमध्ये शिकाऊ उमेदवारी करण्याची संधी मिळणार आहे.

प्रवेशासाठी पात्रता आणि निकष-विद्यार्थी उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (एच.एस्सी./बारावी) भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि जीवशास्त्र विषयांसह उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. या अभ्यासक्रमासाठी केवळ २५ जागा उपलब्ध आहेत. विद्यापीठात मिळणाऱ्या प्रमुख सुविधा-विद्यापीठाच्या बायोटेक्नॉलॉजी विभागात विद्यार्थ्यांकरीता अत्याधुनिक व सुसज्ज प्रयोगशाळा, मोफत वाय-फाय सुविधा आणि समृद्ध ग्रंथालय, उच्च शिक्षित व अनुभवी प्राध्यापक वर्ग, मुला-मुलींसाठी मर्यादित वसतिगृह सुविधा, शासकीय नियमांनुसार सर्व प्रकारच्या शिष्यवृत्ती आदी सुविधा उपलब्ध असणार आहेत. उद्योजकता क्षेत्रात उत्तम करिअर करण्याची संधी उपलब्ध असेल. सदर अभ्यासक्रमाकरीता ज्या इच्छुक विद्यार्थ्यांना प्रवेश घ्यावयाचा असेल, अशा विद्यार्थ्यांनी व त्यांच्या पालकांनी डॉ.ए.एस. पाटील (९८८१७३५३५४), डॉ.पी.व्ही. ठाकरे (९८२२२२२८२२) व एस.डी. कोने (९८९०३८६०३१) यांच्याशी संपर्क साधावा व विद्यार्थ्यांनी लवकरात लवकर आपला प्रवेश निश्चित करावा, असे आवाहन बायोटेक्नॉलॉजी विभागप्रमुख डॉ. अनिता पाटील यांनी केले आहे.

## पाळा येथे १.६० लाखाची घरफोडी

**अमरावती :** मोर्शी ठाण्याच्या हद्दीतील पाळा येथील रहिवासी एका नागरिकाचे घर फोडून १ लाख ६० हजारांचा मुद्देमाल लंपास करण्यात आला. ही घटना २५ मे रोजी उघडकीस आली. पाळा येथील रहिवासी भीमराव सावळकर (७३) हे नागपूरला गेले होते. या काळात अज्ञात चोरट्याने त्यांचे घर फोडून रोख व सोन्याचे दागिने असा १ लाख ६० हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास केला. ही बाब लक्षात आल्यावर भीमराव सावळकर यांनी मोर्शी ठाण्यात तक्रार दाखल केली.

# 'त्या' प्रगणक व पर्यवेक्षकांचा सत्कार

**अमरावती/का.प्र.**

जणगणनेचे काम केवळ माहिती संकलनापुरते मर्यादित नसून सामाजिक जबाबदारीचे भान जपणारे कार्य असल्याचे प्रत्यंतर अमरावती शहरात नुकत्याच घडलेल्या एका घटनेतून आले. वार्ड क्रमांक १९ मधील स्वस्तिक नगर परिसरात जणगणनेचे काम सुरू असताना प्रगणकांच्या सतर्कतेमुळे एका वृद्ध महिलेचा जीव वाचल्याची घटना घडली असून या कार्याबद्दल संबंधित कर्मचाऱ्यांचा अमरावती महानगरपालिकेकडून गौरव करण्यात आला.

मिळालेल्या माहितीनुसार, जणगणनेचे काम करण्यासाठी



प्रगणक आणि पर्यवेक्षक स्वस्तिक नगर परिसरात घरोघरी जाऊन माहिती संकलन करत होते. यावेळी एका घरामध्ये राहणारी वृद्ध महिला अत्यंत अडचणीच्या अवस्थेत असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले.महिलेची प्रकृती गंभीर असल्याचे लक्षात येताच कर्मचाऱ्यांनी प्रसंगावधान राखत तत्काळ मदतकार्य सुरू केले.परिसरातील नागरिकांच्या सहकार्याने महिलेपर्यंत मदत पोहोचविण्यात आली व वेळेत वैद्यकीय उपचार मिळाल्यामुळे त्यांचा जीव वाचविणे शक्य झाले.या उल्लेखनीय कार्याबद्दल अमरावती महानगरपालिका आयुक्त वर्षा लड्डा यांच्या हस्ते जणगणना कर्मचारी प्रगणक वैशाली प्रशांत नालसे, पर्यवेक्षक केशव पंचारिया तसेच प्रगणक मनोज वाकोडे यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

सत्कार प्रसंगी बोलताना आयुक्त वर्षा लड्डा यांनी जणगणना कर्मचाऱ्यांचे कौतुक करताना सांगितले की,'जणगणना ही अत्यंत महत्त्वाची राष्ट्रीय जबाबदारी आहे. हे काम करत असताना कर्मचाऱ्यांनी दाखविलेली संवेदनशीलता आणि तत्परता प्रशंसनीय आहे. यावेळी यशवंत पाटील उप महाराजिस्ट्रार, जनगणना संचालनालय, मुंबई, उपायुक्त योगेश पिठे, सहाय्यक आयुक्त धनंजय शिंदे, सहाय्यक निवडणूक अधिकारी अक्षय निलंगे, कैलाश कुलट यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



# शेतकऱ्यांसाठी राजीव गांधी कृषी रत्न पुरस्कार सोहळा उत्साहात

**अमरावती/का.प्र.**

राज्यस्तरीय राजीव गांधी कृषी रत्न पुरस्कार सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात झाला. या कार्यक्रमानिमित्त धारणी येथून आलेल्या महिला शेतकऱ्यांसाठी कृषी विज्ञान केंद्र, घाटखेड येथे प्रक्षेत्र भेटीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शेतकऱ्यांना विविध कृषी विषयांवर मार्गदर्शन करत आधुनिक शेतीविषयक माहिती देण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पीपल्स वेल्फेअर सोसायटी, अमरावतीचे सचिव तथा कृषी विज्ञान केंद्र, घाटखेडच्या आर्थिक सल्लागार समितीचे सदस्य अभय एन. देशमुख उपस्थित होते. कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राहुल सातपुते यांच्या हस्ते करण्यात आले.कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून राजीव गांधी कृषी प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रकाश साबळे, कृषी विज्ञान केंद्र, घाटखेडचे वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. अतुल कळसकर तसेच राजीव गांधी कृषी प्रतिष्ठानच्या सदस्या पौर्णिमा सवाई उपस्थित होत्या. याशिवाय डॉ. दिलीप काळे, प्रफुल राऊत (माजी सभापती), अविनाश पांडे, दत्तात्रय किटूकले, राहुल तायडे, अनुल्ला खान, सुनील सावळे आदी मान्यवरांनीही कार्यक्रमास उपस्थिती लावली.कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रास्ताविक प्रकाश साबळे यांनी केले. उद्घाटक मार्गदर्शन राहुल सातपुते यांनी केले तर पौर्णिमा सवाई आणि डॉ. अतुल कळसकर यांनी शेतकरी मार्गदर्शन करत कृषी क्षेत्रातील नव्या संधींवर प्रकाश टाकला. यावेळी डॉ. कळसकर यांनी वसुधा देशमुख यांचा कार्यक्रमासाठीचा संदेश उपस्थित शेतकऱ्यांना वाचून दाखविला. राजीव गांधी कृषी रत्न पुरस्कार वितरण सोहळ्यात अरुणा बनसोड, जिजी छोटेलाल गावसकर, राहुल घोगरे, प्रदीप वानखेडे तसेच सीमा देशमुख यांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन कृषी विज्ञान केंद्राचे अमर तायडे यांनी केले. कार्यक्रमास शेतकरी, महिला बचत गट सदस्य तसेच कृषी क्षेत्रातील मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# श्रुती अरुण तडस यांचा सत्कार

**यावली शहीद-**येथील श्रुती अरुण तडस सरळ सेवा परीक्षा २०२५ मध्ये उत्तीर्ण होऊन जिल्हा लेखा व कोषागार कार्यालय अमरावती येथे कनिष्ठ लेखापाल पदी निवड झाल्याबद्दल यावली शहीद येथे आयोजित ग्राम जयंती महोत्सव या कार्यक्रमात खा.बळवंत वानखडे तथा माजी पालकमंत्री एड. यशोमती ठाकूर यांच्या हस्ते श्रुती तडस यांचा शाल, पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी वं.राष्ट्रसंत जन्मस्थळ मंदिर अध्यक्ष रामचंद्र कांडलकर, सचिव सुनील देशमुख, ह.भ.प. सुनील महाराज लांजुळकर, गोपाल सालोटकर,

डॉ. देवेंद्र यादव, सुधाकर इंगळे,अतुल यावले, श्रीकृष्ण पखाले,अरुण तडस आदी मान्यवर विचार पिठावर उपस्थित होते.



# बुलढाण्यातच दरपत्रकांचा पाऊस का ?

## औषध खरेदी प्रक्रियेवर गंभीर आरोप ; फॉरेन्सिक ऑडिट, स्वतंत्र चौकशीची मागणी

**ॲड. समीर ठाकूर**

**अकोला :** बुलढाणा जिल्हा हिवताप कार्यालयातील औषध व साहित्य खरेदी प्रक्रियेभोवती गंभीर संशयाचे सावट निर्माण झाले असून, कथित आर्थिक अनियमितता, GeM प्रणालीचा मर्यादित वापर, दरपत्रकाधारित खरेदी, माहिती अधिकारांतर्गत माहिती देण्यास टाळाटाळ आणि खरेदी प्रक्रियेतील संभाव्य नियमभंग या आरोपांमुळे आरोग्य विभागात मोठी खळबळ उडाली आहे. या प्रकरणाची उच्चस्तरीय स्पेशल ऑडिट, फॉरेन्सिक ऑडिट तसेच आवश्यक असल्यास स्वतंत्र दक्षता चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

ॲड. फैजान मिर्झा यांनी राज्याचे सार्वजनिक आरोग्यमंत्री, राज्यपाल, सहसंचालक हिवताप पुणे, महालेखापाल नागपूर, विभागीय आयुक्त अमरावती, जिल्हाधिकारी बुलढाणा आणि उपसंचालक आरोग्य सेवा, अकोला मंडळ यांच्याकडे सविस्तर लेखी तक्रार सादर केली आहे. या तक्रारीत बुलढाणा जिल्ह्यातील खरेदी प्रक्रियेबाबत अनेक गंभीर मुद्दे उपस्थित करण्यात आले आहेत.

तक्रारीतील सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे अमरावती, अकोला आणि यवतमाळ जिल्ह्यांमध्ये संबंधित खरेदी प्रक्रिया नियमित टेंडर पद्धतीने झाल्याचा दावा करण्यात येत असताना, बुलढाणा जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर 'दरपत्रक' (Quotation Based Procurement) पद्धतीचा अवलंब करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. 'एकाच प्रशासकीय विभागातील इतर जिल्ह्यांनी ई-टेंडर किंवा खुली निविदा प्रक्रिया राबविली, मग बुलढाण्यातच वारंवार दरपत्रक खरेदीचा मार्ग का स्वीकारला गेला?' असा थेट सवाल तक्रारदाराने उपस्थित केला आहे.

तक्रारीनुसार, बुलढाणा जिल्ह्यात अनेक वर्षांपासून मोठ्या प्रमाणात दरपत्रक प्रक्रियेद्वारे खरेदी होत असल्याची माहिती पुढे आली आहे. त्यामुळे मागील काही वर्षांतील सर्व खरेदींची नोंद, निविदा प्रक्रिया, पुरवठादारांची निवड, मंजूर दर आणि आर्थिक व्यवहारांची स्वतंत्र पडताळणी व्हावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

■ दरम्यान, सहसंचालक आरोग्य सेवा (हिवताप व हत्तीरोग) यांनी या प्रकरणाची चौकशी करण्याबाबत आरोग्य उपसंचालकांना निर्देश दिल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे या प्रकरणातील आरोपांची अधिकृत स्तरावर पडताळणी होण्याची शक्यता वाढली आहे. संबंधित खरेदी प्रक्रिया, आर्थिक मंजुरी, निविदा पद्धती आणि माहिती अधिकारांतर्गत माहिती न देण्याच्या आरोपांमुळे आरोग्य विभागातील पारदर्शकतेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत असून, आगामी चौकशीमध्ये नेमके काय निष्पन्न होते याकडे आता लक्ष लागले आहे.

तक्रारदाराच्या म्हणण्यानुसार, अकोला, यवतमाळ आणि वाशिम जिल्हा हिवताप कार्यालयांनी माहिती अधिकारांतर्गत मोठ्या प्रमाणात कागदपत्रे उपलब्ध करून दिली. अकोला कार्यालयाने प्रत्यक्ष अवलोकनासाठी सुमारे दोन हजार पानांची नोंद दाखविली, तर यवतमाळमध्ये प्रथम अपील सुनावणीदरम्यान विस्तृत माहिती देण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे. वाशिम कार्यालयानेही पोस्टाद्वारे संपूर्ण माहिती पाठविल्याचे नमूद करण्यात आले आहे.

मात्र बुलढाणा आणि अमरावती कार्यालयांकडून अपूर्ण माहिती देण्यात आली असून, केवळ ३० ते ४० पानांपुरती मर्यादित माहिती पाठवून विषय दडपण्याचा प्रयत्न झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. संबंधित आरोपांची स्वतंत्र पडताळणी अद्याप झालेली नाही.

तक्रारीनुसार, बुलढाणा जिल्ह्यात दरवर्षी अंदाजे दोन ते तीन कोटी रुपयांच्या प्रशासकीय मान्यता असतानाही खरेदी प्रक्रिया लहान-लहान भागांत विभागण्यात आल्याचा संशय आहे. प्रत्येक खरेदी दहा लाख रुपयांच्या खाली ठेवून निविदा प्रक्रिया टाळण्यात आली का, याबाबतही प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत.

तक्रारदाराने असा दावा केला आहे की, 'Split Procurement' करून खुल्या ☞(पान २ वर)

# वर्क फ्रॉम होमच्या आमिषातून महिलेची सायबर फसवणूक




## अश्लील फोटो व्हायरलची धमकी देत ८.५ लाख उकळले

### वरुडमधील धक्कादायक प्रकार

**वरुड/प्रतिनिधीः-** वर्क फ्रॉम होमच्या आमिषाला बळी पडलेल्या एका ३६ वर्षीय महिलेची सायबर गुन्हेगारांनी तब्बल ८ लाख ५९ हजार ३३२ रुपयांची फसवणूक केल्याची धक्कादायक घटना वरुड पोलीस ठाणे हद्दीत उघडकीस आली आहे. अश्लील फोटो सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी देत आरोपीने महिलेकडून वेळोवेळी पैसे उकळल्याने परिसरात खळबळ उडाली आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, पीडित महिला काही महिन्यांपूर्वी वर्क फ्रॉम होमसंदर्भातील एका व्हॉट्सॲप चॅनलशी जोडली गेली होती. सुरुवातीला ऑनलाइन टास्क पूर्ण करून सहज पैसे मिळण्याचे आमिष दाखविण्यात आले. त्यानंतर अज्ञात व्यक्तीने विविध मोबाईल क्रमांकांवरून महिलेशी संपर्क साधत तिला टप्प्याटप्प्याने जाळ्यात ओढले. २० जानेवारी ते २७ एप्रिलदरम्यान आरोपीने तब्बल ९६ वेळा महिलेला संपर्क साधून विविध टास्क पूर्ण करण्यासाठी दबाव टाकला. दरम्यान, ☞(पान २ वर)

# सात फुटाच्या अजगरासह १० अंड्याना जीवदान

## सर्पमित्रांनी यशस्वी रेस्क्यू करून वनविभागाला सोपविले

**तिवसा/प्रतिनिधीः-**

वन्यजीव संरक्षण व्हावे यादृष्टीने आजही अनेक सर्पमित्र स्वतः चा जीव धोक्यात टाकून मोठमोठ्या साप तथा अजगारांचे, प्राण्यांचे मानवी वस्तीतून किंवा अन्य शेताशिवार वा ठिकाणाहून रेस्क्यू करून जीव वाचवितात. मात्र चांदुर रेल्वे तालुक्यात येणाऱ्या दहिगाव येथील शेत शिवारात तिवसा तालुक्यातील सर्पमित्रांने ७ फूट अजगाराचा जीव तर वाचविला सोबतच त्याचे १० अंडे देखील वाचविले.





शेतात काम सुरू असताना आज २७ मे रोजी हे रेस्क्यू करण्यात आले.दहिगाव येथील पुंजाराम शेंडे यांच्या शेतात खोदकाम सुरू असताना साप असल्याच्या☞(पान २ वर)

# जुन्या वैमनस्यातून तरुणावर चाकू हल्ला

## शाहा पॅलेसमधील लग्नसमारंभात थरार

**अमरावती/प्रतिनिधीः-** लग्नसमारंभातील आनंदाचे वातावरण काही क्षणांतच भीती आणि गोंधळात बदलल्याची धक्कादायक घटना नागपुरी गेट पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली. लालखडी रिंग रोडवरील शाहा पॅलेसमध्ये सुरू असलेल्या विवाह सोहळ्यात जुन्या वादातून तरुणावर चाकूने जीवघेणा हल्ला करण्यात आला. या घटनेत एक तरुण गंभीर जखमी झाला असून पोलिसांनी दोन आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.



पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, रविवारी दुपारी सुमारे १.३० वाजताच्या सुमारास शाहा पॅलेसमध्ये नातेवाईकांच्या लग्नासाठी मोठ्या संख्येने पाहुणे उपस्थित होते. फिर्यादी शहबाज शाह (वय ३०, इमाम हुसेन मशिदीजवळ) हेही आपल्या लहान भावासह समारंभात सहभागी ☞(पान २ वर)

# बकरी ईदपूर्वी अमरावतीत पोलिसांचे मोठे कोंबींग ऑपरेशन

## तलवारधारी आरोपी जेरबंद, अवैध दारू-जुगार अड्ड्यांवर धाडी








**अमरावती/प्रतिनिधीः-** बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर अमरावती शहर पोलिसांनी गुन्हेगारी प्रवृत्तींवर वचक बसवण्यासाठी मंगळवारी मध्यरात्री विशेष नाकाबंदी आणि कोंबींग ऑपरेशन राबवत शहरभर मोठी कारवाई केली. रात्री १० ते पहाटे २ वाजेदरम्यान राबविण्यात आलेल्या या मोहिमेत तलवार घेऊन दहशत माजवणाऱ्या आरोपीस अटक करण्यात आली, तर अवैध दारूविक्री, जुगार आणि अंमली पदार्थ सेवन करणाऱ्यांवरही गुन्हे दाखल करण्यात आले.

पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीतील आठ पोलीस स्टेशन अंतर्गत नऊ ठिकाणी नाकाबंदी लावण्यात आली होती. या विशेष मोहिमेत ☞(पान २ वर)

# केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचा रविवारी दौरा



**अमरावती/प्रतिनिधीः-:** केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांचा रविवार, दि. ३१ मे रोजी जिल्हा दौरा आहे.

दौऱ्यानुसार, गडकरी दि. ३१ मे रोजी दुपारी १ वाजता अरुण अडसड यांच्या निवासस्थानी भेट देतील. त्यानंतर दुपारी १.३० वाजता 'अभिनंदन अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड येथे भेट, दुपारी २ वाजता महेंद्र राहटगावकर यांच्या निवासस्थानी भेट देऊन सायंकाळी ५.३० वाजता 'द लाली इम्पेरियल'च्या कन्व्हेन्शन सेंटरचे उद्घाटन करतील. सायंकाळी ६ वाजता शारीरिक शिक्षण महाविद्यालयात श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांचा सत्कार समारंभ कार्यक्रमाला उपस्थित राहतील. त्यानंतर रात्री ८.१५ वाजता अमरावतीहून नागपूरकडे प्रयाण करतील.

# युवक कॉंग्रेस तर्फे 'आवाज महाराष्ट्राचा अमरावतीच्या परिवर्तनाचा' मोहीम

## -प्रदेशाध्यक्ष शिवराज मोरे यांची माहिती

## -नागरिकांच्या समस्याच्या निराकरणासाठी आंदोलनात्मक लढा

**अमरावती/प्रतिनिधीः-** युवक कॉंग्रेस तर्फे संपूर्ण महाराष्ट्रात शहरी कामगार सन्मान न्याय व सुरक्षा अभियान राबविण्यात येत आहे. शहरी भागात सध्या मोठ्या संख्येने कार्यरत सफाई कामगार, ऑटो रिक्षाचालक, खाजगी सुरक्षा रक्षक, स्विगी झोमॅटो सारख्या कंपन्यांसाठी काम करणारे गिग वर्कर, बांधकाम कामगार व फेरीवाले यांची संख्या वाढलेली आहे. असंघटित समाज घटकांना न्याय देण्यासाठी कॉंग्रेसच्या वतीने अभियान सुरू केलेले आहे. राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये मोहीम सुरू करण्यात



येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून अमरावती शहरात आवाज महाराष्ट्राचा अमरावतीच्या परिवर्तनाचा या मोहीमेचा शुभारंभ आज बुधवार २७ मे रोजी झालेल्या पत्रकार परिषदेच्या माध्यमातून करण्यात आला आहे.

या मोहीम अंतर्गत नागरिकांच्या समस्याचे निराकरण करण्यासाठी युवक कॉंग्रेस मार्फत आंदोलनात्मक लढा उभारण्याचा निर्धार करण्यात आला ☞(पान २ वर)

# शहरात आठ ठिकाणी झाडे कोसळली

**अमरावती/प्रतिनिधीः-** सायंकाळच्या सुमारास आलेल्या वादळी वाऱ्यामुळे विविध भागांत झाडे कोसळण्याच्या घटना घडल्या. रात्री ९ वाजेपर्यंत अग्निशमन मुख्यालयाला एकूण ८ ठिकाणी झाडे पडल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या.



फरशी स्टॉप परिसरातील आयुर्वेदिक दवाखान्याजवळ, कल्याण नगर, किरण नगर गल्ली क्रमांक ६, कवर नगर चौरे मार्केट, नरहरी मंगल कार्यालय परिसर, मंगलधाम, प्रशांत नगर हनुमान मंदिराजवळ, यशोदा नगर मटन मार्केट तसेच लक्ष्मी नगर येथे झाडे कोसळल्याच्या घटना घडल्या. संबंधित भागांतील लोकप्रतिनिधी व अधिकाऱ्यांनी अग्निशमन विभागाला माहिती दिल्यानंतर कर्मचारी व ☞(पान २ वर)

# हर्षवर्धन देशमुख आणि दिलीपबाबू इंगोले यांच्या अमृत महोत्सवी सत्कार सोहळ्याची जय्यत तयारी


## सेवाभावातून नेतृत्वापर्यंत : एक अमृत प्रवास' या संकल्पनेवर नेत्रदीपक सोहळा

**अमरावती/प्रतिनिधीः-** शिक्षणमहर्षी डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या वैचारिक वारसाची जपवणूक करत महाराष्ट्राच्या शैक्षणिक, सामाजिक आणि मूल्याधिष्ठित परंपरेत मोलाचे योगदान देणाऱ्या श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख तथा कोषाध्यक्ष दिलीपबाबू इंगोले यांच्या अमृत महोत्सवानिमित्त भव्य सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. 'सेवाभावातून नेतृत्वापर्यंत : एक अमृत प्रवास' या संकल्पनेवर आधारित हा विशेष सोहळा रविवार, दिनांक ३१ मे २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय, शिवाजी नगर, अमरावती येथे भव्य स्वरूपात आयोजित करण्यात आल्याची माहिती शिव परिवाराच्या वतीने आयोजित पत्रकार परिषदेत देण्यात आली.




हॉटेल महफिल इन येथे पार पडलेल्या पत्रकार परिषदेत शिव परिवाराच्या वतीने सांगण्यात आले की, शिक्षण क्षेत्रात दीर्घकाळ कार्यरत राहून हजारो विद्यार्थ्यांच्या आयुष्याला दिशा देणाऱ्या या दोन्ही व्यक्तिमत्त्वांचा प्रवास हा केवळ संस्थात्मक नेतृत्वाचा नसून सामाजिक बांधिलकी, संस्कार आणि सेवाभाव जपणाऱ्या कार्यसंस्कृतीचा आदर्श मानला जातो. श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या माध्यमातून ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून देत समाजपरिवर्तनाची चळवळ उभी करण्यात या दोनही नेतृत्वाचा मोठा वाटा राहिला आहे.

या अमृत महोत्सव सोहळ्यास देशातील विविध क्षेत्रातील दिग्गज मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पद्मविभूषण खा. शरदचंद्र पवार राहणार असून प्रमुख अतिथी म्हणून सर्वोच्च न्यायालयाचे माजी सरन्यायाधीश भूषण गवई, केंद्रीय मंत्री ना. नितीन गडकरी, महसूल मंत्री तथा अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री ना. चंद्रशेखर बावनकुळे, राज्यमंत्री डॉ. पंकजजी भोयर तसेच अमरावती महानगरपालिकेचे महापौर श्रीचंदजी तेजवानी उपस्थित राहणार आहेत. यासोबतच श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे सर्व पदाधिकारी, राजकीय क्षेत्रातील मान्यवर, अधिकारी गण यांचीही उपस्थिती लाभणार आहे.




या सोहळ्यात हर्षवर्धन देशमुख आणि दिलीपबाबू इंगोले यांच्या शैक्षणिक, सामाजिक आणि संघटनात्मक कार्याचा विशेष गौरव करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्ता, शिस्त, संस्कार आणि सामाजिक जाणीव निर्माण करण्यासाठी त्यांनी केलेल्या कार्याचा आढावा यावेळी घेण्यात येणार असून अनेक मान्यवर त्यांच्याविषयी मनोगत व्यक्त करणार आहेत.

कार्यक्रमाच्या निमित्ताने अमरावती शहरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून माजी विद्यार्थी, शिक्षक, शिक्षणप्रेमी, विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असल्याचे सांगितले जात आहे. श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या कार्याशी भावनिक नाते असलेल्या अनेकांसाठी हा सोहळा म्हणजे कृतज्ञतेचा आणि प्रेरणेचा उत्सव ठरणार आहे.

या अमृत महोत्सव सोहळ्यास संपूर्ण विदर्भ तसेच राज्यातून हजारो मान्यवर मंडळी प्रामुख्याने उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाचे नियोजनासाठी शिव परिवाराच्या वतीने शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या प्रांगणात भव्य दिव्य असा स्टेज उभारण्यात येणार असून नागरिकांना कार्यक्रम बघता यावा यासाठी प्रत्येक

## दिग्गजांची राहणार उपस्थिती - शिव परिवाराचे भव्य आयोजन'

ठिकाणी एलईडी स्क्रीन उभारण्यात येणार आहे. सोबतच हर्षवर्धन देशमुख आणि दिलीपबाबु इंगोले यांच्या जीवनावरील चित्रफीत देखील दाखविण्यात येणार आहे. नागरिकांची सुनियोजित बैठक व्यवस्था या प्रांगणात करण्यात येणार असून यामध्ये व्हीआयपी व्यवस्था, शिवाजी शिक्षण संस्थेचे आजीवन सभासद, ज्येष्ठ नागरिक, महिला, पत्रकार यांच्यासाठी देखील स्वतंत्र व्यवस्था असणार आहे. कार्यक्रमाला येणाऱ्या प्रत्येकासाठी भव्य अशी भोजन व्यवस्था, पार्किंग या सर्व गोष्टीची बारकाईने व्यवस्था करण्यात आली आहे.

शिव परिवाराच्या आनंदात भर घालणाऱ्या या कार्यक्रमासाठी सर्व वैदर्भीय नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजक 'शिव परिवार' यांच्या वतीने करण्यात आले आहे.

कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण https://youtube.com/live/zMB4qXESvUg?feature=share या लिंक वरून करण्यात येणार आहे. तसेच https://shivaji.live या युट्युब चॅनलवरुन सुध्दा कार्यक्रम प्रत्यक्ष पाहता येईल.

या पत्रकार परिषदेला संस्थेचे उपाध्यक्ष ॲड.गजाननराव पुंडकर,ॲड.जे.व्हि.पाटील पुसदेकर, सदस्य हेमंत काळमेघ, प्राचार्य केशवराव गावंडे, प्रा.सुभाषराव बनसोड, सुरेश दादा खोटरे, सचिव प्राचार्य डॉ.वि.गो ठाकरे, डॉ. पद्माकर सोमवंशी,स्विकृत सदस्य प्राचार्य अंबादास कुलट, डॉ.अमोल महल्ले, विजय ठोकळ,डॉ आजीवन सभासद बबनराव चौधरी, राजाभाऊ सुंदरकर,आदी मान्यवर उपस्थित होते.